४४२

म. ग्रं. सं. ठाणे.

विषय निबंध

सं. क्र. ५८३

REFBK-0006122

# धूम्रवलयें

लेखक

प्रो. ना. सी. फडके, एम्. ए.

ग्रं. क्र. ६१२२

REFBK-0006122

रामकृष्ण बुक डेपो

गिरगांव, मुंबई ४

१९४१

—प्रकाशक—

**शंकर बापू रानडे**

रामकृष्ण बुक डेपो

गिरगांव, मुंबई ४

या पुस्तकाच्या पुढील आवृत्तीचे, भाषांतराचे वगैरे सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन आहेत.

**[ किंमत १ रु. २ आ. ]**

—मुद्रक—

**जयराम दिपाजी देसाई,**

राष्ट्रवैभव प्रेस, गिरगांव, मुंबई ४

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | सिगरेट | १ |
| २. | घड्याळ | ७ |
| ३. | सुभाषितं | १३ |
| ४. | रविवार | २० |
| ५. | नव्या इमारती | २५ |
| ६. | छत्री | २९ |
| ७. | नको असलेली पुस्तकं | ३४ |
| ८. | छबी | ३९ |
| ९. | चावी | ४४ |
| १०. | कारागीर | ५० |
| ११. | पुरून ठेवलेलं धन | ५६ |
| १२. | बाजार | ६१ |
| १३. | कोमेजणारीं फुलं | ६७ |
| १४. | पहिलं चुंबन | ७१ |
| १५. | एक स्वप्न | ७६ |

# प्रो. फडकेकृत पुस्तकें

**चरित्रें**

१ दादाभाई नौरोजी (३री आ.)
२ टेरेन्स मॅक्स्विनी
३ डी व्हॅलेरा

**प्रबंध**

१ मानसोपचार ( २ री आ. )
२ मानसोन्नति
३ सुखाचे संसार
४ संततिनियमन
५ आजचे तरुण स्त्री-पुरुष व त्यांजपुढील प्रश्न ( २ री आ. )
६ प्रतिभा-साधन ( दु० आवृत्ति )
७ वाङ्मयविहार
८ आधुनिक गीता
९ मानसमंदिर
१० साहित्य व संसार
११ आकाशवाणी

**नाटकें**

१ युगांतर
२ संजीवन
३ जडावाची देवी
४ तोतया नाटककार
५ आगलावी
६ क्षमेसाठीं अपराध

**गोष्टी**

१ प्रो. फडके यांच्या गोष्टी भाग १ ला
२ प्रो. फडके यांच्या गोष्टी भाग २ रा
३ लेला आणि इतर गोष्टी
४ नमुनेदार गोष्टी

**कादंबऱ्या**

१ अल्ला हो अकबर
२ कुलाब्याची दांडी ( दु. आ. )
३ जादुगार ( दुसरी आवृत्ति )
४ दौलत ( दुसरी आवृत्ति )
५ अटकेपार
६ निरंजन
७ कलंक शोभा ( दु० आवृत्ति )
८ उद्धार
९ काश्मिरी गुलाब
१० आशा
११ प्रवासी
१२ समरभूमि
१३ उन्माद
१४ गुप्त प्रायश्चित्त
१५ इंद्रधनुष्य

**रसात्मक निबंध**

१ गुजगोष्टी ( दु० आवृत्ति )
२ नव्या गुजगोष्टी

**संकीर्ण**

१ टाकांच्या फेंकी ( दु० आवृत्ति )
२ टांकीचे घाव

**इंग्रजी**

1 Sex Problem in India (2nd Edition)
2 Psychology
3 Elements of Ethics
4 Manual of Logic (3rd Edition)
5 Birth Control [2nd Edtn.
6 History of Philosophy

[library stamp]

# नं. १ सिगरेट

रानटी अवस्थेतून बाहेर पडल्यानंतर मनुष्याची जी सुधारणा व्हायला लागली तिचे मुख्य मुख्य टप्पे कोणते तें सांगायचें झालें तर मी लिहीन—" मनुष्य शिजलिलेलं अन्न खाऊं लागला, मनुष्य कपडेलत्ते करूं लागला, मनुष्य गाऊं लागला, मनुष्य धूम्रपान करूं लागला...! "

जो मनुष्य धूम्रपान करीत नाही तो सुधारलेला नाही असं नाही म्हणत मी; परंतु अशा माणसाशीं गप्पागोष्टी करतांना माझ्या मनाला जरा संकोच वाटतो एवढं मात्र खरं. ज्याच्याशीं गप्पा मारायच्या त्याच्या दृष्टीनं माझ्या तोंडांतली सिगरेट निषिद्ध असावी ही जाणीव मला बरी वाटत नाही. माझ्याकडे बोलायबसायला येणाऱ्या माणसानं मीं पुढं केलेली सिगरेट घेऊन शिलगावली, की मला बरं वाटतं अन् त्याच्याशी मी मनमोकळेपणानं बोलूं लागतों. उलट, त्यानं तिचा अव्हेर केला की त्याच्या-माझ्यांत कसला तरी आडपडदा असल्यासारखं मला वाटूं लागतं अन् मग त्याच्याशीं बोलण्याऐवजी माझ्या सिगरेटच्या जळत्या टोकांतून निघणाऱ्या धूम्रवलयांकडे पाहात राहाण्यांत मला अधिक आनंद वाटतो.

" आपण सुपारीच्या खांडालासुद्धा शिवत नाही " असं अभिमानानं सांगणारीं कांहीं माणसं असतात. अशा माणसांना सदाचाराचं सर्टिफिकेट द्यायला माझी ना नाही; पण अशीं माणसं मला भेटायला आलीं की मला फारसा संतोष वाटत नाहीं. याचं मुख्य कारण असं, की त्यांचं आदरातिथ्य कसं करावं तें मला समजत नाही. एकदा एक गृहस्थ माझ्याकडे आले. फार लांबून आले होते, अन् वेळांत वेळ काढून ते कोल्हापूरला आले होते ते माझी केवळ भेट घेण्याच्या हेतूनं. ते म्हणाले, " तुम्हांला एकदा प्रत्यक्ष पाहावं असं फार दिवस मनांत होतं. तुमच्या कादंबऱ्या..."

कुणी पाहुणा अशी प्रशंसा करूं लागला की ती कशी बंद करावी तें मला आता सरावानं चांगलं माहीत झालं आहे. मी त्यांना विचारलं, "काय घेतां? चहा, कॉफी, कोको?" पण यांपैकीं कोणतंच पेय ते घेत नसत! "मग दूध?" छे, तें त्यांना पचत नसे! "सोडा-लिंबू मागवूं?" "नको, नको." "मग ही सिगरेट तरी ओढा!" पण छे! ते इतके निर्व्यसनी होते, की सुपारीच्या खांडालादेखील शिवत नसत! तें ऐकून एकदम त्यांच्याविषयी मला मोठा आदर वाटूं लागल्यासारखी चर्या करून मी म्हटलं, "असं कां!" माझे ते उद्गार ऐकून ते खूष झाले असावेत. पण मी मात्र मनांतल्या मनांत त्या गृहस्थावर कांहीसा नाराजच झालों. त्यांच्या माझ्या बोलण्यांतला मनमोकळेपणा नंतर किंचित् तरी कमी झाला असला पाहिजे. सुपारीच्या खांडालासुद्धा न शिवण्याच्या त्यांच्या व्रतामुळें ते मोठे शुचिर्भूत ठरले असतील जगाच्या दृष्टीनं; पण माझ्या दृष्टीनं त्यांचा तो सोवळेपणा जरा वावगाच होता. अशा माणसाचं आदरातिथ्य करायचं तरी कसं? त्यांना त्याची गरज नसेल; पण आदरातिथ्य करतां आलं तर मला समाधान होणार नाहीं का? पण माझ्या समाधानाचा विचार करायला ते तयार नव्हते! अर्थात् त्यांनीं सिगरेट घेतली नाही तरी त्यांच्याशीं बोलतां बोलतां मीं ओढलीच! पण गप्पांना मजा आली नाही!

सिगरेट न ओढणाऱ्या माणसाबरोबर प्रवास करायचा प्रसंग तर मी शक्य तितका टाळतों. आगगाडींत अगर मोटारींत प्रवास करतांना नाना प्रकारच्या गप्पा सुचतात. पण कांहीं झालं तरी मधूनमधून गप्पांत खंड पडणारच कीं! एखाद्या माणसाच्या शेजारीं तर आपण बसलों आहोंत पण तो अन् आपण दोघेहि अगदीं स्तब्ध आहोंत ही जाणीव मोठी विचित्र असते. अशा वेळीं त्याच्यांत व आपल्यांत कसलाहि ऋणानुबंध उरलेला नाही, मोठं अंतर उत्पन्न झालेलं आहे असं वाटूं लागतं. अन् ज्याच्यांत व आपल्यांत मानसिक दूरत्व उत्पन्न झालेलं आहे तो शरीरानं मात्र आपल्याला चिकटून बसलेला असावा या कल्पनेचा त्रास होऊं लागतो. पण अशा वेळीं तो मनुष्य सिगरेट ओढणारा असेल तर? मग या त्रासाचा

संभव मुळीच नाही. गप्पा मंदावल्या की दोघांनी सिगरेट्स पेटवाव्या अन् मजेनं झुरके घ्यावे. बोलणं अजिबात थांबलं असलं तरी परस्परांतल्या सलगीचा दुवा तुटल्यासारखं मुळीच वाटत नाही मग! जणू तें धूम्रपान म्हणजे एक प्रकारचं मूक संभाषणच!

संभाषणांतले स्तब्धतेचे विरामहि सुखकारक करणारी सिगरेट संभाषणाचा ओघ सहज वाहात असतांना किती प्रिय वाटत असेल तें तुम्हीच पाहा. मला तर सिगरेट हातीं असल्यावांचून गमतीच्या गप्पा मारतांच येत नाहींत. मी आपल्या खोलींत एकटाच बसून लिहीत असलों म्हणजे चार चार तास माझं सिगारेटकडे लक्षहि जात नाहीं. पण कोणी स्नेही माझ्याकडे आले की त्यांना "या बसा" म्हटल्यावर मी आधी सिगरेटची पेटी काढणार! सिगरेट ओढली की कल्पना सुचतात, धूम्रपानामुळं प्रतिभा जागृत होते इत्यादि दंतकथांवर माझा मुळीच विश्वास नाही. तसा अनुभव मला कधीं आलेला नाही. उलट मी स्वतः हातानं लिहिण्यांत गुतलों असलों म्हणजे कित्येक घटका मला सिगरेटचं स्मरणसुद्धां होत नाहीं. पण कुणाशीं बोलायचं म्हटलं की सिगरेट पेटविल्यावांचून मला राहवत नाही. संभाषणामुळं सिगारेटची लज्जत वाढते की सिगरेटच्या योगानं संभाषणाला रंग चढतो तें ठरविण्याचा मीं कधीं प्रयत्न केलेला नाहीं. पण दोहोंचाहि आस्वाद एकदम घ्यायची जी संवय मला लागली आहे ती कधीं सुटायची नाही!

एकट्यानंच सिगारेट ओढायची झाली तर खोलींतल्या खुर्चीवर बसून ओढण्यांत मला गोडी वाटत नाही! गावाबाहेर लांब रानांत जिथं माणसांचा संपर्क नाही अशा एकान्त स्थळीं जावं, हिरवळीनं आच्छादलेल्या उंचवट्याच्या जागीं बसावं, क्षणाक्षणाला मंद होणाऱ्या संध्याकाळच्या प्रकाशांत रंगाची एकेक छटा अंगावर घेऊन लगेच टाकण्याचा गमतीचा चाळा करणाऱ्या दूरच्या-जवळच्या डोंगरांकडे, विस्तीर्ण भूप्रदेशाकडे, झाडांच्या फांद्यांकडे पोटभर बघून घ्यावं, अन् मग सृष्टीवरचं प्रकाशाचं अखेरचं झिरझिरीत वस्त्र दूर झालं की तिच्या काळ्यासांवळ्या विवस्त्र

अंगाकडे टक लावून खुशाल धूम्रपान करीत राहावं ! स्थलकालाचं भान अशा वेळीं उरत नाही, कामधामाची त्रासदायक जाणीव मनावेगळी होते, अन् हर्षखेदाचं स्फुरणहि बंद होऊन चित्तावर एक प्रकारची धुंद शांति हळूच चढते!

निसर्गाच्या एकान्त सहवासांत निर्विकल्पतेचा अनुभव देणारी सिगरेट सामान्य व्यवहारांत किती प्रकारें उपयोगी पडते त्याची तर गणतीच करतां यायची नाही. कुणीतरी रीतसर ओळख करून दिल्याशिवाय दोन व्यक्तींनीं एकमेकांशीं बोलूं नये हा विलायती शिष्टाचार आपल्या समाजांत आतां बराच रूढ झाला आहे. पुष्कळ वेळां या शिष्टाचाराचा आपल्याला त्रास होतो. एखाद्या व्यक्तीशीं बोलावंसं वाटत असून आपल्याला बोलतां येत नाही. अशा वेळीं सिगरेट फार उपयोगी पडते.

एकदां मी आगगाडींतून कुठेंसा चाललों होतों. माझ्या डब्यांतच पण बऱ्याच अंतरावर बसलेला एक तरुण पुनःपुन्हा माझ्याकडे टक लावून पाहात होता असं थोड्याच वेळांत माझ्या ध्यानांत आलं. पण माझ्या ध्यानांत आलं हें मीं त्याला दर्शविलं नाहीं. मी आपल्या वाचनांत गुंतलों आहे असंच त्याला वाटलं असावं. पण कांहीं वेळानं तो तरुण माझ्याजवळ येऊन म्हणाला, " काड्यांची पेटी आहे आपल्याजवळ ? " मीं माझ्या खिशांतली पेटी दिली; तेव्हां त्यानं हातांतलं सिगारेट पाकीट माझ्यापुढं धरलं. मी एक सिगारेट काढून तोंडांत धरतांच त्यानं तत्परतेनं काडी ओढून पुढें केली. मग स्वतःची सिगरेट पेटविल्यावर काड्यांची पेटी परत देतांना त्यानं मला विचारलं, " आपण फडके ना ? " मी " हुं " म्हटल्यावर तो म्हणाला, " आपल्याशीं बोलायचं आहे. " माझ्यासमोरचं बाक रिकामंच होतं त्याकडे बोट दाखवून मी म्हटलं, " बसा ना ! " अन् मग त्या तरुणाच्या व माझ्या ज्या गप्पा सुरू झाल्या त्या कितीतरी वेळ चालल्या होत्या ! त्या गोष्टीची मला जेव्हां जेव्हां आठवण होते तेव्हां तेव्हां मला वाटतं, ज्याच्या खिशांत सिगरेट आहे त्याच्याजवळ अनोळखी माणसाशीं सुद्धां गप्पा उकरून काढण्याचा परवानाच आहे म्हणायला हरकत नाहीं. त्याच्याजवळ काड्यांची पेटी नसली किंवा असून खुशाल नसल्याचा बहाणा त्याला करतां आला म्हणजे झालं !

मोठेपणाचं अगर बेपर्वाईचं नाटक करायलाहि सिगरेटचा फार उपयोग होतो. माझे एक विनोदी स्नेही मुंबईस आहेत. ते मला एकदा म्हणाले, "तिकीट न काढतां ट्रॅमचा प्रवास करायची युक्ति माहीत आहे का तुम्हाला? कंडक्टर जवळ आला, की खुशाल सिगरेट ओढीत राहावं अन् खिडकींतून बाहेर किंवा आंतल्या जाहिरातींवरच्या चित्राकडे पाहावं. कंडक्टरची खात्री पटते, की या बड्या गृहस्थानं तिकीट घेतलेलं आहे, अन् तो पुढें जातो." त्यांचा हा प्रयोग त्यांनी मला ट्रॅममध्येच नव्हे, तर रेल्वेच्या स्टेशनवरहि प्रत्यक्षच करून दाखविला. आम्ही दादरहून बोरी-बंदरला आलों तेव्हां उतारूंचीं तिकिटं किंवा पास कसोशीनें तपासणाऱ्या तिकीट-कलेक्टरच्या अंगावरून कांहीं न दाखवितां ते पुढं झाले. त्यांच्या तोंडांतल्या सिगारेटकडे अन् बेदरकार चर्येकडे पाहून तें ॲंग्लो-इंडियन पोरगं गप्प राहिलं! ज्या प्रसंगीं मन किंचित् डगमगतं पण तें डगमगल्याचं दुसऱ्याला कळूं देण्यांतच खरा घात असतो, त्या प्रसंगीं सिगरेटचं अग्न्यस्त्र विलक्षण प्रभावी ठरतं. चित्रपटांत तुम्ही पुष्कळदां पाहिलं असेल, की एकादा प्रसंग आपल्यावर कोसळतो आहे असं नायकाला अगर खलपुरुषाला वाटलं अन् आपण यत्किंचितहि चपापलों नाही असं त्याला दाखवायचं असलं की खिशांतली सिगरेट काढून ती शिलगावीत शिल-गावीतच तो प्रतिपक्षाशीं बोलूं लागतो.

मोठ्या दुःखांचा अन् संकटांचा हिशोब सोडला तरी तळपायांतल्या बारीक काट्यासारखा ताप देणाऱ्या लहानसहान गोष्टी काय थोड्या वांट्याला येतात तुमच्या आमच्या नित्याच्या व्यवहारांत? एखाद्या पाहुण्याला आणायला स्टेशनवर जावं अन् गाडी पंधरा मिनिटं उशिरा येणार असावी, बसच्या स्टॅंडवर उभं राहावं अन् आपल्याला हवी त्या मार्गाची बस येण्याऐवजी इतर मार्गांच्या गाड्या एकामागोमाग येऊन जात राहाव्या, दातांच्या डॉक्टरकडे जावं अन् आधीच पांचसहा लोकांचे नंबर लागलेले असावेत—असले प्रसंग मोठे नव्हते खरे, पण ते मनांत जी चीड उत्पन्न करतात ती मोठी असते. अशा वेळीं मनस्तापाच्या ऊर्मीवर

सिगरेटसारखं दुसरं औषध नाहीं. मला तर खिशांतल्या सिगरेटचे विशेष आभार मानावेसे वाटतात ते अशा वेळीं.

एकदा एका स्नेह्यांच्या बरोबर मी निघालों. त्यांचं बँकेंत कांही काम होतं म्हणून वाटेंत त्यांनीं मोटर उभी केली. ते आंत गेले. मीं म्हटलं मी गाडींतच बसतों. ते परत येतांच म्हणाले, "फार वेळ लावला मी. रागावलां असल तुम्ही माझ्यावर." हातांतली सिगरेट दाखवीत मी म्हटलं, "रागावलों असतों, पण हिची सोबत होती त्यामुळं किती वेळ झाला तें मला कळलंच नाही!" मित्रावर रागावण्याच्या पापापासून माझा बचाव करणाऱ्या सिगरेटविषयीं मी कृतज्ञता बुद्धि कां ठेवूं नये? लोकांना सुगंध देण्यासाठीं झिजणाऱ्या चंदनाची जशी स्तुति करायची, तशीच जड वाटणारा वेळ हलका व्हावा म्हणून स्वतःचं शरीर जाळून घेणाऱ्या सिगरेटची नको करायला? जे लोक सिगरेट ओढीत नाहींत त्यांच्यावर कसली तरी प्रतीक्षा करीत ताटकळत राह्यची वेळ आली, कीं त्या आपत्तीला ते कसं तोंड देत असतील याची मला तर कल्पनाच करतां येत नाहीं!

क्रिकेटच्या मॅचमध्यें एखाद्या खेळाडूचं सुंदर बॅटिंग पाहातांना एकीकडे सिगरेटचे झुरके घेतले, कीं खेळ पाहाण्याचा आनंद वाढतो. मधुर गायन ऐकतांनाहि असाच अनुभव येतो. अशा प्रसंगीं कधीं कधीं असहि घडतं, कीं गायनाच्या आनंदाच्या भरांत सिगरेट ओढण्याऐवजी माझ्या हातांत ती तशीच राहाते. पण तशी राहिली तरी तिच्या धुराचीं वलयं मला दिसतात अन् तीं पाहून माझा आनंद वाढतो. सिगरेट ओढण्याप्रमाणंच ती नुसती जळत ठेवण्याचीहि गंमत कांहीं कमी नाहीं. सिगरेटच्या टोकांतून हळूच बाहेर पडून नाना तऱ्हेच्या आकृती बनवीत मंद गतीनं तरंगत हवेंत चढणारीं निळसर, विरल धूम्रवलयं म्हणजे एक विलक्षण मनोहर दृश्य होय! ज्यांना सिगरेट ओढायची नसेल त्यांनासुद्धां हें कबूल करणं भाग पडेल!

---

## नं. २ : घड्याळ

सकाळीं साडेनवाचा सुमार होता. ट्रॅमची वाट पाहात मी गिरगांवच्या नाक्यावर उभा होतों. उभा होतों म्हणजे ट्रॅम येत नव्हती म्हणून नव्हे. एकेक, दोनदोन मिनिटांच्या अंतरानं एकामागून एक ट्रॅमगाड्या येत होत्या; पण त्या साऱ्या माणसांनीं खचून भरलेल्या. प्रत्येक गाडी येई ती उगीच शपथेला उभी राही. 'जगा नही, दूसरे गाडीसे आव' असं कंडक्टर ओरडे, ठण्ठण् असा घंटेचा आवाज होई आणि गाडी पुढें चालूं लागे. ज्यांना वाट पाहायला फुरसत नव्हती असे लोक कंडक्टरच्या त्या इशाऱ्याला न जुमानतां तसेच गाडींत चढत अन् आंत प्रवेश करून उभे राहात किंवा बाहेरच्या बाजूला लोंबकळूं लागत. मला घाई नव्हती, त्यामुळं कसरतीचा तो अवघड प्रयोग करून पाहाण्याचं मला कारण नव्हतं. ज्या गोष्टीला लोक भितात तिचं खरं निरुपद्रवी स्वरूप माहीत असणाऱ्या माणसाला इतरांची भीति मनोरंजक वाटते, तद्वत् मला स्वतःला कसलीच घाई नसल्यामुळं इतरांची घाई पाहाण्यांत मला गंमत वाटत होती. मी सभोवार पाहिलं तों सगळीकडे धावपळ चाललेली होती. सायकली, व्हिक्टोरिया, मोटारी आणि ट्रॅम-गाड्या अशीं सर्व प्रकारचीं वाहनं एखाद्या शर्यतींत सुटल्याप्रमाणं धावत होतीं. ज्याला त्याला कुठेंतरी वेळेवर पोचायचं होतं. ट्रॅमची वाट पाहात कोपऱ्यावर उभ्या राहिलेल्या प्रत्येक माणसाची नजर आपापल्या मनगटा-वरच्या किंवा आजूबाजूच्या दुकानांतल्या घड्याळाकडे पुनःपुन्हा वळत होती. साऱ्या घड्याळांचे काटे पांच मिनिटं जागच्या जागीं थांबतील असं आश्वासन कोणीं त्या लोकांना दिलं असतं तर त्यांनीं त्या महात्म्याच्या नांवाचा जयजयकार खचित केला असता. पण तसं कुठलं व्हायला?

उलट साऱ्या घड्याळांचे काटे आपल्या ठराविक गतीनं पुढें पुढें सरकत होते. सारीं घड्याळं जणू एक प्रकारचा निःशब्द गजर करून त्या लोकांना सांगत होतीं, ' उशीर होत चालला. पाहातां काय ? पळा ' आणि तें ऐकतांच लोकांची धावपळ सुरू होत होती अन् गर्दीनं खचलेल्या ट्रॅमगाडीवर ते खुशाल चालून जात होते. कंडक्टरचा हुकूम मानायची त्यांची तयारी नव्हती. ' थांबू नका, धावा, पळा ! " असा घड्याळांकडून हुकूम झाला होता. त्या हुकुमापुढं त्यांना दुसऱ्या कशाची मातबरी वाटत नव्हती.

तें सारं पाहून माझ्या मनांत आलं, घड्याळाचं केवढं वर्चस्व माणसावर ! सृष्टीवर मालकी गाजविणारा प्राणी असं माणसाचं वर्णन करतात; पण सृष्टींतल्या पंचतत्त्वांना आपलं दास्य करायला लावणाऱ्या माणसाचं घड्याळापुढं कांहीं शहाणपण चालत नाही. भूमि, जल, तेज इत्यादि निसर्गशक्तींवर माणसानं विजय मिळविला असेल; पण कालाचं नियंत्रण मनुष्य करूं शकत नाही. फार तर अव्यक्त कालतत्त्वावर लांबी-रुंदीचे खोटे कृत्रिम आरोप करून तो त्याची गणना करूं शकेल. पण ही गणना-सुद्धां कालाचं दास्यत्व नीट करतां यावं म्हणून. बारा आंकड्यांच्या तबकडीचं घड्याळ म्हणजे मनुष्याच्या या दास्यत्वाचं एक ठळक चिन्ह आहे. मनुष्य घड्याळाच्या ' हातांत ' पूर्णपणें सापडलेला आहे. ' घड्याळाचे काटे ' या मराठी शब्दप्रयोगापेक्षां ' घड्याळाचे हात ' हा इंग्रजी शब्दप्रयोगच अधिक अन्वर्थक नाहीं काय ?

ज्या राजाचा अंमल आपण कबूल करतों त्याला परोपरीच्या मूल्यवान् चिन्हांनीं अंकित करून रत्नजडित सिंहासनावर बसविण्याची आपल्याला हौस असते. हें लक्षांत घेतां घेतां ज्याच्या अंमलाखाली आपल्याला सतत वागायचं त्या घड्याळाला नाना प्रकारचे सुंदर सुंदर आकार देण्याची व त्याला हरप्रकारें नटविण्याची आपली खटपट असावी हें साहजिकच आहे. उपयुक्त वस्तूला अलंकाराचं स्वरूप देण्याची प्रवृत्ति जशी मनुष्याच्या ठिकाणीं निसर्गतः आहे, तशीच गुलामगिरीच्या चिन्हाचा सुद्धा अलंकार

करून शल्याचं भूषण करण्याची प्रवृत्ति मनुष्य नेहमीं दाखवीत असतो. स्त्रियांनीं प्रथम कपाळावर कुंकू आणि हातांत बांगड्या धारण केल्या त्या पुरुषांची सत्ता मान्य असल्याचं दाखविण्यासाठीं ! पण हलके हलके त्या दास्यचिन्हांना सौंदर्यवर्धक साधनांचं स्वरूप आलं. मनुष्यानं घड्याळ अंगावर घालायचं ठरविलं तेव्हा पायांत कमरेवर किंवा गळ्यांत नव्हे, तर मनगटावर तो तें धारण करूं लागला. ज्या मनगटाच्या जोरावर परोपरीचे पराक्रम करण्याची दर्पोक्ति मनुष्य करीत असतो त्या मनगटावर त्यानं घड्याळ चढविलं ! घड्याळाची अनुल्लंघनीय सत्ता कबूल करण्याचा याहून अधिक काव्यमय प्रकार दुसरा खचित नसेल.

आपले व्यवहार नियमित व सूत्रबद्ध करण्याच्या हेतूनं मनुष्यानं घड्याळ निर्माण केलं खरं, पण त्या घड्यळानं मनुष्याचं मूळचं स्वैर व स्वच्छंदी जीवन किती कृत्रिम आणि दुःखाचं करून टाकलं पाहा ! आपण आपली शय्या सोडून उठतों तें आपली निद्रा पूर्ण झाली म्हणून नव्हे, तर घड्याळांत अमुक वाजले म्हणून. आपण जेवायसाठीं पानावर बसतों तें आपणाला भूक लागेल तेव्हां नव्हे, तर दुपारच्या अगर रात्रीच्या जेवणाची वेळ झाली असं घड्याळांत दिसेल तेव्हा. रात्रीं घड्याळांत अमूक वाजलेले दिसले की निजायचं अशा कृत्रिम संकेतानं आपण निजतों. अंथरुणावर अंग टाकल्याबरोबर झोंप लागावी इतके आपण खरोखरच थकलों किंवा नाही याचा विचार आपण करीत नाही. आणि अशा प्रकारच्या कृत्रिम दिनचर्येमुळं अन्न व निद्रा यांच्या उपभोगांतलं सुख ,तर आपण क़मी करतोंच, पण शिवाय आपलं आरोग्यहि आपण बिघडवून घेतों. घड्याळाच्या या सासुरवासाची विलक्षण चीड येते अन् वाटूं लागतं, ज्या ठिकाणीं घड्याळसुद्धा दृष्टीस पडणार नाहीं अशा ठिकाणीं जाऊन चार दिवस मजेनं घालवितां आले तर त्यासाठीं पडेल तो मोबदला द्यावा !

खरंच, मला जर कुणीं विचारलं, ' अगदीं नमुनेदार सुटीची तुमची कल्पना काय आहे ? कुठं जावंसं तुम्हाला वाटतं ? अन् कसे दिवस घालवावे अशी तुमची इच्छा आहे ? ' तर मी उत्तर देईन, की ' कुठें तें

मी कांहीं सांगत नाहीं, कारण जिथें जावंसं वाटावं अशीं रम्य रम्य ठिकाणं असंख्य आहेत; पण जिथें जायचं तिथला मुक्काम कमालीचा सुखदायक करायचा असेल तर घड्याळ मुळीच बरोबर घेतां कामा नये अन् सुटीच्या ठिकाणीं गेल्यावर चुकूनसुद्धां घड्याळाची आठवण होतां कामा नये एवढं मात्र मी खचित म्हणेन. वक्तशीर काम करून करून आलेला थकवा घालविण्यासाठीं सुटी घ्यायची अन् त्या वेळींसुद्धां घड्याळाच्या तंत्रानं सारे व्यवहार संभाळायचे, तर मग सुटी घ्यायची तरी कशाला? एखाद्या बादशाही हॉटेलांत जायचं अन् बिल द्यायला खिशांतले पैसे पुरतील की नाहीं याची चिंता करीत पदार्थ बेतानं मागवायचे, असली दरिद्री चैन मला मुळीच पसंत नाही बिलाबद्दल अगदी बेफिकिरी ठेवतां येत असेल तरच मोठ्या हॉटेलांत माणसानं जावं. अन् तद्वतच स्थलकालाची आणि स्वतःच्या प्रतिष्ठेचीं सारीं बंधनं अजिबात झुगारून देतां येत असलीं तरच माणसानं विश्रांतिदाखल मुशाफरी करावी.

या दृष्टीनं समुद्रकांठचं एखादं खेडेगाव विश्रांतीला सर्वांत योग्य ठिकाण मी समजतों. अंथरुणांत लोळत पडण्याचा कंटाळा येईल तेव्हांच उठावं, लहर लागेल तेव्हां पोहण्यासाठीं समुद्रांत शिरावं, डुंबण्याचा कंटाळा आल की किनाऱ्यावरच्या मऊमऊ रेतींत पडून जलपृष्ठावर नाचणाऱ्या मचव्यांची आणि आभाळाची अवीट शोभा मनसोक्त पाहावी, तसं पडून राहाण्याचा कंटाळा आला कीं पुन्हा पाण्यांत बुडी मारावी, किनाऱ्यालगतच्या नारळींच्या झाडांखालून हवं तेवढं भटकावं, सपाटून भूक लागेल तेव्हांच जेवावं, आणि थकलेल्या शरिरानं झोपेची मागणी केल्याबरोबर शय्येवर अंग टाकावं अशा मिजासखोर, लहरी, स्वच्छंद दिनचर्येची मौज काय वर्णावी! उत्तर ध्रुवाकडल्या कुठल्याशा एका प्रदेशांत सहा महिने दिवस आणि सहा महिने रात्र असते म्हणे. सूर्याच्या स्मरणाचे चोवीस भाग करून घटका प्रहरांच्या तालावर नाचण्यास मनुष्याला भाग पाडणाऱ्या घड्याळाला त्या प्रदेशांत कुठून स्थान असणार? अनिर्बंध विश्रांतिसुखाच्या साऱ्या कल्पना अनुभवायला तो प्रदेश सर्वांत योग्य ठरेल खरा.

पण त्या प्रदेशांत मनुष्य गेला, की थंडीनं गोठून मरतो म्हणतात. म्हणजे अखेरची विश्रांति ज्याला हवी असेल त्यानंच तिथें जावं असं दिसतं. मात्र उत्तर ध्रुवावरच्या विश्रांतीची अव्यवहार्य कल्पना सोडून दिली तरी मी जें वर म्हटलं तें कांहीं खोटं ठरत नाही. मी तर असं म्हणेन, की सवड असेल तेवढी लहानशीच विश्रांति घेतांना मनुष्यानं घडयाळाचा विचार सर्वस्वीं मनावेगळा करायला शिकावं व आठवडयांतून एक दिवस शक्य नसेल तर निदान महिन्यांतून तरी एक दिवस असा काढावा, की ज्या दिवशीं उठल्यापासून निजेपर्यंत घड्याळांत किती वाजले तें पाहून व्यवहार करण्याऐवजीं अंतःस्फूर्तीनं मन मानेल त्याप्रमाणें वागतां येईल! मला कुणीं पुरेशी सत्ता दिली व एक नमुनेदार गांव निर्माण करायला सांगितलं तर त्या गांवाची वसाहत करतांना मी पहिली काळजी घेईन ती ही, की तिथें कुठंहि घडयाळ दिसणार नाहीं, घरांत अगर दुकानांत घडयाळ ठेवणाराला जबर शिक्षा दिली जाईल, व त्या गांवांत प्रवेश करण्यापूर्वीं प्रवाशांजवळचीं घडयाळं जप्त करून नाहीशीं करण्यांत येतील. अशा या गावांत नेहमी राहाणाऱ्या माणसांचं तर आरोग्य उत्तम राहीलच; पण तिथें येऊन चारसहा दिवस राहून जाणारे मुशाफिरसुद्धां अधिक प्रसन्न व आनंदी वृत्तीनं परत जातील याबद्दल मला शंका नाहीं.

मुंबईचे एक मोठे गृहस्थ इतके वक्तशीर होते की त्यांच्या येण्या-जाण्यावरून लोक आपलीं घडयाळं लावीत अशी आख्यायिका ऐकतों, असल्या वक्तशीरपणाबद्दल मला आदराऐवजी कीव मात्र वाटते. अहो, आयुष्य म्हणजे काय एक रेल्वे-स्टेशन आहे की जिथें व्यवहाराच्या साऱ्या गाड्या अगदी मिनिटंसेकंदें लावून वेळच्या वेळीं आल्या गेल्या पाहिजेत? ज्या मनुष्याला कधीच कुठें जायला उशीर होत नाहीं त्याचं जिणं मी व्यर्थ समजतों. मनुष्याला उशीर केव्हां होतो? ज्या गोष्टीपुढें वेळेचं भान राहूं नये अशा एखाद्या गोष्टींत तो गुंतेल तेव्हां. अशा प्रकारें वेळेची शुद्ध नाहीशी करून गुंतविणारी एकहि प्रिय गोष्ट ज्याच्या आयुष्यांत नाहीं त्याचं जीवित काय माणसाचं जीवित म्हणायचं? मनुष्याला कोणत्या ना

कोणत्या एका तरी गोष्टीची अशी वेडी आवड असायला पाहिजे, कीं जिच्या नादानं त्याला घड्याळाचा पूर्ण विसर पडेल. संगीत, चित्रकला, क्रिकेट टेनिससारखा खेळ, पत्ते, गंजिफा–कसलाहि का होईना, मनुष्याला एक षोक असा असावा, की त्यामुळें त्याच्या आयुष्यांतला वक्तशीरपणा थोडा तरी नाहींसा होईल. एखाद्या विषयाचं अगर वस्तूचं वेड आणि घड्याळ यांचं स्वभावतःच वाकडं आहे. जीं माणसं आपले सारे उद्योग अगदीं घड्याळ लावून वेळच्या वेळीं उरकूं शकतात त्यांना त्यांतल्या कुठल्याच उद्योगाबद्दल अनावर प्रीति वाटत नसावी; व उलट ज्या माणसांचं अंतःकरण कशानं तरी वेडावून जातं त्यांची तुम्ही अमुक ठिकाणीं घड्याळ लावून वाट पहायची म्हटलंत तर तुमची निराशा झाल्यावांचून राहाणार नाही. घड्याळाच्या दैवताला स्मरून वक्तशीर वागणारीं माणसं कितीहि मोठ्या पदाला चढलीं तरी त्यांचा मोठेपणा सामान्यच असतो. उलट ज्यांना कसला तरी निदिध्यास लागला व ज्यांना कालगतीची शुद्ध राहिली नाहीं, त्यांनीच मानवजातीचं कायमचं कल्याण करण्यासारखीं महत्कृत्यं करून दाखविलीं. मुंबई शहरांतून हिंडतांना उंचउंच मनोऱ्यांवरचीं मोठमोठीं घड्याळं पाहिलीं, की माझ्या मनांत येतं, सामान्य बुद्धीच्या अन् मर्यादित कर्तृत्वाच्या माणसांसाठीं आहेत हीं घड्याळं. त्यांकडे पाहून ज्यांनी घड्याळाची गुलामगिरी मानली त्यांचं स्मरण होण्यापेक्षा ज्यांनी घड्याळाचा अंमल न जुमानतां, वेळेचं भान न ठेवतां कांहीं तरी प्रचंड उद्योग करून दाखविला त्यांचं स्मरण लोकांना झालं तर तें अधिक श्रेयस्कर आहे. पुष्कळदां मी घड्याळाकडे पाहतों तें त्यांत किती वाजले तें पाहाण्याठीं नव्हे, तर ज्यांनी किती वाजले ही चवकशी कधीच न करतां कोणत्या तरी शास्त्रावर, विद्येवर अगर व्यक्तींवर मनःपूत प्रेम करण्याचा षोक केला त्यांचं पुण्यस्मरण मला क्षणमात्र का होईना घडावं म्हणून !

## नं. ३ : सुभाषितं

आमच्या विसूभाऊंना सुभाषितांचा फार षोक. इंग्रजी, संस्कृत, मराठी आणि गुजराथी अन् कानडीसुद्धां वाचण्यांत अगर ऐकण्यांत येतील, तीं सुभाषितं ते मोठ्या काळजीनं टिपून ठेवीत असतात. या कामासाठीं त्यांनीं एक मोठी जाड पुठ्ठयाची वही तयार केली आहे. तिची भक्कम बांधणी करून घेऊन तिच्या मुखपृष्ठावर रेखीव नक्षीसुद्धां त्यांनीं काढून घेतली आहे. एखादं नवं सुभाषित आढळलं कीं त्यांनीं तें या अगडबंब वहींत दाखल केलंच म्हणून समजावं. एखाद्या योद्ध्याला आपल्या शस्त्रागाराचा अभिमान असावा तसा त्यांना आपल्या या सुभाषित-भांडाराचा अभिमान आहे. मुखोद्गत केलेल्या सुभाषितांचा ते खरोखरीच शस्त्राप्रमाणें उपयोग करतात. आमच्या मंडळींत एखाद्या विषयावर वाद निघाला कीं विसूभाऊंची गंमत पाहाण्यासारखी असते. आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ मुद्दे पुढें मांडले पाहिजेत हें त्यांच्या गावींसुद्धा नसतं. स्वतःच्या सिद्धान्ताला पोषक अशीं पाठांतरांतलीं जेवढीं सुभाषितं त्यांना आठवतील तेवढीं ते भराभर म्हणून दाखवितात, आणि अगदीं युद्ध जिंकल्याच्या आवेशानं विचारतात, "झालं? आतां बोला." प्रतिपक्षाच्या अंगावर चार सुभाषितं फेकलीं कीं तो गारद झालाच पाहिजे अशी त्यांची अगदीं प्रामाणिक समजूत असते. सुभाषितं म्हणून दाखविल्यावर पुढें वादाला जागा ती कुठं उरली असं त्यांना मनापासून वाटतं. अगदीं तुच्छतेनं ते आम्हांला म्हणतात, "बस् करा हो. या सुभाषितांवर तुमचं कांहीं म्हणणं असेल तर बोला. उगीच गमजा नको आहेत मला."

एके दिवशीं मानवी जीवितांत पुरुषाचं स्थान श्रेष्ठ की स्त्रीचं याबद्दल आमच्या मंडळींत वाद निघाला. विसूभाऊ म्हणाले, "अर्थात् स्त्रीचं."

अन् मग त्यांना खिजवून वादाला रंग आणण्यासाठी आम्ही सर्वांनी मुद्दामच त्यांच्याविरुद्ध पक्ष घेतला. आम्ही एकेकांनीं मारे इतिहास, प्राणिशास्त्र, अर्थशास्त्र अशा विषयांतल्या पंडितांचं म्हणणं सांगायला आरंभ केला. पण विसूभाऊ आपलं म्हणणं सोडीनात. त्यांनी भराभर सुभाषितं म्हणून दाखवायला सुरवात केली अन् अखेर ते म्हणाले, " तुमचे सारे मुद्दे आता एकाच सुभाषितानं उडवून देतों बघा. ' जिच्या हातीं पाळण्याची दोरी ती जगातें उद्धारी. ' The hand that rocks the cradle rules the world. आता यापुढं तुम्ही काय बोलणार ? गप्प बसा झालं ! " नेहमीचा आमचा असा क्रम असे की विसूभाऊंच्या तोंडचं असं कांहीं निर्वाणीचं सुभाषित ऐकलं, की " शाबास, शाबास विसूभाऊ ! " असं म्हणून खोखो करून हसायचं अन् वादच सोडून द्यायचा. पण आज मीं मनांतल्या मनांत ठरविलं होतं, की विसूभाऊंचं अस्त्र त्यांच्यावरच उलटवून पाहायचं. म्हणून मीं त्यांना म्हटलं,

" अहो विसूभाऊ, तुम्ही नेहमी आमच्या तोंडावर सुभाषितं फेकून आम्हांला गप्प बसवीत असतां. पण आज मी नाही हार खाणार हं. कारण सुभाषितांची खरी योग्यता कितीशी मानायची याबद्दलचंच एक सुभाषित मला सापडलं आहे. "

आपल्याला एक नवं सुभाषित ऐकायला मिळणार या उत्सुकतेपुढं ते आपल्या अंगावर येणार याचं भान विसूभाऊंना राहिलं नाही. ते म्हणाले, " होय ? सांगा, पाहूं, सांगा. "

पाठ केलेलं सुभाषित म्हणून दाखविण्याच्या स्वरानं मीं म्हटलं, " सुभाषितं हीं कचकड्याच्या खुळखुळ्यासारखीं आहेत. "

तें ऐकतांच मंडळींत एकच हशा पिकला.

विसूभाऊ मनांतल्या मनांत थोडेसे वरमले असले पाहिजेत; पण मुद्रेवर तसं कांहीं न दाखवितां त्यांनीं विचारलं, " या सुभाषिताचा अर्थ काय बुवा ? "

मीं म्हटलं, "अर्थ उघड आहे. तो असा, की सुभाषितं क्षणभर वाजवायचीं अन् सोडून द्यायचीं इतक्याच योग्यतेचीं. कचकड्याचे खुळखुळे जरा आपटले अगर दाबले की मोडून जातात तद्वत् तर्काची कठीण कसोटी सुभाषितांना लावली की त्यांचे तुकडे होतात. तेव्हां काय समजलांत विसूभाऊ, सुभाषितं म्हणजें नुसते खुळखुळे! सोडून द्या तुमचा फाजील अभिमान सुभाषितांबद्दलचा!"

हें ऐकतांच विसूभाऊ खरोखरच गप्प बसले.

"सुभाषितं म्हणजे खुळखुळे हें सुभाषित कुणाचं आहे?", असं जर विसूभाऊंनी विचारलं असतं तर मला चांगलीच थाप देणं भाग होतं. कारण तें मीं कुठल्याच ग्रंथांत वाचलेलं नव्हतं. मींच बनवलं होतं तें. मात्र तें जरी मीं कुठल्याहि जाड्या ग्रंथांतून घेतलेलं नसलं तरी त्यावर माझा विश्वास होता अन् अजूनहि आहे. सुभाषितांत अगर लोकांच्या तोंडीं रूढ झालेल्या कविवचनांत सत्यांश फार थोडा असतो. इतकंच नव्हे तर पुष्कळदां त्यांत सत्याशीं प्रतारणा केलेली असते.

येशू ख्रिस्ताचं एक प्रसिद्ध सुभाषित आहे. तें असं, की "स्वर्गाचं साम्राज्य लहान बालकांसाठीं राखून ठेवलेलं आहे." "मुलं आणि फुलं हीं सारखींच" या सुभाषिताचा उच्चारहि आपण कांहीं थोड्या वेळां करीत नाहीं. "रम्य तें बालपण" ही कै. कोल्हटकरांच्या एका नाटकांतल्या पदाची पहिली ओळ फार लोकप्रिय आहे. या सुभाषितांचा आधार घेऊन मोठीं माणसं लहान मुलांना नेहमीं म्हणतात, "बाळांनो, तुम्ही फार सुखी आहांत रे. मोठेपणाच्या यातना आमच्या आम्हांला माहीत!" "लहानपण दे गा देवा" हा तुकारामबुवांच्या अभंगांतला चरण मोठ्या श्रद्धेचं नाटक करून म्हणून दाखवायला सुद्धा आपण कमी करीत नाहीं. सुभाषितांचे असे खुळखुळे वाजविले की लहान मुलांचं रडणं थांबतं. पण तसाच विचार केला, तर यांपैकीं एक तरी सुभाषित सत्य आहे काय?

येशू ख्रिस्ताचंच सुभाषित घ्या. लहान मुलांचा स्वभाव निर्व्याज अन् निष्कपट असतो अशा समजुतीनं तें सुभाषित बनविलेलं आहे. पण लहान

मुलांचा स्वभाव खरोखरच असा असतो काय? तुमच्या घरांतलीं, शेजारचीं, शाळेंतलीं मुलं कशीं वागतात तें नीट पाहा आणि सांगा. किडे, माशा, फुलपाखरं पकडून त्यांचे हाल करणं, पक्ष्यांना, कुत्र्यामांजरांना धोंडे मारणं, एकमेकांना चिमटे घेणं, चावणं, स्वतःच खोडी काढून भोकाड वासणं, दुसऱ्यावर खोटा आळ घेणं, दुसऱ्याला मारलेलं पाहून आनंदानं हसणं, रडणं, हट्ट करणं, शिव्या देणं हाच लहान मुलांचा खरा स्वभाव. या वस्तूला निष्पाप अन् निष्कपट म्हटलं म्हणजे भागलंच! लहान मुलांच्या स्वभावांत माधुर्याचा अन् प्रेमाचा मुळींच भाग नसतो असं नाहीं माझं म्हणणं. पण स्वर्गाचं साम्राज्य त्यांच्यासाठीं राखून ठेवायची आपली नाहीं बुवा तयारी. निदान तसल्या त्या स्वर्गांत जायची आपली कांहीं सहाजासहजी छाती व्हायची नाहीं.

" रम्य तें बालपण " असं सांगून मोठेपणाची हाव धरण्यापासून लहान मुलांना आपण परावृत्त करतों. पण त्या सुभाषितांत तरी सत्यांश कितीसा आहे? " गरिबी फार सुखाची. अरे, श्रीमंतीच्या विवंचना तुला काय माहीत?" असं म्हणून दरिद्री माणसाला गरिबींतच राहायला श्रीमंत सांगतो त्यांतलाच हा प्रकार.

लहानपणाचे तोटे आणि त्या वेळच्या मनाच्या यातना मला अजून आठवतात. माझे वडील नोकरीनिमित्त वारंवार फिरतीवर जात. ते गांवाला निघाले की प्रत्येक वेळीं माझ्या मनांत येई, कीं मी लहानाऐवजी मोठा असतों तर मी सारखा गांवाला गेलों असतों. किती तरी गांवांचीं नांवं मी अभ्यासाच्या पुस्तकांत वाचीत असे! थंड हवेचीं ठिकाणं, क्षेत्राचीं ठिकाणं, राजधान्या, बंदराचीं शहरं, एक ना दोन! एका गांवीं संत्र्यांची लयलूट होती, दुसऱ्या एका गावीं सफरचंद, अंगूर यांच्या गाड्याच्या गाड्या भरून बांजारांत येत असत, अन् तिसऱ्या एका गावीं एक आणा दिला की ट्रॅममध्यें बसायला मिळत होतं. पण यांपैकीं एकाहि गावाला मला जातां येत नव्हतं. कारण मी लहान होतों!

शाळेंतून जातां येतां नाटकांच्या आणि सर्कशींच्या मोठमोठ्या जाहिराती

भिंतींवर लागलेल्या मला दिसत असत. 'कीचकवध', 'कांचनगडची मोहना', 'राणा भीमदेव'—किती सुंदरसुंदर असलीं पाहिजेत हीं नाटकं! तशीच 'छत्रे यांची ग्रेट इंडियन सर्कस,' 'देवल यांची ग्रँड सर्कस'- किती विलक्षण, अद्भुत रोमांचकारी कामं असलीं पाहिजेत जाहिरातींतल्या चित्रांत दाखविलेल्या त्या खेळाडूंचीं आणि पशूंचीं! आमच्या वाड्यांतले मोठे पुरुष रात्रीचं जेवण आटपून काळ्या आपटीत खुशाल घराबाहेर पडत अन् पलीकडच्या घरांतून कुणीं विचारलं तर ओरडून सांगत, "सर्कसला जातों. कां? येणार का तात्यासाहेब?" मला त्यांचा विलक्षण मत्सर वाटे. मला सर्कसला जायचं म्हटलं तर वडिलांची परवानगी घेणं भाग होतं अन् ती काढण्यासाठीं त्यांच्यापुढं उभं राहाण्याची नुसती कल्पना आली तरी माझे पाय लटलट कापूं लागत होते. या मोठ्या लोकांना कुणाची परवानगी काढावी लागत नाहीं, पण मी लहान आहे, केव्हां हें माझं लहानपण संपेल एकदाचं अशा विचारांनीं माझं मन अगदीं व्याकुळ होऊन जाई आणि मग रस्त्यांत मिळालेली सर्कसची छोटी रंगीत जाहिरात पुनःपुन्हा वाचीत आणि लाकडी टिपावर चारी पाय ठेवून सोंड उंच करून उभ्या राहिलेल्या हत्तीच्या चित्राकडे न्याहाळून पाहात मी आपल्या अंथरुणावर किती तरी वेळ जागा राहात असे. निजतांना मी अगदी निश्चय करीत असे, कीं आपण आतां अगदी लवकरच मोठं व्हायचं. वय वाढविण्याची गोष्ट माझ्या हातांतली नव्हती याचं भान त्या वेळीं उरलं असतं तर मग तें लहानपण कसलं?

माझ्या मामांच्याबरोबर मी सासवडला गेलों तो मला आठवणारा माझा आगगाडींतला पहिला प्रवास. मी आदल्या दिवशीं वाड्यांतल्या सगळ्या मुलांना अभिमानानं सांगत सुटलों, "उद्या मी सासवडला जाणार." विलायतला जाण्याचा बेतसुद्धां मी कांहीं अधिक अभिमानानं बोलून दाखविला नसता. दातारांच्या काशीनं मला विचारलं, "सासवड किती लांब आहे रे?" तेव्हां मी खुशाल तिला सांगितलं, "खूप खूप लांब आहे. उद्या संबंध दिवस मी गाडींतच असेन म्हणेनास." तिची आई जवळच डाळ तांदूळ निवडीत बसली होती. ती तिला म्हणाली,

" अग, त्याचं काय ऐकतेस तूं ? या इथं आहे सासवड. गाडींत बसलंसं करायचं अन् उतरायचंच. " तें ऐकून मला फार राग आला काशीच्या आईचा. सासवड खूप लांब आहे अन् मला गाडींत पोटभर बसायला मिळणार अशी काशीची समजूत झाली असती तर हिच्या काकाचं काय ज़ात होतं ? जशी कांहीं स्वतः कधी अगदीं खोटं बोलतच नसेल.

बाकी लांब प्रवास करायला मिळणार अशी काशीजवळ फुशारकी मारण्याची माझी इच्छा जरी पुरी झाली नाही तरी एकदोन तासांसाठीच का होईना, आज प्रथम आपल्याला गाडींत बसायला मिळणार म्हणून जायच्या दिवशीं मी अगदी आनंदांत होतों. आई, बाबा सगळ्यांपेक्षां मामांच्याविषयी अधिक प्रीतीचा उमाळा मला त्या दिवशीं वाटत होता. पण आम्ही स्टेशनवर जाऊन आगगाडीच्या एका डब्यांत बसल्यावर माझ्या आनंदाला एकदम धक्का बसला. कारण मी जेव्हां मामांना म्हटलं, " माझं तिकीट कुठं आहे मामा ? तें माझ्या खिशांत ठेवायला देतां मला ? " तेव्हां ते म्हणाले, " अरे, तुला कसलं तिकीट ? तूं लहान आहेस अजून. " तें ऐकून फुकट आगगाडींत बसायला मिळणार म्हणून आनंद होण्याऐवजी जगाच्या दृष्टीनं आपली तिकिटाएवढीसुद्धां किंमत नाही असं मनांत येऊन मला मनस्वी राग आला. मी आगगाडींत बसलों काय अन् न बसलों काय सारखंच होतं जगाच्या दृष्टीनं ! माझं अस्तित्वच मानायला तयार नव्हती रेल्वे कंपनी ! " तुला एक संत्र घेऊन देऊं कां " म्हणून मामांनी विचारलं तेव्हां " कांही नको मला " असं म्हणून मी खिडकींतनं बाहेर पाहायला लागलों. तितक्यांत पांढरा शुभ्र ऐटबाज पोषाख केलेला एक इसम आमच्या डब्यांत शिरला. त्यानं मामांचं तिकीट पाहिलं अन् विचारलं, " या मुलाचं तिकीट कुठं आहे ? "

मामा म्हणाले, " तो लहान आहे. "

" तीन वर्षांच्या आंतला ? "

" हो. "

मी म्हटलं, " नाही हो. मागच्या गुरुवारीच माझा वाढदिवस झाला तेव्हां आई म्हणाली, ' तूं आतां कांहीं लहान नाहीस. पांच वर्षं पुरीं

झालीं तुला.' अन् हें बघा, मी मराठी दुसरींत आहे. तीन वर्षांच्या आंतला मुलगा असतो होय मराठी दुसरींत?"

मग मामांना माझं अर्धं तिकीट काढावं लागलं. त्यांनीं माझ्यावर खूप दातओठ खाल्ले; पण मी मनांतल्या मनांत खूप आनंदांत होतों. अर्ध्या तिकिटाइतकी तरी माझी किंमत आहे असं मी सिद्ध करून घेतलं होतं. अर्ध्या तिकिटाचा तो पिवळ्या रंगाचा जाड तुकडा मला माझ्या मोठेपणाच्या सर्टिफिकिटासारखा वाटला. मग सासवडचं स्टेशन येईपर्यंत मोठ्या खुषींत होतों मी.

अशा किती तरी लहानपणच्या गोष्टी! त्या आठवल्या कीं, "लहानपण दे गा देवा" असल्या सुभाषितांचा फोलपणा मनांत आल्यावांचून राहात नाहीं. "बाळपणींचा काळ सुखाचा आठवतो घडिघडी" असं कवीनं गीत रचलं तें तो मोठा झाल्यावर! मोठेपणांतलीं कांहीं ठराविक विशिष्ट दुःख आहेत. तीं फार बोचूं लागलीं, कीं मनुष्य मान वळवून आपल्या बालपणाकडे पाहातो आणि त्या वेळीं आपल्याला या चिंता नव्हत्या याचा अर्थ कसल्याच चिंता नव्हत्या असा करून तो काळ तो आपल्या कल्पनेनं रम्य ठरवितो. "तूं नेहमी लहान राहायला कबूल आहेस का?" असं एक लाख मुलांना विचारा अन् एक तरी कबूल होतो का बघा! त्यांच्यांपैकीं प्रत्येकजण म्हणेल, "आम्हांला मोठेंपणच अधिक रम्य वाटतं." "मोठेंपण दे गा देवा" अशीच प्रार्थना प्रत्येक लहान मूल झोपीं जाण्यापूर्वीं करीत असलं पाहिजे. लहानपणाबद्दलच्या सुभाषितांत सत्यांश अगदी कमी आहे. किंबहुना कुठल्याच सुभाषितांत तो फारसा नसतो. "सुभाषितं हीं खुळखुळ्यांसारखीं" हेंच खरं.

पण "सुभाषितं हीं खुळखुळ्यांसारखीं" हेंहि एक सुभाषित झालं की! बरं, होईना का. तें तुम्ही नुसतं गमतीखातर वाजविलंत किंवा मोडून टाकलंत तरी मला सारखीच पर्वा. त्याच्या सहाय्यानं मी आमच्या विसूभाऊंना कायमचं गप्प बसविलं हें काय थोडं समाधान आहे मला? हें सुभाषित मी स्वतः बनवून दडपून दिलं हें जोंपर्यंत आमच्या विसूभाऊंच्या लक्षांत येणार नाहीं तोंपर्यंत मी व आमची मित्रमंडळी सुखांत आहोंत!

## नं. ४ : रविवार

माझ्या लिहिण्याच्या टेबलासमोर भिंतीवर एक कॅलेंडर आहे; त्यांत बाकीचे सर्व दिवस काळ्या शाईत छापले आहेत, पण महिन्यांतले सारे रविवार तांबड्या रंगांत दाखविले आहेत. सहा सहा घरांच्या अंतरावरचे ते लालभडक आंकडे पाहतांना मी दरवेळीं क्षणमात्र थबकतों. कारण माझी दृष्टि त्यांवर स्थिरावण्याऐवजीं त्यांच्या पलीकडे उडी घेते; व या धावपळीच्या, धकाधकीच्या जीवनांत सापडलेले जे अगणित जीव आपापल्या चक्राभोंवतीं फिरतां फिरतां कॅलेंडरमधल्या रविवारांकडे पाहून विश्रांतीच्या अपेक्षेचा घुटका गिळतात, तेच मला अधिक स्पष्ट दिसूं लागतात. कचेऱ्यांतले कारकून, बँकांतले हिशेब-तपासनीस, सॉलिसिटर्सच्या हाताखालचे टायपिस्ट, शाळामास्तर–अशांची प्रचंड गर्दी माझ्यापुढें उभी राहते. या गर्दींतली प्रत्येक व्यक्ति शिणलेली, थकलेली, गांजलेली आहे, अगदीं टेकीला आलेली आहे, पण हे सारे लोक पुनःपुन्हा कॅलेंडरवरच्या रविवारांकडे पाहतात, विश्रांतीची हिरवळ त्यांना दिसते, आपापल्या जिवाचीं थकलेलीं घोडीं ते पुन्हा दामटतात, अन् मग पत्रांच्या नकला केल्या जातात, लठ्ठ लठ्ठ बुकांत रुपये-आणे-पैचे आंकडे भरले जातात, कज्जांचे कागद तयार होतात, विद्यार्थ्यांचे निबंध तपासले जातात—सारांश, जगाचा एकंदर व्यवहार सुरळीत चालू राहतो. सोमवारपासून शनिवारपर्यंतचे कामाचे सहा दिवस आहेत म्हणून मानवी आयुष्याचा अवाढव्य व्याप उरकला जात आहे, अशी तुमची समजूत असेल तर ती चुकीची आहे. काम न करण्याचा रविवार आहे म्हणून सारीं कामं सुरळीत चाललीं आहेत! विश्रांतीचं आश्वासन देणारा रविवार यायचा असतो म्हणून तुम्ही-आम्ही सहा दिवस कष्ट करतों.

रविवारचं आकर्षण नजरेच्या टप्प्यांत सतत असतं, म्हणूनच माणसं आधींचा सहा दिवसांचा खडतर प्रवास करूं शकतात.

मात्र हें आकर्षण असं चमत्कारिक आहे अन् इतकं चिवट आहे, कीं रविवारी प्रत्यक्ष विश्रांति मिळाली नाहीं तरी तें नष्ट होत नाहीं किंवा कमीहि होत नाहीं. तसा विचार केला तर मनाजोग्या पूर्ण विश्रांतीचा रविवार आपल्या वांट्याला क्वचितच येतो. सामान्यतः तुमचा आमचा अनुभव असा, कीं रविवाराकडे मोठ्या आशेनं डोळे लावावे अन् प्रत्यक्ष रविवार उजाडावा तों रोजच्यापेक्षांहि अधिक कामाचा अन् कटकटीचा! माझे मित्र 'नानाजी' कमिशनरच्या ऑफिसांत कारकून आहेत. रविवार आला, कीं मग आपण साहेबाचे चार चव्वल थोडेच लागतों, मनःपूत आळसांत घालवूं मग आपण तब्बल चोवीस तास; अशीं सुखस्वप्नं ते शनिवारीं रात्रीपर्यंत मनाशीं रचीत असतात. पण रविवार उजाडल्यापासून त्यांचीं तीं स्वप्नं भग्न व्हायला प्रारंभ होतो उठल्याबरोबर बाप्या वर्तकाकडे जाऊन चहा उकळायचा त्यांनीं बेत केलेला असतांना, तोंड धुताधुतांच "काय नानाजी, उठलांत कीं नाहीं?" अशी बाप्याचीच हाक त्यांना ऐकूं येते, अन् मग आतां त्यालाच उलट चहा देणं भाग आहे अशा दारुण विचारानं येणारी मूर्च्छा कशीबशी सावरून खोटी बत्तीशी दाखवीत त्यांना पुढें व्हावं लागतं. आणि बाप्यानं केलेला हा अपशकुन त्यांना नंतर दिवसभर भोंवतो. थोरल्या दामूचं इंग्रजी पांचवं रीडर आज विकत घ्यायलाच पाहिजे असतं, केशाच्या छत्रीचा दांडा आज बसवून आणल्या-वाचून सोय नसते, छबीला शाळेच्या संमेलनाच्या नाटकांत काम मिळालेलं असतं तें तिला नवी साडी घेऊन दिली नाहीं तर तिच्या बाई तिच्याकडून काढून घेणार असतात, स्टोव्ह कित्येक दिवस बिघडलेला असतो तो दुकानांत नेणं अगत्याचं असतं—एक ना दोन, अशा हजार कामांची यादी त्यांच्या हातीं पडते, अन् नानाजी चरफडत घराबाहेर पडतात. त्यांना घरीं परत यायला एक वाजतो. जेवल्यानंतर ते जरा आडवे होतात न होतात तो चाळीच्या

गणपति-उत्सवाचे चिटणीस वर्गणी मागायला येतात. त्यांना पोंचवायला ते दाराशीं जातात तोंच कापड-दुकानदाराचा मनुष्य बिल मागायसाठीं प्रगट होतो; आणि असल्याच नको असलया माणसांची मग वर्दळ सुरू होऊन त्यांच्या संकल्पित रविवारची दुर्दशा उडते. नानाजींचे बहुतेक रविवार अशाच मासल्याचे असतात. परंतु तरी देखील प्रत्येक सोमवारीं कचेरींत जाऊन अंगांतला कोट काढून नोकरीचं जूं मानेवर घेतांना ते कॅलेंडरांतल्या रविवारकडे पाहतात व मनाशीं म्हणतात, "थांबा, आतां या रविवारीं अशी विश्रांति घेतों! मी कुणाचा नाहीं अन् कुणी माझं नाहीं! बा ऽ ऽ स्! " अन् असं स्वतःशीं पुटपुटलं, कीं त्यांना नवीन सामर्थ्य येतं, मानेवरच्या जोखडाचं ओझं त्यांना सुसह्य वाटतं!

मला स्वतःला तर रविवारच्या या ठकबाजीचा इतका अनुभव आलेला आहे, कीं त्या ठकबाजीसाठींच तो दिवस मला फार प्रिय वाटूं लागला आहे. नाहीं तरी ठकबाजी वाटते तितकी अश्लाघ्य नाहीं. गोड गोष्टींची गोडी टिकवायला अन् वाढवायला तर तिचा फार उपयोग होतो. जो अगदीं सतत प्रामाणिकपणानं वागेल असा प्रियकर हवा, कीं ज्याच्या ठकबाजीवर लक्ष ठेवावं लागेल असा प्रियकर हवा, याचं प्रामाणिक उत्तर स्त्रियांकडून मिळालं तर पहा. "लबाडा! लुच्चा!" असं म्हणण्यांत प्रेमार्त अंतःकरणाला कांहीं एक विशेष समाधान असतं. आईसुद्धां तान्ह्या मुलाचे पापे घेऊन कौतुक करतांना "अरे लुच्चा! अरे लबाडा!" अशा शब्दांनीं त्याचं कौतुक करते कीं नाहीं बघा. कृष्ण कन्हय्या प्रत्येक गोपीला प्रिय होता याचं कारण तो साऱ्या गोपींशीं ठकबाजी करीत होता हेंच. सारांश, ठकबाजी मी वाईट समजत नाहीं; आणि न चुकतां हमखास विश्रांति देणाऱ्या रविवाराऐवजीं ठकबाजी करणारा रविवार माणसाच्या वांट्याला आला हेंच अधिक बरं झालं असं मी मानतों. रविवार मला फसविणार हें मी ओळखून असतों, त्याची फसवेगिरी चालूं द्यायची नाहीं असं मीं मनाशीं योजिलेलं असतं, अन् या गमतीच्या द्वंद्वयुद्धांत जरी बहुधा त्याचाच विजय होतो, तरी एखादे वेळीं माझाहि होतो,

अन् मग जी अनपेक्षित विश्रांति मला उपभोगतां येते तिची मौज किती वर्णावी ! अशा वेळीं मी काय करतों हें माहीत आहे ? आळशीपणाची करतां येईल तेवढी कमाल करतों !

हो, आळशीपणाची ! कारण, खऱ्या विश्रांतीची माझी कल्पना रूढ कल्पनेहून वेगळी आहे. मी मानसशास्त्र वाचतों व कॉलेजांत शिकवतों तरी मीं स्वतःला मानसशास्त्रज्ञ म्हणवीत नाहीं; पण माझे एक स्नेही आहेत ते स्वतःला तसं म्हणवितात. ( असल्या लोकांमुळेंच सामान्य लोकांत शास्त्राची पत राहणं कठीण झालेलं आहे ! ) हे माझे स्नेही नेहमीं पुस्तकांचे आधार देऊन सांगतात, कीं अजीबात काम बंद ठेवणं नव्हे तर कामांत बदल करणं म्हणजेच खरी विश्रांति. मला हें बिलकुल मान्य नाहीं. दुसरं काम करायसाठींच पहिलं थांबवायचं असेल तर मग तेंच करीत राहिलेलं काय वाईट ? तास बदलला कीं दुसरे मास्तर येतात, दुसरा विषय सुरू होतो, म्हणून त्यानं काय विद्यार्थ्याला विसांवा मिळतो कीं काय ? हा न्याय धरला तर मजुरालासुद्धां म्हणतां येईल, कीं बाबा, दगड फोडून थकला असशील, आतां लाकडं फोड म्हणजे तुला विसांवा मिळेल ! तें कांहीं नाहीं, विसांवा म्हटला कीं कामाचं नांव निघतां कामा नये. खटपट, धडपड, धावपळ, सारं बंद झालं पाहिजे. जबाबदारी, तसदी, तकलीफ म्हणून उरतां कामा नये. जिच्यासाठीं अट्टाहास करावा लागेल अशी चैनदेखील उपयोगाची नाहीं !

रविवारीं अमक्या नाटकाला जायचं, अमका चित्रपट बघायचा, अमकी मॅच पाह्यची, अमक्याला चहाला बोलवायचं किंवा अमक्याच्या घरीं जेवायला जायचं असे कार्यक्रम आंखून लोक आपल्या सोन्यासारख्या रविवारचं कसं वांगं करून टाकतात तें मी वारंवार पाहतों. सोमवारीं सकाळीं त्यांचे चेहरे पाहावे तों ओढलेले, त्रासलेले दिसतात. सारा रविवार त्यांनीं विसांव्याची शिकार केलेली असते, व विसांव्याची व त्यांची चुकामूक झालेली असते. कारण सुख, आनंद, विश्रांति या गोष्टीच अशा आहेत, कीं त्यांचा मुद्दाम पाठलाग केला कीं त्या मिळत नाहींत.

त्या सहज येतील तेव्हां पकडाव्या हेंच शहाणपणाचं. सुख हें मुद्दाम अढींत घालून पिकत नाहीं. झाडावरच पक्क होऊन अकस्मात् टपकन् खालीं पडणाऱ्या फळासारखं आहे तें !

म्हणून माझ्या मनाजोगता रविवार आला, कीं मी आळशीपणाची कमाल करणार. अमक्या वेळीं उठलं पाहिजे, अमक्या प्रहरीं जेवलं पाहिजे, कुणाला भेटायला जायचं आहे म्हणून किंवा कुणी भेटायला येणार म्हणून दाढी केली पाहिजे, स्नान केलं पाहिजे, केलं तर इतक्याच वेळांत आटपलं पाहिजे, प्रतिष्ठेला शोभतीलसे कपडे घातले पाहिजेत, टपाल पाह्यलं पाहिजे किंवा पत्राचीं उत्तरं धाडलीं पाहिजेत, लेख तयार केला पाहिजे— असलं कोणतंहि बंधन मी शिल्लक ठेवणार नाहीं ! साऱ्या जबाबदाऱ्यांचं दडपण मी मनावेगळं फेंकून देणार ! हवं तेव्हां उठेन, हवं तिकडे जाईन, हवं त्याच्याशीं बोलत बसेन, हवं तें वाचीन, हवं तें गाणं म्हणेन, हवे ते कपडे करीन, हवं तेव्हां खाईन—किंवा लहर लागली तर पक्षिणीच्या पंखांत अंग ठेवून गप्प राहणाऱ्या पिलाप्रमाणं अष्टौप्रहर अंथरुणांत पडून राहीन !

असा रविवार माझ्या आयुष्यांत अजून आलेला नाहीं. पण तो केव्हां तरी येणार आहे खास ! त्याचीं स्वप्नं मला नेहमीं पडतात. तो आला, कीं आळशीपणाची परमावधि करून खऱ्या विश्रांतीचा उपभोग जन्मांत एकदां का होईना पण मी घेणार आहे. तो आला कीं मी आपल्या डायरींत त्याची सुवर्णाक्षरांनीं नोंद करीन. पण छे छे, करणार नाहीं. निदान त्या रविवारीं तरी नाहीं. कारण त्या दिवशींच्या संपूर्ण आळसाला अन् लहरी-पणाला या लहानशा प्रतिज्ञेचं गालबोट तरी मी कां लागूं देईन !

---

## नं. ५ : नव्या इमारती

माझं लहानपण पुण्यांत गेलं असल्यामुळें त्या शहरांतलीं त्या वेळचीं कांहीं दृश्यं माझ्या स्मृतीवर पक्कीं कोरलेलीं आहेत; अन् आतां इतक्या वर्षांच्या अवधीनंतर प्रसंगवशात् जुन्या आठवणींतल्या एखाद्या स्थळावरून जातांना तिथलं पूर्वीचं स्वरूप नजरेला दिसलं नाहीं, कीं मला क्षणभर बावरल्यासारखं वाटतं, एक प्रकारची सूक्ष्म खिन्नता अनुभवाला येते. जुन्याची जागा ज्या नव्यानं घेतली त्याच्या योगानं शहराच्या सौंदर्यांत अन् लोकांच्या सुखसोयींत भरच पडली आहे हें मनाला पटतं; परंतु जुनं नाहींसं झालं, तें आतां पुन्हा दिसणार नाहीं याबद्दल मनाला हळहळ वाटते ती लवकर दूर करतां येत नाहीं.

उदाहरणार्थ, शनिवार पेठेंतली मुलींच्या शाळेची ही भव्य सुंदर इमारत जेव्हां जेव्हां मी पाहतों तेव्हां तेव्हां अंतःकरणांतल्या कुठल्या तरी खोल कप्प्यांतून एक स्मृति क्षणभर वर येते अन् एका जुनाट वाड्यामागच्या बखळींत चेंडू फळी खेळणारीं दहा पंधरा मुलं अंतश्चक्षूंना दिसूं लागतात. बखळीची ती बिनवारशी पडीक जागा आम्हांला किती प्रिय होती, त्या जागीं आमचे किती सामने झाले, आमचे किती चेंडू विहिरींत पडून अथवा पलीकडच्या आवारांत जाऊन हरवले, कितीदां आम्ही आपापसांत कडाडून भांडलों, पुन्हा एकमेकावांचून गमेनासं होतांच कितीदां आमचे समेट झाले, आणि मोठेपणीं क्रिकेटच्या खेळांत प्रावीण्य संपादण्याच्या सुखस्वप्नांनीं आमचीं वेडीं अजाण मनं कितीदां तरी याच जागीं भरून गेलीं ! या बखळींत एका कोपऱ्यांत एक विस्तीर्ण जुना बकुलवृक्ष होता, अन् बाजूच्या भिंतीला लागून बिट्ट्यांचीं झाडं होतीं. खेळ संपल्यावर तिन्हीसांजांच्या अर्धवट अंधारांत त्या बखळींतच बोलत बसतांना आम्ही त्या झाडांचीं पेल्याच्या आकाराची लांबट सुगंधी पिवळीं फुलं कानांवर खोवीत असूं;

बकुळीची पिकलेलीं छोटीं लाल फळं सापडलीं तर वरच्या पोपटांनीं तीं अर्धवट टोकरून खालीं टाकलीं असलीं तरी त्याची क्षिति न मानतां तीं खात असूं; किंवा जमिनीवर ठिपक्या ठिपक्यांसारखीं पसरलेलीं बकुळीचीं लहान लहान सुकुमार फुलं वेचून घरीं नेत असूं! ही वखळ कोणाच्या मालकीचीं होती आम्हांला माहीत नव्हतं, तिथें आम्ही केव्हां कुणाच्या सांगीनं खेळायला लागलों तेंहि सांगतां आलं नसतं, अन् तिथें खेळायचं आम्ही कधीं अन् कां बंद केलं तें तर मला आतां मुळींच आठवत नाहीं. परंतु त्या स्थळीं किशोरावस्थेंत अनुभवलेलीं सुखदु:खं, मनांत उठलेले हर्षविषाद, अन् मित्रांसमवेत केलेल्या गुजगोष्टी व रचलेले लहानमोठे बेत, म्हणजे माझ्या जीवितांतला एक महत्त्वाचा भाग होता. तो या नव्या भव्य इमारतीनं कायमचा दृष्टीआड केला हें शल्य मनाला टोचत राहतं. त्या इमारतीवरून मी झटकन् पुढें जातों. तिच्याविषयीं कांहींशी अप्रियताच वाटते माझ्या मनाला.

तीच गोष्ट अप्पाबळवंताच्या कोपऱ्यावरून खालीं उत्तरेकडे वळल्याबरोबर दिसणाऱ्या 'प्रभात टॉकीज'च्या इमारतीची. या ठिकाणीं पूर्वी पेशवाई थाटाचा वाडा होता, अन् आमच्या शाळेचे कांहीं वर्ग त्या वाड्यांत भरत असत. वर्गांच्या खोल्या अंधेऱ्या असत, बाकं लांबट अन् भिंतीला टेकून मांडलेलीं असत, वहींत लिहितांना आम्हांला आमच्या मांड्यांचा आधार घ्यावा लागत असे. पण इथेंच स्कॉट, बायरन, टेनिसन, लॉंगफेलो, ॲडिसन, गोल्डस्मिथ इत्यादि लेखकांनीं मला न कळत साहित्यांतलं सौंदर्य वेचायला मला शिकवलं, इथेंच कालिदास अन् भवभूति यांची माझी ओळख झाली, इथेंच मराठ्यांच्या लढायांचीं वर्णनं आम्हीं वाचलीं, अन् गणित विषयांशीं मला निकराचं युद्ध करावं लागलं तेंहि याच जागीं! अन् अभ्यासाच्या गोष्टी सोडून दिल्या तरी, इतर किती तरी गमती या इमारतींत आम्हीं केल्या. मधल्या सुटीच्या तासांत या जिन्यावरून त्या जिन्यावर बेफाम धावत आम्हीं शिवाशिवी खेळूं लागलों, कीं वाड्याचे चार चौक आम्हांला पुरत नसत. इथल्याच वर्गांत असतांना आम्हीं 'पुस्तकांतल्या किड्यां'चीं दप्तरं लपवून ठेवलीं अन्

मास्तर वर्गांत आल्याबरोबर निरुपद्रवी संभावितांसारखे चेहेरे करण्यांत आम्ही सराईत झालों. शाळेंतलाच खडू घेऊन आम्हीं खट्याळ शिक्षकांचीं चित्रं काढलीं तीं इथल्याच फळ्यांवर, आणि संमेलनांतल्या नाटकासाठीं आम्ही वीरश्रीचीं व हास्यकारक भाषणं पाठ केलेलीं ऐकलीं तीं इथल्याच एका दिवाणखान्याच्या भिंतींनीं ! याच जागीं त्या वेळीं नुकतेच जपानला जाऊन परत आलेल्या प्रोफेसर कोसंबीचें भाषण ऐकून जपानला जाण्याचा निश्चय मी मनांतल्या मनांत केला, लोकमान्य टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाली तेव्हां याच वाड्याच्या एका कोपऱ्यांतल्या एकीकडच्या खोलींत आम्हीं गुप्त सभा भरविली, आणि मधल्या चौकांतल्या हौदाच्या चौथऱ्यावर कंठ फुगवून घुमणाऱ्या कपोतयुगुलांचे खेळ पाहून साऱ्या सृष्टिक्रमाच्या बुडाशीं असलेल्या प्रवृत्तीच्या गूढ स्वरूपाची पुसट ओळख माझ्या बुद्धीला झाली तीसुद्धां याच स्थळीं ! त्यामुळें विद्युद्दीपांच्या प्रकाशांत खुलून दिसणाऱ्या या नव्या चित्रपटगृहाची इमारत पाहून मला निर्भेळ आनंद वाटत नाहीं. तिच्याकडे पाहतांच खोल विहिरीच्या कांठावरून खालीं डोकावलं, कीं खालून कुणाचा तरी आवाज झालेला ऐकल्याचा एखादे वेळीं भास व्हावा तसला भास होतो. या शोभिवंत इमारतीनं नष्ट केलेल्या त्या जुन्या वास्तूबरोबर लयाला गेलेल्या माझ्या आयुष्यांतल्या घटना कुठून तरी दुरून, खोल जागेंतून, गुदमरलेल्या आवाजानं मला साद घालताहेतसं मला वाटतं !

अन् माझ्या मनांत येतं, त्या घटनांचीं स्थलं कालवश झालीं याचा अर्थ तितक्या अंशानं मी स्वतः कालावश झालों असाच नाहीं काय ? पुण्यांतला पुष्करणीचा हौद नष्ट झाला. अर्थात् जो मी विद्यार्थिदशेंत मित्रांबरोबर स्नान करतांना त्या मनोहर पुष्करिणीच्या कांठावर बसून पाण्याच्या बादल्या मस्तकावर ओतण्याच्या शर्यती खेळलों, अन् धोतराला गुलाबी छटा चढविण्याच्या ईर्षेनं तें घटका घटका चुबकीत राहिलों, तो मीहि त्या स्थलाबरोबरच तितक्या अंशानं मृत झालों नाहीं काय ?

मला वाटतं, नव्या पिढीला प्रिय वाटणाऱ्या नव्या कालाविषयीं जुन्या पिढीच्या मनांत गुप्त अढी असते ती याचमुळें. नवा काळ अंशाअंशानं

आपल्या वैयक्तिक जीवनाचा उच्छेद करीत आहे असा अनुभव माणसाला येतो अन् त्याच्या आक्रमक शक्तीशीं आपण झुंज करूं शकत नाहीं तर त्याची निंदा तरी करून त्याचा सूड घ्यावा असं मनुष्य मनाशीं ठरवितो. पण हा केवढा वेडेपणा ! असा वेडेपणा मी करणार नाहीं.

कारण, चौफेर पसरत चाललेल्या पुणें शहरांतल्या नव्या शोभिवंत इमारतींकडे पाहून उत्पन्न झालेला विषाद नाहींसा करणारा असाहि एक विचार माझ्या मनांत येतो. ठिकठिकाणीं माझा मृत्यु घडत आहे. घडे ना ? मरतांमरतांच नव्या परिस्थितीचे नवे ताजे कोष धारण करून मी जगत आहे याचा प्रत्यय मला पुनःपुन्हा येत असतांना त्या विनाशाचं दुःख मी काय म्हणून करावं ? होय, मी मनाशीं अशीच समजूत धरली पाहिजे, कीं अंशतः मेल्यावांचून जीवनाची क्रिया सतत चालू राहत नाहीं. छायेवांचून प्रकाश नाहीं तद्वत् मेल्यावांचून जगतां येत नाहीं. जें लयाला जात आहे त्याला कवटाळून अश्रु गाळण्यापेक्षां जें उदयाला येत आहे त्याचं माणसानं स्वागत केलं पाहिजे ना ? राष्ट्राचाच नव्हे, तर व्यक्तींचा जिवंतपणादेखील यावरच अवलंबून आहे. बखळींत खेळणारा मुलगा कालवश होई ना ? त्या बखळीच्या जागेवर डौलानं उभ्या राहिलेल्या या नव्या इमारतींतल्या एका दिवाणखान्यांत विद्यार्थिनींना व्याख्यान देऊन आनंदित करणारा वक्ता म्हणून मी पुन्हा प्रगट होऊं शकतोंच कीं नाहीं ! माझ्या विद्यार्थिदशेंतले प्रसंग जिथें घडले ती इमारत नष्ट करून तिच्या जागेवर आधुनिक कालाची पताका फडकविणाऱ्या ‘प्रभात टॉकीज’च्या सुंदर इमारतींतहि मला स्थान आहेच कीं नाहीं ? आहे. अन् हें जर खरं तर या नव्या नव्या टोलेजंग इमारतींचं मीं स्वागत कां करूं नये ?...

मीं त्या चित्रपटगृहांत प्रथम पाऊल टाकलं तेव्हां अशाच कांहींशा विचारांची माझ्या मनांत गर्दी झाली होती. आणि नंतर थिएटरांतले दिवे विझले, पडदा दूर सरकला, आणि आंतल्या रजतपटावर वेणीचा शेपटा जिच्या खांद्यावर खालीं रुळत आहे अशी स्त्री प्रगट होऊन तिनं तुतारीचे उच्च स्वर काढलेले मीं ऐकले, तेव्हां अंतःकरणांतलं सगळं विषादशल्य नाहींसें होऊन मीं मनाशीं म्हटलं, बरोबर आहे, नव्या कालाचं असंच स्वागत केलं पाहिजे !

## नं. ६ : छत्री

मी गॅलरींत उभा राहून त्या छोट्या मुलाची मौज पाहत होतों. पावसाची मोठी सर पडत होती, आणि हातांतली छत्री उघडून डोक्यावर धरण्याऐवजी बंदुकीसारखी खांद्यावर धरून तो खुशाल भिजत चालला होता! भराभर तरी म्हणतां काय? छे, अगदीं धीम्या पावलांनीं! ऐटींत! हसत, निथळत! मोठालीं माणसं रस्त्यानं जात होती तीं कोण घाईनं, आपापल्या छत्र्या अगदीं डोक्याला चिकटून धरून, अन् चिखल उडूं नये म्हणून धोतराचे सोगे वर करून. पण ही चिमुकली स्वारी अगदीं मंदगतीनं पावलं टाकीत चालली होती. रस्त्यावरच्या पाणथळी तो चुकविण्याऐवजीं मुद्दाम शोधीत होता. मस्तकावर पडणाऱ्या जलधारांना जणूं तो म्हणत होता, "बस येवढंच? आणखी जोरानं करा कीं वृष्टि!" पावसापासून स्वतःचं रक्षण करायसाठीं छत्रीचा उपयोग करायचा असतो हें त्याला बिलकुल मान्य नसावं. लहान मुलांना छत्री हवीशी वाटते ती फार निराळ्या उपयोगासाठीं.

तुमचं बालपण आठवून बघा. या मुलासारखेच तुम्ही मुद्दाम भिजत जात नव्हता रस्त्यानं? एखाद्या वयस्क माणसानं "अरे बाळ, छत्री उघड कीं" असं म्हटलं तर "छत्रीचा घोडा मोडला आहे हो" असं उत्तर तुम्हीं देत नव्हतां ऐटीनं! अन् असं उत्तर देण्यांत खोटं बोलण्याचं पाप लागूं नये म्हणून मुद्दाम छत्रीचा घोडा तुम्ही मोडून ठेवीत नव्हतां एखाद्या रस्त्यांतल्या दगडानं? तुम्ही या गोष्टी केल्या नसतील तर तुम्ही कधीं लहान नव्हताच असं मी म्हणेन. तुम्ही एकदम मोठे झालां असलां पाहिजे. लहानपणीं ऊन्हपावसाचा अन् छत्रीचा काय संबंध? त्या वेळीं छत्रीसाठी वडिलांजवळ हट्ट धरायला

असतो, छत्री हवी असते ती काय रवितापाच्या किंवा जलपाताच्या भयानं? छे छे! लहानपणीं छत्री हवी असते ती फार निराळ्या कारणासाठीं, अन् किती तरी अधिक मनोरंजक कामासाठीं!

उदाहरणार्थ, छत्री जवळ असली, कीं क्रिकेट खेळायची केवढी सोय! 'विलो' वृक्षाच्या लाकडापासून बनविलेली बॅट घेऊन क्रिकेट खेळण्यापेक्षां उलट्या छत्रीची बॅट करून रबराचा चेंडू हवेंत उंच टोलविण्यांत किती तरी अधिक गंमत असते! शेजारच्या दामूनं मारे जोरानं रबरी चेंडू फेकावा अन् आपण छत्रीचा फटका लगावून ओव्हर बाउंडरी ठोकावी यांत जें अनुपम सुख आहे तें मोठेपणीं ब्रॅबोर्न स्टेडिअमवर धमाधम उडवून देणाऱ्या बॅट्समनला देखील अनुभवायला मिळणार नाहीं! धटिंगण बंड्यानं आपली खोडी काढली असतां त्याचा समाचार घ्यायचा असेल तर छत्रीसारखं दुसरं उपयुक्त आयुध नाहीं. तिची मूठ त्याच्या तंगडींत अडकवून जरा हिसका दिला, कीं तो हां हां म्हणतां जमीनदोस्त झालाच पाहिजे! ज्युजित्सूंतले सगळे डाव या 'छत्री'पेचापुढें रद्द समजावे लागतील. छोट्या चिंतूनं जेव्हां छत्री घेऊन जर्मनीला निघालेल्या चेंबर्लेनचं चित्र पाहिलं तेव्हां त्याला खात्री वाटली, कीं हिटलरला 'छत्री-पेच' घालायला तो चालला असला पाहिजे. त्याचप्रमाणें उन्हाळ्याच्या सुटींत आंबे चोरायसाठीं बागेंत शिरल्यावर पाडाचीं सुंदर फळं अलगद हस्तगत करायच्या कामीं छत्रीचा केवढा उपयोग होतो! एक छत्री, अन् रखवालदाराची चाहूल लागल्याबरोबर धूम ठोकाय्साठीं दोन भक्कम पाय, येवढं साहित्य सज्ज असलं, कीं गांवाभोंवतालच्या सगळ्या आंबराया आपल्याच मालकीच्या! आणि सोसाट्याचा वारा सुटल्यावर मुद्दाम पाठ फिरवून छत्रींत वारा भरूं देऊन तिच्या बरगड्या उलटलेल्या पाहण्याचा जो विलक्षण गमतीचा खेळ आहे त्याची सर दुसऱ्या कुठल्या खेळाला येईल काय? लहान मुलांना छत्री प्रिय असते ती यासाठीं.

अन् मोठीं माणसंसुद्धां छत्रीचा उपयोग नेहमींच प्रामाणिकपणानं करतात असं म्हणतां येईल काय? मला नाहीं वाटत. समोरून येणाऱ्या

ओळखीच्या माणसाला करावा लागणारा नमस्कार टाळायसाठीं डोक्यावरची छत्री आपला चेहरा दिसूं नये इतकी खालीं करण्याची साळसूद युक्ति तुम्ही एकदांसुद्धां वापरली नसेल? उन्हातान्हापेक्षांहि नको असलेच्या दृष्टिक्षेपांपासून स्वतःचा बचाव करायसाठींच स्त्रिया अधिक तत्परतेनं छत्री वापरतात कीं नाहीं विचारा त्यांना. स्वतःची नजर उघड न होऊं देतां आजूबाजूचं सौंदर्य मनःपूत सावकाश न्याहाळत रस्त्यानं जाणाऱ्याची छत्री उत्कृष्ट सोय करून देते. काळा चष्मा वापरणारे लोक छत्रीऐवजींच त्याचा उपयोग करीत असले पाहिजेत असा मला पुष्कळ दिवस संशय होता; आणि आमच्या रंगेल बाबूरावांनी जेव्हां एके दिवशीं ‘ डॉक्टरच्या सल्लया’ वरून काळया भिंगांचा चष्मा अकस्मात् नाकावर चढविला, व तसा सल्ला मुळींच दिला गेला नव्हता हें जेव्हां मला कळलं, तेव्हांपासून माझ्या त्या संशयाला चांगलीच बळकटी आलेली आहे. थिएटरांतल्या सर्वांत उंच दराच्या जागांना इंग्रजींत ‘ Box ’ म्हणतात, पण मराठींत ‘ चष्मा ’ असं जे त्याचं भाषांतर झालं आहे तेंच जास्त अन्वर्थक आहे. ज्या जागीं बसून स्वतः लोकांच्या दृष्टीस न पडतां भोंवतालचे चेहरे यथेच्छ पाहतां येतात तिला “ चष्मा ” हेंच नांव शोभतं. दुसरं नांव द्यायचंच असेल तर “ छत्री. ”

निवाऱ्याची सुरक्षित एकान्त जागा केवळ एका छत्रीच्या साहाय्यानं उत्पन्न करतां येते. मात्र ती आपल्या समाजांत नव्हे. कारण सारे सामाजिक संकेत व शिष्टाचार त्या एकान्तनिर्मितीला अनुकूल असले तरच ती शक्य आहे. तुम्ही छत्रीचा आडोसा करून चौपाटीच्या वाळूवर पडलांत तर दोन चार मिनिटांतच कुणी तरी येऊन खुशाल छत्री दूर करून तुमच्याकडं पाहून पुढं जाईल. याच्या उलट पाश्चात्य समाजांत छत्रीची शपथ पवित्र मानण्यांत येते अन् कसोशीनं पाळण्यांत येते. ‘ बायबल’ची शपथसुद्धां त्यापुढं फिकी पडेल. रविवारीं किंवा सुटीच्या दिवशीं उघाडी असली कीं विलायतेंत समुद्रकांठच्या वाळवंटांत हजारों रंगीबेरंगी छत्र्यांचा अजस्र तळ पडलेला तुम्हांला दिसेल. एकेका छत्रीचं उघडं घरकुल करून

तरुण जोडपीं स्वछंदानं रमलेलीं असतील, अन् एका छत्रीआड गुजगोष्टींत दंग झालेलीं माणसं एका हातापलीकडच्या छत्रीकडेसुद्धां वावग्या जिज्ञासेची नजर टाकणार नाहींत! उमर खय्याम आज युरोपियन देशांत जन्माला आला तर आपल्या 'रुबायत'च्या आधुनिक आवृत्तींत निस्सीम सुखाची व्याख्या करतांना तो आपल्या प्रेयसीला खचित म्हणेल, "अथांग सागराच्या तीरावर पसरलेल्या रंगेल जनसंमर्दात सामील होऊन, छत्रीचा आडोसा करून, तुझे हात हातांत धरून, मऊ वाळूंत पडल्यापडल्या तुझ्याशीं प्रेमालाप करावेसे मला वाटतात!"

कांहीं माणसांना नाना प्रकारच्या छत्र्या विकत घेऊन त्यांचा संग्रह करण्याचा छंद असतो म्हणतात. मी असा छांदिष्ट मनुष्य अजून पाहिलेला नाहीं. छत्रींच्या बाबतींत विसराळूपणानं वागणारे एक गृहस्थ मात्र माझ्या बरेच ओळखीचे आहेत. ते छत्री कुठें विसरतील त्याचा नेम नाहीं. आगगाडींत, मोटारींत, ट्रॅममध्यें, दुकानांत, जिथें जातील तिथें ते छत्री विसरून येत असतात. त्यांनीं आपल्या लग्नाच्या बायकोपायीं केले नसतील इतके पैसे छत्रीपायीं खचित खर्च केले असले पाहिजेत. शेवटीं त्यांनीं जुनी छत्री विकत घ्यायचं ठरवलं. एवींतेवी दहापंधरा दिवसांच्यावर जर छत्रीचा अन् आपला संसार व्हायचा नाहीं हें ठरलेलं, तर अगदीं कुमारिका छत्री पाहिजे असा हट्ट तरी कशाला, करूं या छत्रीच्या बाबतीत पुनर्विवाह, असा त्यांनीं मनाशीं विचार केला असला पाहिजे. जरीपुराण्याच्या दुकानाकडे त्यांनीं मोर्चा वळवला, अन् अवघ्या बारा आण्यांत त्यांनीं एक छत्री खरेदी करून आणली. ती उघडून दाखवीत ते मला म्हणाले, "बघा, कशी फक्कड मिळाली." मीं त्यांना म्हटलं, "अहो पण हें काय?" त्यांनीं विचारलं "काय?" मीं बोट दाखवून म्हटलं, "तें पहा. पुसट आहे, पण नीट पाहिलंत तर दिसेल." छत्रीच्या आंतल्या बाजूला त्याचं स्वतःचंच नांव होतं! त्यांचा चेहरा छत्रीपेक्षांहि काळा झाला. विलक्षण योगायोगानं स्वतःच्या बायकोशीं तीन वेळां लग्न लावणाऱ्या एका रंगेल बहाद्दराची गोष्ट मीं एका इंग्रजी प्रहसनांत नुकतीच वाचली होती तिची मला त्या वेळीं आठवण झाली.

त्यांच्या हातांतल्या त्या त्या छत्रीकडे पाहून मग मला निराळेच विचार सुचले. माझ्या मनांत आलं, निरनिराळया सतरा ठिकाणांहून जरीपुराण्या-वाल्याच्या दुकानीं गोळा होणाऱ्या असल्या जुन्या छत्र्या आपापला इतिहास सांगूं लागल्या तर काय ऐकावं लागेल! एक सांगेल, एकदां एका तरुण सुस्वरूप विद्यार्थ्याचं माझ्यावर फार प्रेम होतं, पण तो मला एकदां विसरला अन् मी मग एका बदमाष उचल्याच्या तावडींत सापडलें. दुसरी सांगेल, माझा पहिला मालक एक लुच्चा सावकार होता, त्याच्या सहवासाला कंटाळून मीच एका सत्यनारायणाच्या उत्सवांत एका उडाण-टप्पूचा हात धरून पळ काढला. तिसरी हजारदां कीर्तनाला गेली असेल व सबंद महाभारत अगर रामायण ती आपल्याला ऐकवूं शकेल; तर चवथी वारंवार वेश्येच्या माडीच्या कोपऱ्यांत ताटकळत उभी राहिली असेल व तिथें तिच्या कानावर आलेली खऱ्या-खोट्या प्रेमाचीं बोलणीं ती तिखटमीठ लावून सांगेल. अशा हजार तऱ्हा! असल्या जबान्या एकत्र करून "छत्र्यांचं चरित्र" या नांवानं एखादं पुस्तक प्रसिद्ध केलं तर तें मनोरंजक होईल असं नाहीं तुम्हांला वाटत?

मात्र मला छत्रीविषयीं नुसतं प्रेमच नव्हे, तर एक प्रकारचा आदर वाटतो तो आतांपर्यंत सांगितलेल्या गोष्टींहून निराळ्याच एका कारणासाठीं. पूर्वीं असा एक काळ केव्हां तरी असेल, कीं त्या काळांत छत्र हें राज-चिन्हांपैकीं एक समजलं जात होतं. "छत्रपति" हा 'राजा' या शब्दाला प्रतिशब्द होता. पण आज काळ असा आला आहे, कीं रुपया दोन रुपये फेकावे अन् कुणीहि "छत्रपति" व्हावं. एका काळच्या राजचिन्हावर अलम दुनियेचा हक्क प्रस्थापित झाला आहे. मला कुणी विचारलं कीं आज लोकशाहीच्या जमान्यांत आपण राहत आहों हें सर्वांत उत्तम प्रकारें दर्शविणारी गोष्ट कोणती, तर मी निःशंकपणें उत्तर देईन—"छत्री."

## नं. ७ : नको असलेलीं पुस्तकं

पैसे उसने देतांना ते कधीं परत मिळायचे नाहींत अशा समजुतीनं ते देतां आले तरच द्यावेत, म्हणजे नंतर व्यर्थ मनस्ताप होत नाहीं, असा उपदेश कोणी तरी केलेला आहे. मला वाटतं पुस्तकांच्या बाबतींत हा सल्ला अधिकच लागू पडणारा आहे. माझ्याकडे येणारा मनुष्य माझ्या पुस्तकांकडे न्याहाळून पाहायला लागला कीं तो कोणती मागणी करणार, अन् ती करतांना कोणत्या मासल्याचा चेहरा करणार हें आतां सवयीनं मी ओळखूं शकतों. आणि एक पुस्तक काढून "हें मी नेऊं का दोन दिवस?" असं त्यानं विचारलं कीं, "हं न्या" असं मी उत्तर देतों, अन् त्याच वेळीं मनाशीं खूणगाठ बांधतों, कीं आणखी एक पुस्तक नाहींसं झालं आपल्या संग्रहांतनं. पुस्तक नेणारा माणूस तें काखोटीस मारून उठतां उठतां पुटपुटतो, "वाचून झाल्याबरोबर आणून देईन हं." पण त्या शब्दांकडे माझं धड लक्षच नसतं. त्या आश्वासनाचा पोकळपणा अनेक वेळां अनुभवला आहे मीं. मी तोंडावर हास्य आणून खुर्चीवरून उठतों तेव्हां तो गृहस्थ म्हणतो, "कशाला येतां! बसा." तरी मी खोलीच्या दारापर्यंत जातोंच. त्या गृहस्थाला नव्हे, तर जें पुस्तक इतके दिवस माझ्या घरांत राहिलं त्याला निरोप द्यायसाठीं. "Good-bye!" त्या प्रिय पुस्तकाला उद्देशून मी म्हणतों. त्याचं दर्शन मला पुन्हा घडणार नाहीं अशी माझी समजूत असते. अन् बहुधा ती खरी ठरते. आपलं पुस्तक कुठेंहि असलं तरी तें कुणी तरी वाचीत तर असेल, अन् तितक्या अंशानं ज्ञानप्रसाराचं काम केल्याचं पुण्य तरी आपल्या पदरीं पडत असेल या विचारानं मनाचं सांत्वन करून घ्यायला मी आतां शिकलों आहे. आणि माझ्या संग्रहांतलीं इतकीं पुस्तकं लोकांनीं नेलीं तरी

मनुष्यजातीबद्दल अनुदार सिद्धान्तहि मी बांधीत नाहीं. उलट, मी म्हणतों ज्या अर्थी माझ्या संग्रहांत अजून इतकीं पुस्तकं कायम राहिलीं आहेत त्या अर्थी माझ्याकडे येणाऱ्या माणसांत सज्जन माणसंच अधिक असलीं पाहिजेत !

शिवाय असं कीं पुस्तकं नेणाऱ्यांपेक्षां देणाऱ्या माणसांकडून माझा जो छळ होतो तो फार विलक्षण. उदाहरणार्थ, एके दिवशीं एक गृहस्थ मला भेटायला आले. थोड्या गप्पा टप्पा झाल्यावर त्यांनीं एक ग्रंथ काढला व तो टेबलावर ठेवीत मला विचारलं, "हा वाचला आहे का आपण?" मी पुस्तकाचं व लेखकाचं नांव पाहात मान हालविली. ते म्हणाले, "आपण अवश्य वाचायला हवा हा ग्रंथ!" माझ्या चर्येत "कां?" असा प्रश्न सूचित झाला असावा. ते म्हणाले, "आपण मानस-शास्त्राची आवड बाळगणारे म्हणून सांगतों. नजरेखालून घालाच एकदां."

"पण सध्यां मला सवड होईलसं..." अशा सबबीनं मी स्वसंरक्षण करणार तोंच ते गृहस्थ म्हणाले,

"सवड होईल तेव्हांच वाचा. घाई नाहीं. आपल्याकडे ठेवून जायसाठींच आणला होता मीं. यांतल्या आठव्या प्रकरणांत गाढवं फार बुद्धिवान् असतात असं सिद्ध केलं आहे. हा ग्रंथकार म्हणतो..."

आणि त्यांनीं ग्रंथ उचलून तें प्रकरण उघडून वाचायलाच सुरुवात केली !

मी माझ्या मूर्च्छेतून जागा झालों होतों तेव्हां ते गृहस्थ निरोप घेत होते. मला वाटलं सुटलों. पण नाहीं !

जातां जातां त्यांनीं मला बजावलं, "अन् ग्रंथ वाचून झाल्यावर आपला अभिप्राय सांगा हं !"

आलं का संकट ! आतां तो ग्रंथराज वाचलाच पाहिजे ! मला जें वाचावसं वाटतं त्याऐवजीं त्या भल्या गृहस्थाला मीं जें वाचलं पाहिजे असं वाटतं त्यांत माझ्या आयुष्याच्या कांहीं घटका फुकट घालविल्या पाहिजेत मला !

तसाच तो परवांचा पाहुणा. त्यानं दोन दिवसांच्या मुक्कामांत फलज्योतिषाविषयीं वाद घालून माझा जीव घाबरा केला. माझ्या राशीला अनिष्ट ग्रह आल्याचा मला चांगलाच प्रत्यय दिला त्यानं. शेवटीं जायच्या वेळीं तो एक जाड इंग्रजी पुस्तक माझ्या हातीं देऊन म्हणाला, " हें वाचलं पाहिजे तुम्हीं ! "

" पण माझा विश्वास नाहीं... "

" म्हणूनच सांगतों, वाचा एकदां. माझी खात्री आहे तुमचीं मतं बदलतील. "

आणि तें तो माझ्याजवळ ठेवून गेला !

या साडेसातीला काय म्हणायचं ?

असे अनेक उपकारकर्ते येतात अन् माझ्यावर आपल्या अभिरुचीचा जुलूम करण्यासाठीं पुस्तकं ठेवून जातात. कुणी संगीतविषयक पुस्तक आणून देतो, अन् सांगतो, यांतली अमुक उपपत्ति तुम्हांला आवडेल. कोणी योगावरचं, कुणी माझी कुत्र्यांची आवड ऐकून कुत्र्यांना शिकविण्याच्या कलेवरचं, कुणी भारतीय चित्रकलेवरचं-ज्याला जें आवडलं असेल तें पुस्तक तो माझ्याकडे आणून देतो; अन् प्रत्येकाचा आग्रह असा कीं मीं तें वाचलंच पाहिजे. परवां तर एक स्वारी माझ्याकडे आली, अन् एक कादंबरी मला वाचायसाठीं देऊन म्हणाली, " अशा कादंबऱ्या तुमच्या हातून लिहून झाल्या पाहिजेत. ही वाचा तुम्ही ! " मी ती आधींच वाचली होती, व मला ती भिकार वाटली होती ! म्हणून मीं हास्य करून म्हटलं " असं का ? " त्याला वाटलं, मी जिज्ञासा व कृतज्ञता दाखविली ! तो ती कादंबरी माझ्याजवळ ठेवून गेला ! हीं सारीं पुस्तकं माझ्या संग्रहांत मी अगदीं ठळक दिसतील अशा ठिकाणीं ठेवलीं आहेत. हेतु असा, कीं माझ्याकडे पुस्तकं मागायसाठीं येणारीं माणसं तीं पाहून उचलतील. पण एक मासा त्यांच्या जाळ्यांत अडकेल तर शपथ ! खोटं नाणं कांहीं केल्या हातावेगळं करतां येऊं नये तशी गत झाली आहे त्या पुस्तकांची.

हीं पुस्तकं देणारीं माणसं तीं न्यायला परत येत नाहींत ही आपत्ति तर खरीच; पण तीं येत नाहींत तेंच एका दृष्टीनं बरं असंहि वाटतं. कारण तशीं तीं आलीं तर केवढ्या संकटाला मला तोंड द्यावं लागेल त्याची चुणुक एकदां मला कळलेली आहे.

माझ्याकडे एकदां एक गृहस्थ आले व नमस्कार चमत्कार झाल्यावर म्हणाले,

" मग आपण तें पुस्तक वाचून पाहिलंत कीं नाहीं "

अस्सं, एकूण " त्या " पैकीं आहे तर हा, असं माझ्या मनांत आलं. त्यानं माझ्यावर कोणतं पुस्तक लादलं होतं तें मी अजीबात विसरून गेलों होतों. पण तसं सांगावं तर त्याला वाईट वाटेल अशी शंका आली. ' नाहीं, अजून नाहीं वाचलं ' असं उत्तर द्यावं तरीहि त्याला कसं वाटेल कुणास ठाऊक असं मनांत आलं. शेवटीं हिय्या करून मी म्हटलं,

" छान आहे तुम्हीं दिलेलं पुस्तक. त्यांतल्या विषयाबद्दल मतभेद होईल कदाचित्, पण भाषासरणी फारच छान आहे. "

माझ्या कल्पनेनं अगदीं सुरक्षितपणें, अंग बचावून बोललों होतों मीं हें.

पण माझा अदमास खोटा ठरला. त्या गृहस्थांनीं विचारलं,

" विषयाबद्दल मतभेद होईल म्हणतां तें बरोबर आहे. पण त्यासाठींच तर तुम्हांला दिलं मीं तें वाचायला; तुम्हांला काय वाटतं ग्रंथकाराच्या मतांबद्दल ? तुमचं मत पाहिजे मला. सांगा; तेवढ्यासाठीं तर आलों आज मुद्दाम. " मला वाटलं या क्षणीं धरणी दुभंग होईल, अन् ( मला नव्हे ) त्याला पोटांत घेईल तर केवढे उपकार होतील त्या माउलीचे माझ्यावर ...पण तसं कुठलं व्हायला ?

मी म्हटलं, " अंऽअं; माझं मत सांगायला, कांही हरकत नाहीं...पण त्याचं असं आहे, थोडसं राह्यलं आहे अजून वाचायचं. "

" असं होय ? पण कुठपर्यंत वाचलंत तें तर सांगा, म्हणजे तेवढ्या भागांतल्या..."

आतां कोपऱ्यांत अडविल्या गेलेल्या मांजराप्रमाणें त्याच्यावर उलट हल्ला करण्यावांचून दुसरा मार्गच उरला नव्हता मला. मी म्हटलं,

"त्या पुस्तकाचं जाऊं द्या. मी तुम्हांला एक पुस्तक देणार आहे वाचायला. मला तें इतकं आवडलं आहे, कीं तें दोन वेळां वाचलं मीं. भाषा ओबडधोबडच आहे, पण मतं अशीं तर्कशुद्ध अन् सडेतोड आहेत म्हणतां कीं ज्याचं नांव तें. मनाशीं योजूनच ठेवलं होतं, कीं तुम्हीं आलांत कीं तुम्हांला द्यायचं......"

"असं का? द्या. तुम्ही ज्या अर्थीं दोनदां वाचलं म्हणतां..."

असं कांहीं तरी तो पुटपुटत होता. तेवढ्यांत उठून, नको झालेल्या आगंतुक पुस्तकांच्या रांगेतून सगळ्यांत जाड दिसलं तें पुस्तक मी काढलं, अन् झटकून त्याच्या हातीं दिलं. किती युक्तीनं आज आपण अडगळ दुसऱ्याच्या गळ्यांत बांधली असा हर्ष मला झाला. पण तो क्षणभरच. कारण—

ते गृहस्थ हसून म्हणाले, "हें काय हो? तुम्हांला मीं दिलेलं पुस्तक हेंच कीं! तेंच मला देतां होय?......"

आतां मात्र मी पुरता गारद झालों!

"अरे, असं झालं होय चुकून? च्! हें घ्या." असं म्हणत मग दुसरं पुस्तक काढून मी त्या गृहस्थाच्या हातीं कसं दिलं अन् त्या पेचप्रसंगांतून कसा सुटलों तें माझं मलाच माहीत!

ज्या अगडबंब ग्रंथाची अडगळ मी दूर करणार होतों तो आजमित्तीलाहि माझ्या खोलींत आहेच! आणि त्याच्या जोडीला तसलींच आणखीं किती तरी पुस्तकं शेलफवर उभीं आहेत. हीं मीं कधीं विकत घेतलीं नाहींत, कधीं मागितलीं नाहींत, कधीं वाचणारहि नाहीं! आणि असं असून तीं त्या जागेवरून कधीं हलतीलसं वाटत नाहीं! त्यांच्याकडे पाहून मीं कधीं कधीं त्यांना विचारतों.

"तुम्ही कां आलांत माझ्याकडे?"

त्या पुस्तकांना वाचा फुटून तीं हसतात, व म्हणतात, "आपल्याला वाचनाचीं फार आवड आहे असं तुम्हीं जगाला दाखवलं नसतं तर लोकांनीं कशाला लोटलं असतं आम्हांला तुमच्या घरीं?"

अन् त्यांचं तें उत्तर कांहीं खोटं नाहीं!

---

## नं. ८ : छबी

सर्वांना प्रिय वाटणारा प्राणी कोणता असेल तर तो छबी काढणारा फोटोग्राफर. श्रीमंत-गरीब, सुरूप-कुरूप, लहान-मोठे सर्वांना तो हवासा वाटतो. कुणी कॅमेरा रोखलेला पाहतांच "छे छे, मी नाहीं फोटोसाठीं उभा राहणार." असं म्हणून दूर होण्याचा आविर्भाव करणारीं मोठीं माणसंसुद्धां तसं करतात याचं कारण आपल्याला न कळत आपली छबी काढली जाणार याची त्यांना खात्री असते. छुपा कॅमेऱ्यानं 'पाडलेली' त्यांची छबी वृत्तपत्रांत छापली गेली कीं ते एकान्तांत ती न्याहाळीत असले पाहिजेत खास. स्वतःची प्रतिमा पाहावीशी वाटणं, अन् ती लोकांच्याहि दृष्टीस पडावीशी वाटणं ही एक माणसाची निसर्गसिद्ध प्रवृत्ति आहे. आपल्याला खुशामत आवडत नाहीं असं दाखविणारा मनुष्यदेखील, "यांना खुशामत अगदीं आवडत नाहीं हं!" असं कुणी तोंडदेखलं म्हटलं कीं, खुष होतोच कीं नाहीं? जी गोष्ट खुशामतीची तीच फोटोग्राफरची. कारण, फोटोग्राफरनं काढलेली प्रतिमा म्हणजे तरी खुषामतीचाच एक प्रकार नाहीं काय? स्वतःवरच अनुरक्त असण्याचा जो एक गूढ चमत्कारिक धर्म मनुष्याच्या ठिकाणीं आहे त्यावरच फोटोग्राफीचा धंदा आधारलेला आहे. मानवी स्वभावांतली खुशामतीची हौस भागविण्याखेरीज फोटोग्राफर लोक दुसरं काय करीत असतात? पुण्या-मुंबईसारख्या मोठमोठ्या शहरीं 'Photo Studio; Day and Night' अशा पाट्या हमरस्त्यावर पाहिल्या, कीं वाटतं, हे लोक आपल्या पाट्यांवर सरळ असं कां लिहीत नाहींत—"येथें खुशामत केली जाईल. रात्रंदिवस, केव्हांहि या!"?

स्वतःचा चेहरा आवडीनं निरखतां यावा म्हणून मनुष्यानं प्रथम आरसा शोधून काढला. सुंदर माणसाप्रमाणेंच कुरूप माणसंहि आरसे तोंडासमोर

धरून बसूं लागलीं; इतरांनीं दुर्लक्षित केलेल्या आपल्या चेहरेपट्टींतलीं सूक्ष्म सौंदर्यस्थळं हुडकून काढण्याचा उद्योगांत त्यांना सुख मिळूं लागलं. पण आरशांत एक मोठं वैगुण्य आहे. तो मित्रासारखा असला तरी स्पष्ट-वक्त्या निःस्पृह मित्रासारखा आहे. नकट्या नाकाच्या अन् बारीक डोळ्यांच्या स्त्रीला आपल्या प्रतिबिंबांतले ते अवयव पहाण्यानंच बरं वाटत असेल तर तिचं तें भाबडं समाधान आरसा हिरावून घेत नाहीं हें खरं; परंतु तिची खोटी प्रशंसाही तो करीत नाहीं. तुझं नाक पाहिलंस कसं चाफेकळीसारखं अन् डोळे हरणासारखे आहेत, अशी थाप तो मारीत नाहीं. तो सत्यवक्ता आहे. अन् असत्यावांचून भरपूर खुशामत होऊंच शकत नाहीं. मोठमोठ्यांच्या पदरीं जे खुषमस्करे असतात त्यांच्या अंगीं मोठी कला असते ती निःसंकोच खोटं बोलण्याची ! जसं असेल तसं प्रतिबिंब दाखविणारा आरसा असल्या खुषमस्कऱ्याचं काम कसं बजावणार ? अन् आरशाच्या शोधावर मनुष्य संतुष्ट कसा राहणार ? जिच्यायोगें कुरूपांनाहि देखणेपणावर हक्क सांगतां येईल अशी वस्तु उपलब्ध झाल्यावांचून माणसाचं पुरतं समाधान होणं शक्य नव्हतं. शास्त्रज्ञांच्या खटपटीमुळें ती लवकरच उपलब्ध झाली. तिचं नांव 'छबी' !

मनांतले विचार उघड करण्यापेक्षां ते लपविण्यासाठींच मनुष्य भाषेचा उपयोग अधिक करतो असं म्हणतात. फोटोचंहि तसंच आहे. चेहरा दाखविण्यापेक्षां लपविण्यासाठींच फोटोचा अधिक उपयोग असल्याचं लोकांना अनुभवानं माहीत झालं आहे. छबी काढण्याचा धंदा करणाऱ्याच्या अंगीं लोकांच्या रूपांतल्या वैगुण्यावर गिलावा करण्याचं कसब नसेल तर त्याचा धंदा चालणार नाहीं. फोटोग्राफर आपल्या चेहऱ्याला उजळा देईल, आपलं रूप शक्य तितकं झकपक करून कागदावर उठवील ही आशा साऱ्या दुनियेला त्याच्याकडे ओढून आणीत असते. आणि अशा प्रकारें आशेला गुंतल्यामुळें छबीवाल्याला आपण केवढी सत्ता बहाल करतों बघा. तो सांगेल त्याप्रमाणें बसायची, उभं राह्यची, वाकायची, पाऊल पुढं टाकायची, मागं घ्यायची, हात जोडायची, मान वाकवायची आपली तयारी असते. आपल्या हनुवटीला स्पर्श करण्याची सलगी त्यानं चारचौघांच्या देखत केली तरी ती आपण क्षम्यच समजतों. अगदीं राजा असेना, छबीवाल्यानं

" हां--स्टेडी " म्हटलं कीं ती आज्ञा तो मुकाट्यानं पाळतो. मोरेश्वर कीर्तिकर नांवाचे मुंबईचे एक प्रख्यात फोटोग्राफर होते. त्यांची माझी चांगली ओळख होती व त्यांच्याकडे मी पुष्कळदां जात असें. एकदां लोकमान्य टिळकांना आमंत्रण देऊन त्यांनीं आपल्या स्टूडिओंत आणलं. ' फोकस ' वगैरे लावून झाल्यावर मोरूभाऊ टिळकांना म्हणाले, " हां स्टेडी !... आणखी...Just a little smile ! " सतत चळवळ करणाऱ्या अन् क्वचित्च हसणाऱ्या टिळकांना हे दोन हुकूम मोरूभाऊंनीं सोडलेले ऐकून मी थक्कच झालों. अन् चळवळ बंद करण्याचे हिंदुस्थान सरकारचेहि हुकूम धुडकावून लावणाऱ्या टिळकांनीं मोरूभाऊंची आज्ञा मानली तेव्हां तर मी अधिकच थक्क झालों. दुसऱ्या एका प्रसंगीं मोरूभाऊंनीं याहूनहि उंच " ओव्हर-बाउंडरी " ठोकली. एका तरुण दांपत्याचा फोटो काढीत असतांना त्यांतल्या सुंदर स्त्रीला उद्देशून चुटकी वाजवून ते म्हणाले, " स् ! त्यांच्याकडे नाहीं, इकडे माझ्याकडे बघा अन् अगदीं गोड हसा ! " पतीच्या देखत पत्नीला असं सांगण्याची ताकद छबीवाल्याच्याच अंगीं असूं शकते !

येवढी ताकद माणसाला मिळवून देणारी ही छबी काढण्याची कला अवगत असावी असं एकदां मनांत येऊन मीं एक छोटासा पण भारी किंमतीचा कॅमेरा खरेदी केला. माझ्या आवडत्या व्यक्तींचे व स्थलांचे फोटो मी घेऊं लागलों, व माझ्या सुखांत एका नव्याच आनंदाची भर पडली. प्रियाराधनांत चिठीचपाटीपासून तों चुंबनापर्यंतच्या मार्गांत फोटोचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. माझा कॅमेरा म्हणजे पुष्पधन्व्याच्या अस्त्रासारखा वाटूं लागला मला. माझ्या स्नेह्यांच्या दृष्टीनंहि मला एक नवीनच महत्त्व आलं. " गोषांतील सुंदर स्त्रिया " साळसूदपणानं पाहाचं भाग्य हकीम अन् छबी काढणारा या दोघांच्याच वांट्याला कसं येतं त्याचा मला अनुभव येऊं लागला. फोटो काढण्यांत मी अधिकाधिक पारंगत होऊं लागलों, अन् आणखी भारी किंमतीचा कॅमेरा विकत घ्यायचा विचार माझ्या मनांत येऊं लागला. पण—

त्याच सुमारास कांहीं त्रासदायक गोष्टी घडायला सुरुवात झाली. माझ्याजवळ कॅमेरा आहे अन् मी बऱ्यापैकीं फोटो काढतों ही बातमी मला कल्पना नव्हती इतकी पसरली होती. माझी व ज्यांची ओळखहि नाहीं असे लोक मो रस्त्यांत भेटलों कीं स्मित कां करूं लागले, व आमच्या आळींतले पुरुष मला अगदीं आर्जवून नमस्कार कां करूं लागले तें कांहीं दिवस मला कळलं नाहीं. पण एके दिवशीं तें कोडं उलगडलं. शेजारचे धोंडोपंत माझ्याकडे आले. चहा घेऊन झाला तरी ते उठेनात; मग मला विचारावंच लागलं,

"कांहीं काम होतं काय माझ्याकडे?"

"छे! काम नाहीं...पण..." असं म्हणत धोंडोपंतांनीं माझी सिगारेटची चांदीची डबी उचलून घेतली. आणखी एक सिगारेट जाणार अशी मी आपल्या मनाची तयारी केली, अन् विचारलं,

"पण काय?"

"आमची बनी माहेरपणाला आली आहे आपणाला माहीत आहे."

मला माहीत असायचं काय कारण? तथापि मीं म्हटलं, "हं."

"तिला मुलगा झाला. दोन महिने झाले कालच्या चतुर्थीला. ती आतां सोमवारीं जायची आहे आपल्या नवऱ्याकडे परत..."

मी मनाशीं म्हटलं, परमेश्वर तिचं रक्षण करो!

धोंडोपंतांचं बोलणं चालूच होतं, "तिच्या तान्ह्या मुलाचा फोटो काढावा म्हटलं. आमच्या हिनं सुचविलं कीं आपण फार चांगले फोटो काढतां..."

माझ्या डोक्यांत एकदम प्रकाश पडला.

दुसऱ्या दिवशीं बनीच्या मुलाची छबी काढली मीं.

आणि मग माझा उपकारी स्वभाव असा गळ्यांत येऊं लागला माझ्या कीं कांहीं विचारूं नका. ज्या त्या शेजाऱ्याची मुलगी बाळंतपणासाठीं माहेरीं येऊं लागली व तिच्या अपत्याचा फोटो काढण्याचा शेजारधर्म हा माझ्या नित्यक्रमांतला एक भागच होऊन बसला. "यंदाच लग्न झालेल्या"

मुली, मुंजमुलगे, शेबडीं–लेंबडीं पोरं, इतकंच नव्हे तर आळींतल्या व ओळखीच्या लोकांच्या घरचीं पाळीव जनावरंदेखील माझ्या कलेचे विषय हक्कानं बनूं लागलीं! शेवटीं एके दिवशीं मोडक भटजींची बायको येऊन काकुळतीनं म्हणाली, " आमची गाय व्याली पण तिला झालेला गोऱ्हा मेला. इतका सुंदर होता. नक्षत्र नुसतं! आमचे हे म्हणतात त्याचा फोटो...." तेव्हां मी मनाशीं ठरवलं कीं, आतां फोटोग्राफीच्या कलेची उपासना पुरे झाली.

दुसऱ्या दिवशीं मी कॅमेरा विकून टाकला! म्हणजे ओळखीचे लोक व शेजारी–पाजारी यांचा तसा समज होईल अशी व्यवस्था केली!...

पण आतां माझ्याकडे येऊन लोकांनीं फोटोची गोष्ट काढली व " मी माझा कॅमेरा विकला हो " हें माझं उत्तर त्यांनीं ऐकलं म्हणजेच त्यांचे चेहरे फोटो काढण्यासारखे होतात, अन् मग खरी गोष्ट लपविणं मला फार कठीण जातं!

## नं. १ : चावी

माझ्या घरावरून रोज नेमानं फेरी मारणाऱ्या लोकांच्या आरोळ्या माझ्या इतक्या परिचयाच्या झाल्या आहेत कीं सामान्यतः त्यांकडे माझं लक्षहि जायचं आतां बंद झालं आहे. हे लोक आपल्या पोटासाठींच रस्तोरस्तीं फिरतात हें खरं असलं तरी एका अर्थी हीं मोठीं उपकारी माणसं म्हटलीं पाहिजेत. यांच्या चित्रविचित्र आरोळ्यांमुळें शहरवासी स्त्रीपुरुषांना आपल्या किती तरी कर्तव्यांची सतत जाणीव राहते. आपले बूट चकचकीत ठेवले पाहिजेत, रोजचीं वृत्तपत्रं वाचून जगांतल्या घडामोडींविषयीं अद्यावत् परिचय ठेवला पाहिजे, मोडक्या छत्र्या दुरुस्त करून वापरल्या पाहिजेत, अशीं हजार अवधानं आम्ही पुरुष ठेवतों तीं या फेरीवाल्यांच्याच साहाय्यानं. अन् घरांतल्या भांड्यांना कल्हई असणं आरोग्यदृष्ट्या आवश्यक आहे, पुरुषांनीं घरांत बाटल्यांची अडगळ वाढवली असली तर त्या विकून चार पैसे घरांत परत आणणं शक्य आहे, इत्यादि धोरणं बायका सांभाळूं शकतात तींसुद्धां या फेरीवाल्यांचे घोगरे अगर कर्कश शब्द त्यांच्या कानांवर पडतात म्हणूनच. इतकंच काय, तऱ्हेतऱ्हेची पोलकीं वापरण्याच्या जन्मसिद्ध हक्काची जाणीव स्त्रियांना राहते ती दुपारच्या निवांत वेळीं सुंदर सुंदर डिझाइनच्या कापडांचा मान मोडणारा गठ्ठा घेऊन, जपानी किंवा चिनी फेरीवाला आपले किलकिले डोळे मिचकावीत व ढवळेपिवळे दांत दाखवीत दाराशीं येतो, म्हणूनच ना? आणि पुरुष घरीं परत यायच्या वेळीं केसांत फुलांची वेणी किंवा गजरा घालून दारांत उभं राहण्याचं गोड "टेक्निक" स्त्रियांना कोण शिकवितो? "मोती ऽऽ" म्हणून दाबून काढलेल्या आवाजांत ओरडत ताज्या वेण्या-गजऱ्यांची शीग डोक्यावर घेऊन संध्याकाळीं हिंडणारा फुलवालाच कीं नाहीं! मग या

फेरीवाल्यांची कितीहि कटकट होत असली तरी त्यांच्याकडे आपण स्नेहभावानंच बघायला नको काय ?

माझ्या घरावरून आरोळी ठोकीत जाणाऱ्या या लोकांत एक मध्यम वयाचा मुसलमान आहे. प्रथम कांहीं दिवस त्याच्या ओरडण्याचा मला कांहींच बोध होत नसे. मी माझ्या खोलींत लिहिण्यांत मग्न झालों असतांना खालीं रस्त्यांतून मला फक्त ऐकूं येई, "...ला ..चा...वी ऽ ऽ ए !" पांच-सहा दिवस मीं तो विचित्र शब्द ऐकला, मग मला राहवेना. मी गॅलरींत गेलों व हा कोण मनुष्य काय विकतो आहे म्हणून पाहिलं. त्या मुसलमानाच्या अंगाखांद्यावरचा सरंजाम पाहतांच उलगडा झाला. तो कुलपं किल्ल्या दुरुस्त करणारा होता. आणि मग त्याच्या आरोळींतल्या शब्दांचीहि संगति लागली. "टालाचावी" असं ओरडण्याचा—म्हणजे आपण तसं ओरडलों असं लोकांचा समज व्हावा असा—त्याचा हेतु होता. "...ला...चा...वी...ए !" ही आरोळी मग माझ्या अगदीं सवयीची झाली; इतकी कीं इतर आरोळ्यांप्रमाणें तिच्याकडेहि माझं लक्ष जाईनासं झालं. दांतओठ खाऊन ओरडणारा तो मोंगल बहाद्दर आमच्या रस्त्यानं रोज जात असला पाहिजे यांत शंकाच नाहीं. पण त्याची ती ललकारी मानसशास्त्राच्या नियमाप्रमाणें माझ्या जागृत अवधानाच्या पार्श्वभूमींत विलीन झाली. माझं लक्ष वेधून घेण्याची शक्ति तिच्यांत उरली नाहीं.

पण परवां मला तिची एकदम आठवण झाली. माझ्या टेबलाच्या खणाचं कुलूप नादुरुस्त झालं; कांहीं केल्या त्यांत चावी फिरेना. मला तर तो खण ताबडतोब उघडून हवा होता. अशा वेळीं चावीवांचून वाटेल तें कुलूप उघडण्याच्या अनैतिक कसबाची माणसाला फार गरज भासते. दाभण, बारीक सळई, खिळ्याचं टोंक, सुचेल त्या हत्यारानं माझ्याच खोलींत दरोडेखोरी करायची मी शिकस्त केली. पण शर्विलकाचं काम म्हणजेसुद्धां कला आहे. अभ्यास नसतांना ती कशी साधेल? माझ्या खटपटीनं खणाच्या त्या कुलपाचा हृदयपालट मी करूं शकेन असं लक्षण कांहीं दिसेना. शेवटीं हातोडा वापरण्यासारखे अत्याचारी उपाय माझ्या डोक्यांत येऊं लागले. मीं ते अमलांतहि आणले असते. पण तितक्यांत आठवलं—

" टाला चावी ऽऽ ए!"

जी आरोळी मी विसरलों होतों ती एकदम आठवली.

मनांत आलं, " टाला चावी ऽऽ ए!" ओरडणारा तो फेरीवाला आला कीं, माझं संकट दूर करील.

मी त्याची वाट पाहूं लागलों.

पण तो येईना. तीन चार वेळां त्याची ती ठरीव ललकारी मीं स्पष्ट ऐकली. पण दर वेळीं मी झटकन् गॅलरींत जावं अन् पाहावं तो मला उगीच भास झाल्याचं दिसून यावं असं झालं.

कुलूप दुरुस्त करणाऱ्या त्या फेरीवाल्याची मीं किती उत्कंठेनं प्रतीक्षा करूं लागलों तें माझं मला माहीत. एकदम केवढं महत्त्व त्याला प्राप्त झालं होतं माझ्या दृष्टीनं!

मला लिहिणंहि सुचेना. माझ्या मनांत विचार आला, मानवी प्रगतीच्या इतिहासांत तरी असा एक काळ असेलच ना कीं, ज्या काळांत कुलूपकिल्ल्या नव्हत्याच? अर्थात् असलाच पाहिजे. अन् त्या काळांत मानवी जीवन किती साधंसुधं, निष्कपट असलं पाहिजे! कुलपं नव्हतीं तेव्हां अमुक वस्तु माझी म्हणून इतरांना ती घेतां येऊं नये यासाठीं ती बंदोबस्तांत ठेवण्याची कल्पनाहि नव्हतीच; आणि दुसऱ्याच्या वस्तूचा अपहार करून ती उघडकीस येऊं नये यासाठीं ती लपविण्याचीहि इच्छा कुणाला होत नव्हती. किंबहुना, हें 'माझं' अन् हें 'तुझं' हा भेदच माणसाच्या मनांत उद्भवला नव्हता. ज्या भेदावर साऱ्या नीतिनियमांची उभारणी झाली आहे तो हा भेदच माहीत नसल्यामुळें त्या काळांत मनुष्याचं आयुष्य नीति-अनीतीच्या कक्षेपलीकडचं, कमालीचं मुग्ध, सरळ, अव्याज असलं पाहिजे. अन् सगळं सगळ्यांचं समजलं जात असेल त्या काळांत कदाचित् सारीं माणसं सुखांत राहत असतील! "जिंदगी" हा विषयच माणसाला कळत नव्हता. अर्थात् त्यापोटीं उद्भवणारे लोभ, द्वेष, कपट इत्यादि भावनांचे दुष्ट चाळे मानवी जीवनांत दिसत नव्हते. तें जीवन साधं पण शुद्ध होतं.

पण कुणी तरी खटपट्या माणसानं कुलपाची युक्ति शोधून काढली, अन् त्यावरोबर ही स्थिति पालटली. टीचभर लांबीरुंदीची एक वस्तु नव्यानं तयार झाल्याबरोबर मानवी जीवितांत केवढी क्रांति घडून आली !

इच्छा उत्पन्न झाली कीं ती पूर्ण करण्याचीं साधनं मनुष्य शोधूं लागतो हें जसं खरं, तसंच साधन उपलब्ध झालं कीं माणसाच्या मनांत इच्छा डोकावूं लागते हेंहि खरं. हॉटेलवरून जातांना खिशांत पैसे असले कीं भूक लागल्यासारखं वाटूं लागतं ! कुलूप हातीं येतांच तें बंद करण्याच्या वस्तु मिळविण्याची अन् त्यांवर मालकी हक्क सांगण्याची इच्छा माणसाच्या अंतःकरणांत प्रगट झाली. खाजगी वित्ताची कल्पना मानवी जीवनांत शिरली, अन् अल्पकाळांत तिनं मानवी व्यवहारांतली सारी ऋजुता, स्निग्धता नष्ट केली. दारादाराला कुलपं लागलीं, बंधुत्वाचीं छकलं उडालीं, ‘ हें माझं ’ ‘ तें माझं ’ असं प्रत्येकजण घोकूं लागला, आपापलं घरकुल संभाळायचं येवढंच आपलं कर्तव्य असं माणसांना वाटूं लागलं !

शिवाय, कुलपाचा उपयोग संरक्षणाचं साधन म्हणून होऊं लागतांच तें पापाचं आमिषहि ठरायला लागलं असलं पाहिजे. कारण, आपल्या स्वतःच्या दाराचं कुलूप पाहून माणसाला बरं वाटतं, पण शेजाऱ्याच्या दाराला तें लागलेलं पाहवत नाहीं. त्यानं काय बरं घरांत ठेवलं असेल अन् जें ठेवलं असेल तें मला मिळवितां येईल का असले विचार माणसाच्या मनांत घोळूं लागतात. म्हणजे कुलपाबरोबर परवित्त, परदारा इत्यादींचा अभिलाष आला, अन् त्यामागोमाग चौर्यकर्महि आलंच ! “ जितक्या कुलपांच्या तऱ्हा तितक्या घरफोडीच्या तऱ्हा ” असं फ्रेंच भाषेंत एक सुभाषित आहे !

सारांश, ज्यानं कुलूप–किल्लीची भानगड शोधून काढली त्यानं मनुष्य जातीचा घात केला असं म्हणणं जरी एकांगी वाटण्यासारखं असलं, तरी त्यानं मानवी जीविताचा सरळपणा नाहींसा करून टाकला येवढं खचित ! कुलपापूर्वीच्या काळांतली मनुष्याच्या अंतःकरणाची निष्कपटता गेली ती गेली. आतां ती अनुभवाला येणं शक्य नाहीं ! अन् आतां कुलूप-किल्ल्यांची हकालपट्टी करणंहि शक्य नाहीं. माणूस त्यांवर प्रेम करायला शिकला आहे.

कॉलेजच्या वसतिगृहांत प्रथमच दाखल झालेलीं तरुण मुलं बोटांभोंवतीं किल्ली गरगर फिरवितांना किती खुषींत असतात, पाहिलं असेलच कीं तुम्हीं ! तीं जणूं सांगत असतात, " माझी खोली आहे. तिचा मी मालक आहे; आतां माझा मी स्वतंत्र आहे !" बायकांना दागिन्यांचा हव्यास असतोच; पण दागिन्यांपेक्षांहि दुसरी एक वस्तु त्यांना अधिक प्रिय असते. ती म्हणजे कमरेला लावलेला किल्ल्यांचा जुडगा. गुजराथी लोकांची नालस्ती केल्याचा आरोप माझ्यावर करणार नसाल तर सांगतों, कीं मोठमोठ्या गुजराथी शेटांच्या शेटाण्या सात आठ छटाक वजनाच्या किल्ल्या कमरेला वागवायला मिळाल्या कीं नवऱ्यावर खूष असतात. मग घरांत इकडे तिकडे हिंडतांना त्यांची ऐट पाहावी ! बाहेर जायसाठीं वेषभूषा देखील त्या अशा युक्तीनं करतील कीं रस्त्यांतल्या लोकांची नजर आपल्या लावण्याप्रमाणेंच त्या किल्ल्यांच्या जुडग्याकडे जावी !

अन् याबद्दल मी त्यांना दोष देत नाहीं.

कारण, या कलमाखालीं मीसुद्धां दोषी ठरेन हें मला विसरतां येत नाहीं.

मी अगदी लहान असतांना एकदां एक किल्ली मला सांपडली. ती कांहीं हीं अगदीं नवी कोरी नव्हती, पण जुनी गंजलेलीहि नव्हती. ठेवून दिली मीं ती. मला तिचा दुसरा कांहींच उपयोग नव्हता म्हणून मी ती उलटी करून खालच्या ओठांवर दाबून धरून शिट्टीसारखी वाजवूं लागलों. घरांत सारखा तो आवाज सुरू झाला. मला तो गोड वाटत होता. पण वडील माणसांचं तसं मत पडलं नाहीं. कुणीसं मला सांगितलं, 'ती फेंकून दे.' मी तें मानलं नाहीं. कारण तिचा मला शिट्टीसारखा उपयोग करतां येत होता हें तर झालंच, पण जानव्याला अडकवून ती गरगर फिरवितांना "मी आतां मोठा झालों" अशा कल्पनेचं एक नवीन सुखहि मला घेतां येत होतं. वास्तविक घरांत खास माझ्या मालकीची अशी एकहि वस्तु नव्हती. माझ्या ताब्यांत लहानसंदेखील असं फडताळ नव्हतं कीं, ज्याला मला कुलूप लावतां येईल. इतकंच काय त्या किल्लीनं उघडावं असं कुलूप तरी कुठं होतं माझ्याजवळ ? पण तरी ती किल्ली मला हवी होती. मी

वाढलों, मोठा झालों, स्वतंत्र झालों असं मला तिच्यामुळं वाटून घेतां येत होतं. मग मी ती काय म्हणून फेकून देईन ? मी नाहीं टाकली ती. उलट त्यानंतर सांपडतील तितक्या चाव्या जमवूं लागलों मी.

अन् असा संग्रह अजूनहि मी करतों. मला वाटतं प्रत्येक मनुष्य करतो. चपट्या, पोकळ, लोखंडी, पितळी, लहान मोठ्या किल्ल्यांनीं भरलेला एक डबा प्रत्येक घरांत कुठें तरी ठेवलेला असतोच. घरांतल्या एखाद्या कुलपाची किल्ली हरवली कीं त्या उपयोगी पडतील अशी अपेक्षा असते. ठरीव दुर्दैव असं कीं, त्यांतली एकहि कधीं वेळेला उपयोगी पडत नाहीं. अन् तरी तो विचित्र संग्रह आपण ठेवतोंच ! नादुरुस्त कुलपाच्या पेचप्रसंगांत तुम्हां-आम्हांला मदत करणारा मित्र एकच. "टाला चावो ऽ ऽ ए" ओरडणारा फेरीवाला ! त्याची मला वाट पाहिली पाहिजे !

## नं. १० : ' कारागीर '

कधीं कधीं वाटतं, खुशाल दाढी वाढवावी अन् या दैनिक श्मश्रूच्या गुलामगिरींतून कायमचं मोकळं व्हावं !

गुलामगिरी नाहीं तर काय हो ? कोण हा रोजचा खटाटोप, अन् कसली ही हनुवटीवर धरलेली दैनिक कर्तव्याची धार ! सकाळचा चहा झाल्यावर खरं म्हणजे खुशाल सिगरेट ओढीत अर्धा तासभर आरामखुर्चींत पडावं असं वाटत असतं. दिवसांतली प्रारंभीची पहिली सिगारेट ओढायची मजा कांहीं न्यारीच. ताम्रमुखीचं हें दैनिक ' पहिलं चुंबन ' मजेनं सावकाश उरकतां आलं तरच त्याची खरी गोडी घेतां येते. पुरुष कचेरींत जायला निघाला कीं थकलेल्या इंग्रज जोडप्यांत ' चोंच मारण्या 'च्या थाटाचा जो मुखविधि पार पडतो त्याला चुंबन का म्हणतां येईल ? अन् तशाच घाईघाईनं सिगरेटचे चार झुरके घेणं म्हणजे सिगरेट ओढणं का म्हणायचं ? चहा आटपल्यावर जी तल्लफ येते ती चार धांवत्या धांवत्या झुरक्यांची नव्हे, तर सिगरेट हातीं धरून " ये लाडके, आतां तूं अन् मी ! " असं म्हणण्याची ! पण ही तल्लफ कधीं नीट भागेल तर शपथ ! कारण पहिलाच झुरका ओढून उजवा हात सफाईनं दूर करावा तों डावा हात साहजिकपणें हनुवटीवर अन् गालांवर फिरतो, अन् मन दचकून म्हणतं, " अरेच्या, दाढी केली पाहिजे आधीं ! " असा व्यत्यय झाला कीं सिगरेटची लज्जत अर्धीअधिक गेलीच कीं नाहीं ?

बरं, दाढी करायची म्हणजे खटपट काय थोडी आहे ? तें गरम पाणी मिळविणं, तें ब्लेडला धार लावणं, अन् तें सर्कसमधल्या विदूषकाचा सहज भास व्हावा इतका साबणाचा जाड थर तोंडभर चढविणं ! अन् इतकं करूनहि ' रक्तपाता 'वांचून खरडपट्टी पार पडेलच असा कांहीं नियम नाहीं.

६१२२

त्यामुळें वारंवार मनांत येतं, कीं दैनिक श्मश्रूचा हा सासुरवास बस्स झाला. खुशाल दाढी वाढवावी !

दाढी वाढविण्याचे विचार कधीं कधीं फार जोरानं येऊन जातात माझ्या मनांत. मग कोणत्या फॅशनची दाढी आपण राखावी असा प्रश्न पुढें उभा राहतो. कारण दाढीचे अनेक प्रकार आहेत. फ्रेंच लोकांत दाढी मोठं प्रतिष्ठेचं लक्षण समजलं जातं. पण ते तिचे फार लाड चालूं देत नाहींत. आपल्या सबंध चेहऱ्यावर तिचं साम्राज्य पसरूं द्यायची त्यांची तयारी नसते. अधरोष्ठाच्या खालच्या सापटींत तिनं आपली वसाहत करून फार तर चार-सहा बोटं वाढावं इतकीच परवानगी ते तिला देतात. शीख लोकांची दाढी निराळ्या तऱ्हेची. तिची मशागत ते इतक्या प्रेमानं अन् आदरानं करतात कीं त्यांच्या " ग्रंथसाहेबा "साठीं देखील ते इतका वेळ खर्चीत नसतील. याखेरीज मोंगली दाढी म्हणून प्रकार आहे. अन् ' शिवाजी ' छाप दाढी तर तुम्हांला माहीतच आहे. या वेगवेगळ्या तऱ्हांपैकीं आपण कोणती पसंत करावी या प्रश्नाचा विचार मी जेव्हां करूं लागतों तेव्हां मनाचा निश्चय करणं मला फार कठीण जातं. त्यांतल्या त्यांत ' शिवाजी ' छाप दाढींत कमींत कमी कष्ट अन् जास्तींत जास्त फायदा दिसतो. कारण, ती धारण केली कीं प्रचण्ड विद्वत्ता आपल्या अंगीं लोकांना दिसूं लागेल, अन् शिवाय हिंदुत्वनिष्ठाहि आपल्याला मिरवितां येईल, हा हिशोब उघड आहे. परंतु पुन्हा एक मोठी अडचण मनांत येते. दाढी पुरती वाढल्यावर आपलं सोंग कदाचित् रुबाबदार दिसेल, पण ती वाढेपर्यंत ? वाढत असतांना ? तोंपर्यंत कुठें दडी मारायची ? या प्रश्नांचीं उत्तरं सापडत नाहींत, अन् मग दाढी वाढविण्याऐवजीं दाढी करण्याच्या गुलामगिरींत मी खितपत पडतों. दाढीवाल्या विद्वान् लोकांच्या संख्येंत आणखी एका आंकड्याची भर पडायची मग राहून जाते. मी तरी काय करूं ? मात्र दैनिक श्मश्रूवरचा माझा राग कांहीं नाहींसा झालेला नाहीं. तिच्या गुलामगिरीच्या शृंखला तोडण्याचे बेत माझं "दुसरं" मन सतत करीत असलं पाहिजे.

हो; एरवीं त्या दिवशीं मला इतका आनंद झाला नसता !

एका मित्राच्या गांवीं सुटीचे चार दिवस निवान्तपणीं घालविण्यासाठीं मी गेलों होतों, अन् सकाळीं उठून बॅगमधून दाढीचं सामान काढूं लागलों तर तें मला सापडेना. घरून घाईघाईनं निघतांना तें घ्यायला मी विसरलों असलों पाहिजे.

एकदम एक कल्पना माझ्या मनांत आली. दाढी वाढवायला ही संधि चांगली आहे. चार दिवसांऐवजीं दाढीला चांगलं बाळसं येईपर्यंत मीं राहिलों तरी माझ्या मित्राला नको वाटणं शक्यच नव्हतं. उलट त्याला आनंदच वाटणार होता. बस, मग ठरलं तर !

फार आनंद झाला मला. " कुठल्याहि गोष्टीची वेळ यावी लागते " म्हणतात तें कांहीं खोटं नाही. माझ्या दाढीची वेळ आली होती खास ! क्षणभर मीं देवाचं अस्तित्वहि मान्य केलं. दाढींतसुद्धां परमेश्वरी सूत्र असतं अशी कबुली मीं दिली. तो दिवस मीं फार आनंदांत काढला. रात्रीं स्वप्नांत माझे दाढीसकटचे फोटो वृत्तपत्रांत येऊं लागलेले मला दिसले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठल्याबरोबर आधीं आरशांत पाहूं लागलों. होय, वाढूं लागली होती ती ! या गतीनं सुमारें महिन्याभरांत...असे विचार करीत मी डाव्या हातानं गाल व हनुवटी चाचपूं लागलों !

मित्रानं भलताच अर्थ केला. तो म्हणाला,

" करणार काय दाढी ? पाणी देऊं आणून ? "

एकदां वाटलं शिवाजीची नक्कल करण्याचा आपला ऐतिहासिक बेत त्याला सरळ सांगून टाकावा. पण पुन्हा विचार केला, नको, दाढीच्या बाबतींत देखील गनिमी कावा लढविलेलाच बरा. शिवाजीनं तरी बापाला आधीं सुगावा लागूं दिला असेल कीं काय दाढी वाढविण्याच्या आपल्या बेताचा. असंहि मनांत आलं कीं ऐतिहासिक कागदपत्रावरून या मुद्दयाचं संशोधन करून पुण्याच्या इतिहास-संशोधक-मंडळाच्या पुढच्या वार्षिक बैठकींत 'शिवाजीच्या दाढी'वर निबंध वाचायला काय हरकत आहे ?... मी माझ्या मित्राला उत्तर दिलं,

" पण दाढीचं सामान आणायचं विसरलों मी. "

तो म्हणाला, " असं ? कांहीं हरकत नाहीं. आमच्या पांडूला बोलावतों. असा हलका हात आहे त्याचा. बघ तरी. अरे गणू, गणू !...हें बघ, धांवत जा, अन् पांडूला घेऊन ये. म्हणावं मुंबईचे पाहुणे आले आहेत, त्यांची... "

मी नको नको म्हणणार तों गणू पळालादेखील.

आणि नंतर दहा मिनटांतच प्रत्यक्ष पांडुरंगाची मूर्ति खोलींत दाखल झाली !

पाणी आलं, पांडूनं बैठक मारून आपली " पोर्टमॅंटो " उघडली, दोनतीन वस्तऱ्यांची धार बोटाला लावून पाहिली, त्यांतला एक पसंत करून कातड्याच्या तुकड्यावर 'सटपट' केलं, अन् हसत माझ्याकडे पाहिलं. हनुवटी वर करण्यावांचून मला गत्यंतरच उरलं नाहीं.

त्याचा हात खरोखरच हलका होता, पण जीभ त्याहूनहि. अन् तिचंच काम अधिक जोरानं चालू केलं त्यानं. किती मिठास वाणी होती त्याची ! अन् किती अस्खलित बडबड चालली होती त्या जवळजवळ सत्तर वर्षांच्या वृद्ध 'कारागिरा'ची !

" यंदा पाऊसपाणी छान झालं आहे, " तो सांगत होता. "सटवाईच्या ओढ्याला असा पूर माझ्या हयातींत आला नसेल. पिकं सोळा नाहीं अठरा आणे येतील असा रंग आहे, पण शेतकरी अधिक सुखी होतील म्हणतां काय ? कसले होतात ? सावकारांनीं पुरतं नाडलंय त्यांना. दाणा ज्यास्ती निघाला तरी त्याचा पैसा जाणार सावकाराच्या घरांत; शेतकरी नागवा तो नागवाच अन् उपाशी तो उपाशीच राहणार सदा. त्यांतून जवळच्या तुलुक्याच्या गांवांत दारू, जुगार, सगळ्या फंदांची आतां सोय झालेली. पूर्वीं पंचवीस कोसांवर साताऱ्याला जावं तेव्हां नशापाणी करायला मिळायचं. आतां बाटलाबाई दहा मैलांवर आली ना ! दोन आणे दिले कीं मोटार मिळते. शेतकऱ्याची दैना आतां या कलियुगांत कधीं संपायची नाहीं. 'कांगरिस'वालं भलं करून राह्यलेत. पण त्यांच्यांत तरी

एकी कुठं आहे? अन् सारेच गांधी टोपीवाले सच्चे कुठं आहेत? सणगराम मारवाड्याचा पोरगा खादी घालून मिरवतो, कऱ्हाडपर्यंत जाऊन व्याख्यानं देतो. पण 'लोकलबोरडां'त किती पैसे खाल्ले असतील त्याचा कांहीं हिशोब? काय सांगायच्या आमच्या खेड्याच्या गोष्टी, रावसाहेब आपणांला?..."

अन् हें पालुपद पुनः पुन्हा उच्चारीत त्याच्या माझ्याशीं अक्षरशः कान-गोष्टी चालूंच होत्या.

मला तो आवडला–हाताच्या करामतीसाठीं नव्हे, पण त्याच्या गोष्टी-वेल्हाळपणासाठीं. नुसती दाढी बनविणं येवढंच तो आपलं काम समजत नव्हता. "प्रचारात्मक कले"चा पुरस्कर्ता दिसला तो.

नंतरच्या चार दिवसांत त्यानं किती तरी गोष्टी ऐकविल्या मला. त्या खेड्याची सहा महिने पाहणी करून मिळवितां आलं नसतं इतकं ज्ञान पांच दिवसांत त्यानं मला दिलं! अन् माझं मनोरंजन त्यानं कमी केलं म्हणतां काय? दाढीचं सामान मीं घरीं विसरून आलों याबद्दल मला मुळींच पश्चात्ताप वाटला नाहीं.

उलट, माझ्या मनांत आलं आधुनिक सुधारणेच्या कालांत ही नमुनेदार 'कारागिरा'ची जात आपण पार नष्ट होऊं देत आहोंत हें बरं काय? या नव्या जमान्यांत वेळ अन् पैसा वांचविण्याच्या हेतूनं माणूस आपल्या शक्य तितक्या गरजा स्वतः भागवूं पाहत आहे. "घरचा वैद्य" "घरचा इंग्रजी शिक्षक" "घरचा संगीत शिक्षक" अशीं पुस्तकं खरेदी करून प्रत्येक नागरिक मास्तर, गवई, डॉक्टर स्वतःच होतो, अन् दीड दोन रुपयांचा वस्तरा विकत घेऊन तो 'घरचा न्हावी'ही झाला आहे. परंतु यामुळें पांडूसारखे कारागीर नाहींसे होत आहेत त्याची वाट काय? पूर्वीच्या काळीं या कारागिराला केवढं महत्त्व होतं! अकबर बादशहानं बिरबलला विचारलं, "जगांत सर्वांत मोठी सत्ता कुणाची? बादशाहाची कीं नाहीं?"

"नाहीं खाविंद." बिरबल म्हणाला.

"बादशहाची नाहीं? मग कुणाची?"

"न्हाव्याची!"

"अफ्सोस ! ती कशी ?"

"सारी दुनिया ज्याच्यापुढें मस्तक वांकविते तो बादशहा न्हाव्यापुढें शिर नमवितो ना सरकार ?"

बादशहा निरुत्तर झाला.

या दंतकथेंत मोठा अभिप्राय आहे. श्मश्रू करणाऱ्या न्हाव्याचं पूर्वीं खरोखर फार मोठं महत्त्व होतं. मुंडनाचं पुण्य तर तो लोकांच्या पदरीं टाकीत असेच, पण शिवाय गोड गोड बोलण्याचं कसब त्याच्याजवळ असे. त्याला "कारागीर" म्हणायची चाल पडली ती उगीच नाहीं. आणि साऱ्या गांवच्या गटारबातम्या फुकटांत ऐकविण्याची कामगिरी तो हौसेनं करीत असे हें विसरून कसं चालेल ! त्या काळांतला 'कारागीर' म्हणजे त्या वेळचं चालतं बोलतं दैनिक वृत्तपत्रच कीं ! किती महत्त्वाची "संस्था" ती त्या वेळची !

इतर जुन्या संस्था लयाला जात आहेत तशीच ही देखील जाणार !

आमच्या नातवा-पणतवांना या 'संस्थे'ची कल्पनाहि करतां यायची नाहीं !

आतां हातानं दाढी करतांना कधीं कधीं हे असले विचार माझ्या मनांत येतात, अन् मग आरशांत स्वतःच्या चेहऱ्याचं प्रतिबिंब दिसण्याऐवजीं नव्या काळाच्या उदरांत धैर्यानं गडप होणाऱ्या "कारागिरां"च्या अस्पष्ट आकृती मला दिसूं लागतात !

मी एक सुस्कारा टाकतों, व गालावर ब्रशॉनं साबण चोळीत मनाशीं म्हणतों, "असं चालायचंच. जुन्यांतल्या वाइटाबरोबर कांहीं चांगलंहि नष्ट होणारच ! त्याला इलाज नाहीं !"

## नं ११ : पुरून ठेवलेलें धन

माझ्या रुकारामुळें त्या लोकांना आनंद तर झालाच, पण त्यांना आनंदाइतकंच आश्चर्यही वाटलं असावं. त्यांच्या गांवीं जाऊन मी व्याख्यान द्यावं अशी विनंति करायसाठीं तें आले होते, व विशेष आढेवेढे न घेतां मीं त्यांचं आमंत्रण स्वीकारलं होतं. त्यांचे चेहरे हर्षानं प्रफुल्ल झाले. पण एकमेकांकडे त्यांनीं जी नजर टाकली तींत "आपलं काम इतक्या सहज झालं ?" अशा विस्मयाचा अभिप्राय मला स्पष्ट दिसला. त्यांच्यांतले एक गृहस्थ माझ्याकडे बघून म्हणाले,

"आमची कल्पना नव्हती इतकं सहजासहजीं आमचं काम होईल अशी; आम्हीं ऐकलं होतं कीं व्याख्यानाचं आमंत्रण स्वीकारण्याच्या बाबतींत आपण फारच......"

त्यांना वाक्य पुरं करूं न देतां मी म्हटलं,

"माझ्या मित्रांनीं माझ्याविषयीं जे अनेक गैरसमज पसरविले आहेत त्यांपैकीं हा एक आहे..."

ते हसले व म्हणाले, "असं होय ? मग निराळं."

तथापि कांहीं वेळानं निरोप घेऊन ती मंडळी निघाली तेव्हां माझे पुन्हा आभार मानतांना ते गृहस्थ म्हणालेच, "अन् आम्हांला खरंच आश्चर्य-चकित करून टाकलंत आपण..."

तें ऐकून एकदां वाटलं त्यांच्या गांवीं व्याख्यानासाठीं जाण्यांत आपला खरा हेतु काय आहे तो सांगून टाकावा; पण पुन्हा विचार केला, कशाला सांगा ? सांगितला तरी तो त्यांना नीट कळायचाहि नाहीं. कारण, तो सर्वस्वीं माझ्या खाजगी सुख-दुःखाचा होता.

त्या गांवी लहानपणीं एक वर्ष मी राहिलों होतों व आजपर्यंत असंख्य वेळां तिथल्या कित्येक स्थळांच्या अन् व्यक्तींच्या आठवणी या ना त्या निमित्तानं होऊन मला वाटलं होतं, जावं एकदां पुन्हा त्या गांवीं अन् करावी तिथें घालविलेल्या रम्य कालाची उजळणी. तिथलं तें राममंदिरा-पुढचं विस्तीर्ण पटांगण. विटीदांडूचे किती तरी चुरशीचे डाव आम्ही तिथें खेळलों असूं. तिथली ती फौजदार कचेरी. तिच्यावरून जातां येतां आमचे आवाज हलके होत असत, पावलं झपाझप पडत असत; या पोलिस लोकांची आपल्यावर तर कांहीं कारणानं नजर नसेल अशा बालिश भीतीनं छाती धडधडूं लागत असे. रामूचं चिवड्याचं दुकान. कुणाला वरून पैसा मिळाला कीं, त्यानं साऱ्या सोबत्यांना रामूच्या दुकानांतला चिवडा द्यायचा असा आमच्यांत गुप्त संकेत असे. घरीं माझी आई पुष्कळदां चिवडा करी; पण रामूच्या चिवड्याची लज्जत त्याला कधीं येत नसे. तशीच संभूराव घाटग्यांच्या घरामागची ती बाग. झाडावर चढून पिकलेलीं शिताफळं तिथं कितीदां तरी मीं खाल्लीं असतील. त्या बागेंतल्या एका कोपऱ्यांत काकडीचे वेल असत. त्यांवरच्या कोंवळ्या काकड्या काय संभूरावांच्या मालकीच्या होत्या म्हणतां ? त्या गांवचा दर गुरुवारीं भरणारा बाजार. केवढी गर्दी अन् धांदल दिसायची मला त्या दिवशीं. शाळा लवकर सुटली कीं घरांत दप्तर टाकून केव्हां एकदां बाजार पाह्यला जाऊं असं वाटायचं मनाला. खिशांत एक दिडकीसुद्धां नसतांना बाजारांत आलेल्या साऱ्या जिनसा न्याहाळीत तिन्हीसांजा होईपर्यंत रेंगाळत हिंडायचा मी दोन चार सोबत्यांना बरोबर घेऊन. प्रत्येक बाजाराच्या दिवशीं एक जादूगार येत असे. त्याच्याभोंवतालच्या कोंडाळ्यांत अगदीं आघाडीवर असायचा मी. तो मातींतले खडे उचलून त्यांचे रुपये कसे करतो याबद्दल आम्ही एक-मेकांत पुष्कळदां चर्चा करीत असूं; पण कधीं त्या चमत्काराचा उलगडा होत नसे. तसंच त्या गांवच्या सीमेवरच्या टेकडीवरचं तें बहिरोबाचं देऊळ. केवढी उंच टेकडी होती ती! तिच्या माथ्यावर जाऊन पतंग उडविण्याची मोठी मौज असे. कुळकर्ण्यांचा तात्या काटाकाटी खेळण्यांत फार तरबेज. त्याचा पतंग आभाळांत उंच जाऊन ठिपक्यासारखा दिसूं

लागला कीं तो कांही वेळ मांज्या माझ्या हातीं देत असे. तात्या श्रीमंत होता असं माझं अनुमान होतं, अन् जगांत सगळ्यांत सुखी प्राणी कोणी असेल तर तो असं मला वाटे. मी शक्य तितका त्याच्या संगतींत राहात असे. आणि त्या गांवांतली ती शाळा. मला फार आवडत असे ती; अन् आमचे पुस्तीचे मास्तर तर माझ्या फारच प्रीतींतले होते. ते धोतराचा काचा कसायचे, करकर वाजणारा चढाव घालायचे, अन् माझ्या पुस्तीला नेहमीं दहांपैकीं आठ नऊ मार्क द्यायचे !...

या सर्व आठवणी माझ्या मनांत आज किती तरी वर्षं होत्या, अन् त्या गांवीं केव्हां तरी एकदां जावं अन् जीं सुखं तिथें टाकून मी दूर आलों तीं पुन्हा एकदां अनुभवावीं असं मला वारंवार वाटलं होतं. मीं त्या गांवीं व्याख्यान द्यायचं कबूल केलं तें या गुप्त हेतूमुळें.

अर्थात् मी जायला निघालों तो अतिशय उत्कण्ठेनं.

पण तिथें पोंचल्यावर अन् एक दिवस राहिल्यावर माझी केवढी निराशा झाली ! जें सापडेल असं मला वाटलं होतं तें मला सांपडलं नाहीं. संभूराव घाटग्यांची बाग तर उध्वस्तच झाली होती, अन् रामू चिवडेवाल्याचं देहावसान होऊन त्याच्या दुकानाच्या जागीं एक केस कापायचं घाणेरडं दुकान थाटलं गेलं होतं. पण बाकीच्या ज्या वस्तू अन् व्यक्ती मला लहानपणीं विलोभनीय वाटल्या होत्या त्यांच्या ठिकाणीं तरी ती जुनी गोडी कुठें राहिली होती ? माझे ते पुस्तीचे मास्तर आतां पंचा नेसूं लागले होते, त्यांच्या बत्तीशीनं बहुतेक रजा घेतली होती, त्यांच्या चेहऱ्यावर कधींकाळीं बेदरकार रंगेलपणा होता हें आतां मला खरं देखील वाटेना. कुळकर्ण्यांच्या तात्याला मीं प्रथम ओळखलंच नाहीं. त्याची इस्टेट भाऊबंदकीच्या कज्जांत अर्धीअधिक खलास झाली होती. त्याला तीन लग्नं केल्यावर कुठें एक मूल झालं होतं, अन् तेंहि रोगं रडकं. त्याचे सारे केस पांढरे धोप झाले होते. मीं त्याला विचारलं, "बहिरोबाच्या टेकडीवर तूं पतंग उडवायचास, आठवतं का तुला ?" तेव्हां जणूं मागच्या जन्मींची गोष्ट कष्टानं आठवून उदासवाणं हास्य करून तो म्हणाला, "हां. स्मरतं थोडसं." तें ऐकून

मला वाईट वाटलं. मी त्याच्या घरीं मग फार वेळ बसलों नाहीं. पण याहीपेक्षां माझ्या मनाला अधिक मोठा धक्का बसला तो बाजारपेठ अन् बहिरोबाची टेकडी पाह्यला मी गेलों तेव्हां. जी बाजारपेठ मला पूर्वीं मोठी विस्तीर्ण वाटली होती ती फार तर एक फर्लांगभर लांब होती, अन् जी टेकडी खूप उंच म्हणून माझ्या आठवणींत होती ती टेकडी कसली एक मोठासा उंचवटा होता असं मला आढळून आलं. लहानपणाच्या मापानं ज्या जागा मला भव्य अन् उंच वाटल्या होत्या, आणि ज्या व्यक्ती मला प्रिय वाटल्या होत्या त्यांपैकीं एकीचंहि तें स्वरूप आतां मला दिसेना.

मी त्या गांवाहून परत आलों तो अगदीं तीव्र असंतोषानं अन् निराशेनं. क्रमिक पुस्तकांतल्या भावी मनोरथांचे मनोरे रचणाऱ्या महंमदाची लाथ लागून त्याची गाडग्यांची उतरंड पडून फुटली, तद्वत् माझ्या कित्येक सुखदायक स्मृतींची उतरंड ढासळून कायमची फुटून गेली होती ! त्या गांवाचा मला अगदीं राग आला !

पण मग माझ्या लक्षांत आलं कीं यांत त्या गांवाचा दोष नव्हता. माझीच चूक होती. ज्या स्थलानं अथवा व्यक्तीनं कधीं काळीं आपल्याला आनंदित केलं, त्याच्या किंवा तिच्या पुनर्भेटींत तो हर्ष पुन्हा आजहि लाभेल हा हिशोबच खोटा आहे. ज्या माणसाच्या मनाचा सतत विकास होत आहे त्यानं तर असा हिशोब कधींच करूं नये.

स्थलं अन् व्यक्तीच कशाला, जीं पुस्तकं पूर्वीं कधीं तरी मला फार आवडलीं तीं सुद्धां मीं पुन्हा आज वाचलीं तर माझी निराशा होते व त्यांविषयीं मनांत धरलेल्या प्रीतीला धक्का बसतो हें मला माहीत आहे. मेरी कॉरेलीच्या कादंबऱ्या पंचवीस वर्षांपूर्वीं मीं वाचल्या तेव्हां त्यांनीं केवढी मोहिनी माझ्यावर घातली होती ! पण थोड्याच दिवसांपूर्वीं मी "थेल्मा" वाचूं लागलों तों तिच्यांत माझं मन रमेना. पूर्वींच्या माझ्या अभिरुचीच्या अपरिपक्वतेची मला शरम वाटूं लागली. हीच गोष्ट मिसेस हेन्रीवुडच्या कादंबऱ्यांची; अन् एके काळीं जिच्या कादंबऱ्यांवर मी फिदा होत होतों त्या जेन ऑस्टेन या लेखिकेची. इतकंच काय, हरिभाऊ

आपळ्यांच्या कादंबऱ्या पुन्हा आज वाचल्या तर माझ्या स्मृतिकपाटांतल्या कांहीं अतीव नाजुक आठवणींना धक्का लागेल असं मला भय वाटतं. मी त्या पुन्हा वाचणार नाहीं. कारण, त्या फार सुंदर आहेत असं मला आठवतं, अन् ही आठवण दुखविली गेली तर मला फार फार वाईट वाटेल. जीं पुस्तकं वाचण्यांत मी लहानपणीं तन्मय होऊन आनंदाच्या कित्येक घटका घालविल्या, त्यांची मी फक्त गोड आठवण ठेवीन. त्यांचा आनंद पुन्हा प्रत्यक्ष घेण्याचा प्रयत्न मी करणार नाहीं !

कारण त्या गांवीं जाऊन आल्यापासून मी एक मोठा धडा शिकलों आहे. जें एकदां आपल्याला रम्य वाटलं तें पुन्हा वाटेलच अशा आशेनं तिथं गेलं कीं निराशा होते. जुन्या सुखाच्या स्मृती पुन्हा जिवंत करण्याचा प्रयत्न सहसा यशस्वी होत नाहीं. मी बदलत आहे. माझ्या अभिरुची, माझ्या अपेक्षा बदलत आहेत. मग पूर्वीं कधीं काळीं आवडलेलीं पुस्तकं, स्थळं, गांवं, व्यक्ती आज मला सुख कसं देऊं शकतील? त्यांच्या आठवणी हें एक पुरून ठेवलेलं धन आहे. तें त्या ठिकाणीं आहे येवढीच जाणीव मी ठेवावी, पण तें पुन्हा उकरून काढून पाहण्याचा मोह मी टाळावा हेंच शहाणपणाचं नव्हे काय ?

## नं. १२ : बाजार

असं पुष्कळदां होतं. मला अमुक वस्तु अगदीं निकडीनं हवी असते म्हणून नव्हे तर बाजारांत जाऊन कांहीं तरी खरेदी करण्याची मला लहर येते म्हणून मी जातों, अन् ज्या वस्तु आणखी आठ-पंधरा दिवस घेतल्या नसत्या तरी चाललं असतं अशा वस्तू विकत घेऊन मी घरीं येतों. घरीं कागद शिल्लक असतात, पण मी ते घेऊन येतों. मनाशीं मी म्हणतो, आज नाहीं तरी आणखी चार दिवसांनीं ते लागतीलच ना! वस्तऱ्याच्या ब्लेड्स सरलेल्या नसतात, तरी मी त्या आणतों. अन् अशाच प्रकारें शाई, पेन्सिली, नोटपेपर, इत्यादि किती तरी वस्तु मी नेहमीं आणीत असतों. कित्येकदां असंहो होतं कीं दुकानांत शिरतांना ज्या वस्तू घेण्याचा माझा यत्किंचित्‌ही बेत नसतो अशा वस्तू खरेदी करून मी दुकानाबाहेर पडतों. मला हवे असलेले नोटपेपर बांधतां बांधतां दुकानदार विचारतो,

"आणखी काय देऊं? सेंट वगैरे...?"

मी सांगतों "नको."

"पण पॅरिसचे नवे सेंट आले आहेत. दाखवूं?"

माझ्या मनांत येतं, बघायला आपलं काय जातं? नोटपेपरांचं बंडल मी उचलीत नाहीं, तेवढ्यावरून दुकानदार माझ्या मनांतला विचार ओळखतो. तो लगबगीनं कपाटांतून एक मोठी कागदाची पेटी काढतो, व दुसऱ्याच क्षणीं सेंटच्या दहापंधरा सुंदर मोहक बाटल्या माझ्यापुढें मांडल्या जातात. मी त्यांवरची नांवं वाचूं लागतों, मधेंच एखादीचं टोपण काढून तिच्या सीलबंद तोंडांतून तिच्यांतल्या सुगंधाची कल्पना यावी म्हणून ती नाकाजवळ नेतों, व तें पाहून दुकानदार म्हणतो,

" बघायलाच नको. अगदीं गॅरंटीचा माल आहे. हा " जस्मिन " घ्या. आपल्याला आवडेल..."

मी ती बाटली घेतों.

दुकानदार मनांत कदाचित् म्हणत असेल, " कसं बनवलं ? "

पण तो असं समजत असेल तर तो खुळा आहे. मला माझ्या मनाविरुद्ध त्यानं एखादी गोष्ट करायला लावलेली असते असं मुळींच नाहीं. ज्यावांचून अडलं आहे तेवढंच घ्यायसाठीं मनुष्य दुकानांत जातो असं त्याला वाटत असेल तर ती चूक आहे त्याची. दुकानदारानं आपल्याला कांहीं तरी घेण्याचा आग्रह करावा अशी माणसाची इच्छा असते. अशा आग्रहानं माणसाच्या ठिकाणची मोठेपणाची हाव पुरी होत असते. या इच्छापूर्तीच्या सुखासाठीं माणसं बाजारांत जातात. नको त्या वस्तू दुकानदाराच्या आग्रहाखातर विकत घेतल्या कीं, आपण कुणी तरी बडे शेठ आहोंत असं घटकाभर वाटतं. 'वस्तु' नव्हे, तर या जाणीवेचं सुख मनुष्य विकत घेत असतो. आपण बनलों, असं दुकानदार समजत असेल हें माणसाला समजतं. पण जें सुख त्याला हवं असतं तेवढ्यासाठीं ही किंमत द्यायची त्याची तयारी असते.

निदान माझी तरी असते. बाजारांत जायचं अन् नेमकी हवी तेवढीच वस्तु घेऊन परत यायचं म्हणजे शुद्ध वेडेपणा म्हटला पाहिजे. कारण 'बाजारांत जाणं' हा एक खेळ आहे. वेळ घालावयासाठीं लोक पत्ते खेळतात, बुद्धिबळं, कॅरम खेळतात. मला कंटाळा आला, अन् दुसरं कांहीं करण्यासारखं नसलं कीं, मी उठतों अन् बाजारांत जातों. दहा-पांच दुकानांत हिंडलं, दोन चार वस्तू खरेदी केल्या कीं, बरं वाटतं. खिशांतले पैसे गेलेले असतात येवढंच वाईट.

पण 'बाजारांत जाण्या'चा हा खेळ पैसे खर्च न करतां खेळतां येत नाहीं असं समजूं नका. दुकानदारानं चार शिव्या दिल्या तरी त्या मनावर न घेण्याचा अभ्यास केला तर हा खेळ अगदीं फुकटांत हवा तेवढा खेळतां येतो. ज्या गांवीं आपल्या ओळखीपाळखीचं कोणी नाहीं, अन् प्रतिष्ठेची

झूल अंगावर ठेवण्यांचं आपल्याला प्रयोजन नाहीं अशा गांवीं या खेळाला फार रंग चढतो. अगदीं परप्रांतांतल्या शहरांत गेल्यावर तिथलीं प्रेक्षणीय स्थळं पाहण्यांत जितकी गंमत आहे, तितकीच उगीचच्या उगीच बाजार-पेठेतलीं दुकानं धुंडाळण्यांत आहे कीं नाहीं अनुभव घेऊन पाहा. साध्या कापडदुकानापासून तों जवाहिऱ्याच्या दुकानापर्यंत वाटेल तिथें शिरावं, तऱ्हेतऱ्हेचा माल पाहावा, अन् अखेर नापसंतीची मुद्रा करून बाहेर पडावं. येवढंच कीं, ही बाहेर पडण्याची क्रिया फार कौशल्याची गोष्ट आहे. दुकानांत शिरणं फार सोंपं; पण कांहीं खरेदी न करतां शिरसलामत बाहेर पाऊल टाकणं वाटतं तितकं सोपं नाहीं.

एकदां दिल्लीस असतांना मी एका शालविक्याच्या दुकानांत शिरलों. लोडाला टेंकून बसलों. बड्या गिऱ्हाइकाचा आव आणला. पांचपन्नास शालजोड्यांचा ढीग माझ्यापुढें पडला. मला अर्थात् एकहि पसंत पडेना. दुकानदाराला वाटलं असावं, फार चोखंदळ गिऱ्हाईक आहे. त्यानं आणखी शाली काढल्या. पण एकीचं अंग नापसंत, तर एकीच्या कोपऱ्यांतले नारळ नापसंत, हिची किनार वाईट, तर तिचा रंग फार भडक, अशा शेऱ्यांच्या माऱ्यानं मीं ते ढीग गारद केले. दुकान-दारानं मग अगदीं ठेवणींतल्या शाली काढल्या. मला जरा शरम वाटूं लागली. मीं अखेर एक पान पसंत केलं. दुकानदारानं त्याची किंमत पंचावन्न रुपये सांगितली. “ शीः ! कांही तरीच काय ? ” असं म्हणून मी उठलों व पादत्राण घालूं लागलों. मनांत वाटलं, सुटलों. पण दुकानदार शाल पुढें करून म्हणाला, “ जातां काय एकदम ? आपण बोला कीं ! ” भलतीच कमी किंमत सांगितली कीं आपण सुटूं असा मीं विचार केला, अन् सारा सज्जनपणा गुंडाळून ठेवून म्हटलं, “ वीस रुपये देईन. ” दुकानदारानं शाल माझ्या अंगावर फेकून म्हटलं, “ चला काढा पैसे. भवानी होऊं द्या आपल्या हातून ” ! शाल अंगावर असूनहि मी थंडच झालों ! शालीऐवजीं शालजोडींतले मिळाल्यासारखा चेहरा खचित झाला असेल माझा पैसे देतांना !

असला प्रसंग टाळण्याची एक नामी युक्ति माझ्या एका मित्रानं शोधून काढलेली आहे. तो मुळीं दुकानांत शिरल्याबरोबर दुकानदाराला प्रथमच सांगून टाकतो, "मला आतांच कांहीं खरेदी करायची नाहीं हो. फक्त माल पाह्यचा आहे." दुकानदाराला मग म्हणणं भागच पडतं, कीं "कांहीं हरकत नाहीं. बघा, बघा; काय दाखवूं ?" अशा प्रकारें दुकानदाराला निःशस्त्र केल्यावर मग काय ? त्याचं दुकान म्हणजे माझ्या मित्राचं राज्यच कीं. अगदीं उंची रेशमी, गरम, कापडाचे तागेच्या तागे त्यानं खुशाल पाहावे. "हें छान आहे. याचा भाव काय ?" असं मधूनमधून विचारलं म्हणजे झालं. शर्टिंग, कोटिंग, रेशमी लुगडीं, नाना प्रकारच्या डिझाइनचीं सहा वारी पातळं, हवं तें बघावं; दुसऱ्या दुकानांत शिरून पांच पन्नास छत्र्यांची उघडझांक करावी; पुढच्या दुकानावर स्वारी करून आरसे, कंगवे, ब्रश निरखावे, साबणाच्या पेट्या उघडायला लावून प्रत्येक पेटींतल्या एका वडीचा सुगंध मनमुराद घ्यावा; अन् "या हं शेठ" अशी सन्मानपूर्वक संभावना प्रत्येक दुकानदाराकडून मिळवीत दोन घटकांची बाजारपेठेची फेरी आटपून प्रसन्न चित्तानं घरीं परत यावं; असं विलक्षण 'टेक्निक्' माझ्या या चतुर मित्रानं साध्य केलेलं आहे. हें तुम्हांला शिकतां आलं तर पहा.

मीं अजून असला प्रयत्न केला नाहीं. दुकानदार काय म्हणेल अशी उगीच भीति वाटते त्याला काय करायचं ?

भाजी व फळबाजारांत मात्र मी पुष्कळदां हा प्रयोग थोडा फार करून पाहतों. कारण तो बोलून चालून रस्त्यावरचा उघडा बाजार. दुकानदाराच्या खाजगी हद्दींत आपण शिरलों आहोंत अशी ( Trespass ची ) जाणीव तिथें मनांत येत नाहीं. ओल्या भुईमुगाच्या किंवा मटाराच्या शेंगांच्या ढिगांत खुशाल हात घालावा, भावाची चवकशी करावी, अन् पुढें जावं. आंबे, सफरचंद, संत्रीं, मुसंबीं उचलून पाहावीं, ठेवावीं; आणि येवढाहि धीर होत नसेल तर नुसती चौफेर नजर टाकीत साऱ्या स्टॉल्समधून चक्कर मारावी. त्यांतहि आनंद कमी नाहीं. मला तर मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केटमध्यें

किंवा पुण्याच्या मंडईंत घटका अर्धी घटका रेंगाळण्यांत विलक्षण मौज वाटते. हरतऱ्हेच्या ताज्या ताज्या भाज्यांचे ते प्रचंड ढीगच्या ढीग अन् कपड्यानं वरचेवर पुसून ज्यांची कांति वाढविली आहे, व झिरझिरीत रंगीबेरंगी कागदांच्या बैठकींत ज्यांची स्थापना केली आहे, अशा सतरा प्रकारांच्या फळांनीं शिगोशीग भरलेले ते करंडे पाहिले कीं, डोळ्यांचं पारणं फिटल्यासारखं वाटतं. धरित्रीच्या उदरांतून बाहेर आलेल्या त्या फलसृष्टीचा सुगंध मिळाला कीं, चित्तवृत्ती ताज्यातवान्या होतात. आणि या बाजारांतला तो अखंड कोलाहल ! तो कानांवर पडला कीं अंतःकरणांत दडून राहिलेला कोणता तरी एक चमत्कारिक, अनामिक संस्कार संतुष्ट झाल्यासारखं मला वाटतं ! मी त्या कोलाहलाशीं क्षणभर एकरूप होतो. माझं व्यक्तित्व विरतं. माझ्या वैयक्तिक सुखदुःखांचे प्रश्न मी पार विसरून जातों. मला बरं वाटतं !

ती पाहा ती माळीण आपल्या भाजीची टवटवी कायम राहावी म्हणून तिच्यावर पाणी शिंपतां शिंपतां किती उल्हासानं "पैशाला दोन लावल्या" म्हणून ओरडते आहे! कोंवळ्या लुसलुशीत खिऱ्यांच्या ढिगामागं बसलेला तो माणूस बघा कसा हसतो आहे व ऐटीनं तागडी झुकवितो आहे! लालसर पिवळसर टपोरीं बोरं विकणारी ती बाई पाहिलीत कशी उच्च रवानं सांगते आहे "साखरलाडू ! सस्ते लावले !" या साऱ्या माणसांना काय प्रपंचाच्या चिंता नसतील ? पण त्यांनीं त्या सगळ्या टाकून दिल्या आहेत, अन् जगाच्या कोलाहलांत तीं सामील होऊन घडीभर आनंद लुटताहेत ! गर्दी, गलबला, धावपळ या गोष्टी माणसाच्या जीवनाला आवश्यक आहेत. त्याच्या योगानंच अंतःकरणाचा कोठा साफ राहतो. एकान्तांत मनुष्य चिंतन करूं शकतो, अन् बाजाराच्या उल्हासी गर्दींत त्याच्या चिंता निवळतात. ओढे, नद्या, नाले धावत समुद्राला जाऊन मिळतात व आपल्या उदरांतलं सारं किल्मिष टाकून देतात, तद्वतच आपल्या मनाचा कोंडमारा झाला, चिंतेचं अथवा दुःखाचं किल्मिष फार सांचलं, कीं घटकाभर बाजारांत जावं. मानवी जीविताची धांदल अन् मुग्ध प्रसन्नता तिथें अविरत खेळत असते, ती आपल्या अंतर्यामांतलं

सारं किल्मिष शोषून घेते. कृष्णलीलांच्या बहुतेक गीतांत गोपी मथुरेच्या बाजाराला निघालेल्या असतात, व त्या बाजाराच्या वाटेवरच सर्व दुःखांचा परिहार करणारा 'कान्हा' त्यांना भेटतो यांतलं मर्म हेंच आहे. बाजारांत हजारों वस्तूंचा क्रयविक्रय चालतो हें तर खरंच; पण तिथें सारीं माणसं गुप्त संकेतानं अकारण प्रसन्नतेची व उल्हासाची जी देव-घेव मुबलकपणें करतात तिला फार महत्त्व आहे. जिथें आपण एकमेकांचे धक्के मनावर घेत नाहीं, ओळख नसतांहि एकमेकांकडे पाहून हसतों, नसत्या चौकशी करूं शकतों, गर्दींत व गलग्यांत सामील होतों, त्या स्थलाचा मोह कुणाच्याहि मनाला पडावा, नव्हे काय ?

मला तरी हा मोह आवरतां येत नाहीं; व म्हणून उगीचच्या उगीच बाजारांत जाण्याची हौस मी वारंवार भागवून घेतों.

# नं. १३ : कोमेजणारीं फुलं

मीं लिफाफा हलक्या हातानं उघडला, व आंतले कागद काढूं लागलों तों आंतून तीं खालीं माझ्या टेबलावर पडलीं. तीं अगदीं सुकून वाळून गेलीं होतीं. मीं तीं उचलून हुंगून पाहिलीं, पण त्यांचा सुगंध नाहींसा झाला होता. नक्की कसलीं फुलं तीं असावींत तेंसुद्धां मला कळेना इतकं त्यांचं स्वरूप पालटलं होतं.

त्या पत्रांत लिहिलं होतं; "...जेव्हां जेव्हां नाजुक सुंदर फुलांनीं बहरलेल्या या वेली दृष्टीस पडतात तेव्हां तुमची फार तीव्रतेनं आठवण होते. वाटतं या वेली इथें कशाला, तुमच्या दाराशीं कां फुलत नाहींत ? या सुकुमार शुभ्र फुलांच्या ओंजळीच्या ओंजळी घ्याव्या अन् तुम्हांला द्याव्या असं किती वाटतं ! पण तें कुठं शक्य आहे ? किती दूर तुम्ही माझ्यापासून ! अन् असेच दूर कदाचित् नेहमींच राहाल !...म्हणून हीं पत्रांत घालून धाडलीं आहेत. जेव्हां मीं तीं वेचलीं तेव्हां तीं किती ताजीं अन् टवटवीत होतीं. बघा, त्यांच्यावरचे दंवाचे थेंब अजूनहि तसेच आहेत ! कसा दरवळ सुटला आहे त्यांच्या सुगंधाचा ! अन् किती उत्सुक दिसताहेत तीं तुमच्याकडे जायला ! जणूं माझ्या अंतःकरणांतल्या साऱ्या उत्कंठेचा संसर्ग त्यांनाहि झाला आहे. तीं तुमच्या हातीं पडतील तेव्हां तीं अशींच शुभ्र, गंधयुक्त, टवटवीत, प्रफुल्ल असावींत अशी माझी इच्छा आहे. कशा स्थितीत तीं तुम्हांला मिळतात तें मला अवश्य कळवा..."

कशा स्थितींत ?......तीं एकदां कधीं फुलं होतीं हें देखील खरं वाटणं आतां कठीण होतं. त्यांचा गंध, कीं त्यांचा रंग, कीं त्यांचं काय शिल्लक राहिलं होतं ? मग मीं असं लिहावं, कीं " तूं पाठविलेलीं फुलं कोमेजून करपून पाचोळा होऊन आलीं " ? खरं लिहायचं तर असंच लिहिलं पाहिजे.

पण आयुष्यांत कितीदां तरी सत्य भाषण हें कर्तव्य नसतं. खोटं बोलून फसविल्यानंच आपण सुख निर्माण करूं शकतों. मीं माझ्या उत्तरांत खुशाल लिहिलं, "तूं धाडलेलीं फुलं अगदीं नुकतींच वेलीवरून काढल्यासारखीं ताजीं होतीं. तुझ्या पत्रांतून बाहेर पडतांच त्या शुभ्र नाजुक फुलांचा परिमल माझ्या खोलींत भरला. तुझ्या उत्कंठेचं वर्णन त्यांनीं आपल्या निःशब्द सुगंधानं किती छान केलं तुला कल्पना नाहीं ! जे भाव आपल्याला लिहून नीट व्यक्त करतां येत नाहींत ते सांगण्याची कामगिरी फुलांकडे सोपविण्याची कल्पना खरोखरच काव्यमय आहे. मला सगळींच फुलं आवडतात. पण मी संध्याकाळी दूर रानांत फिरायला जातों व एकान्त जागीं बसतों तिथें सध्यां देवबाभळीच्या झाडांवर गोल गोल पिवळ्याधमक बुंदांचीं फुलं बहरलीं आहेत, तीं मला विशेष प्यार वाटतात. तीं या पत्रांत घालून तुला धाडीत आहे. तीं तुझ्या हातीं पडतील तेव्हां त्यांची सुवर्णकांति, अन् त्यांचा मधुर वन्य सुगंध कायम असावा अशी माझी इच्छा आहे. कशा स्थितींत तुला तीं मिळतात तें मला अवश्य कळव..."

मनांतल्या मनांत मला पूर्ण माहीत होतं, कीं माझ्या पत्रांतून तीं बाहेर पडतील तेव्हां त्यांचे बुंद देखांपासून विलग झालेले असतील, त्यांचा मोहक गहिरा लालसर पिवळा रंग काळवंडून गेला असेल, अन् ज्या त्यांच्या मादक सुवासाचा आस्वाद घेत कांटेरी तरुतलाजवळच्या काळ्या मातींत पडून आकाशाकडे टक लावून पहात मी कितीदां तरी घटकान् घटका घालवितों त्या सुवासाची सूक्ष्म लहरदेखील शिल्लक राहिलेली नसेल ! आणि तरी मला आशा होती, कीं माझ्या पत्राचं उत्तर येईल तेव्हां त्यांत लिहिलं असेल, "तुम्हीं फुलं धाडलीं तीं अगदीं जशींच्या तशीं मला मिळालीं..."

तसं उत्तर खरोखरच आलं तेव्हां मला फार आनंद झाला. परस्पर मुग्ध वंचना करून स्वतःच्या आनंदांत भर घालण्याची कला ज्या व्यक्तीला न शिकवितां येते ती मला फार प्रिय वाटते.

अन् मी म्हणतों, हा वंचनेचा भाग सोडला तरीसुद्धां पत्रांतून फुलं पाठवावीं. ज्या माणसाला तीं धाडायचीं त्या माणसाला तीं कशाहि अवस्थेंत

मिळोत व तें माणूस त्यांचा कशाहि वृत्तीनं स्वीकार करो, तीं पत्रांत घालून आपलं अंतःकरण व्यक्त करायची आपली इच्छा आपण कां दाबायची? तीं सुकतील, कोमेजतील, वाळतील, चुरतील! चुरेनात! जिच्या हातीं तीं जातील ती व्यक्ति आडपडदा न करतां म्हणेल, “ सगळीं कोमेजून गेलीं होतीं. ” म्हणेना?

कारण, तसाच विचार केला तर पत्रांतल्या फुलांचाच कशाला, जे शब्द आपण लिहितों त्या शब्दांचा तरी ताजेपणा, त्यांचा जिवंतपणा त्यांचा अभिप्राय कायम राहील अशी आपल्याला खात्री धरतां येईल? ज्या भावनांनीं आपण ते शब्द लिहिले, जो अर्थ आपण त्या शब्दांत ओतला, तो अगदीं जसाच्या तसा ज्याला पत्र लिहिलं तें माणूस समजेल असा काय भरंवसा? शब्दांची स्थिति फुलांहून वेगळी नाहीं. तेहि कोमेजतात, सुकतात, वाळून जातात. त्यांचाहि सुवास टिकत नाहीं. फुलं देतांना ताजीं असलीं तरी ज्यानं घ्यायचीं त्याला मिळेपर्यंत तशीं राहत नाहींत. अन् शब्दांचीहि अशीच गत होते. ज्या ऊर्मीनं ते कागदावर उतरले ती लिहिणाराच्या अंतःकरणांतली लिहिण्याच्या वेळची ऊर्मि जशीच्या तशी वाचणाऱ्यापर्यंत नेऊन पोंचविण्याचं काम शब्द न चुकतां करतीलच असा नेम सांगवत नाहीं.

पत्रांचीच गोष्ट नको, कादंबरी, गोष्ट, निबंध कांहींहि लिहितांना आधीं मुळीं हवीं तींच नेमकीं शब्दपुष्पं लिहिणाराला शोधून काढतां काढतां किती प्रयास पडतात; अन् जीं प्रयत्नेंकरून मिळवावीं त्यांचा ताजेपणा, व अभिप्रायगंध वाचणाऱ्याच्या अनुभवाला येईल असा भरंवसा त्याला धरतां येत नाहीं. मला जें तीव्रतेनं वाटतं, जें दुसऱ्यांना सांगण्याची अधीरता मी अनुभवितों, कादंबरीलेखनाच्या वेळीं विविध पात्रांच्या ज्या उत्कट भावना मला चित्रित करायच्या असतात, त्यासाठीं अन्वर्थक, आकर्षक शब्द योजण्यासाठीं कोण यातायात करावी लागते मला? डोंगरमाथ्याच्या अगदीं कड्यावर, धोक्याच्या जागीं फुललेल्या रानगुलाबाचें गेंद दिसावेत व मग ते हस्तगत करण्यासाठीं साहस करावं, किंवा दुसऱ्याच्या परड्यांत पारिजात

फुलांचा सडा पडलेला असावा व तिथं पोंचण्यासाठीं कांटेरी कुंपण तुडवीत जावं, किंवा तळ्यांतल्या नीलकमलांनी मोहनी घालावी, अन् त्यांच्यापर्यंत पोंचायसाठीं कमरेइतक्या पाण्यांत उतरणं भाग असावं, तद्वत् हवे ते शब्द हुडकावे लागतात; अन् हे सारे कष्ट करूनहि वेचक शब्द हातीं आल्याचं अपूर्व समाधान नेहमीं लाभत नाहीं.

याचसाठीं, मला वाटतं, ईश्वरावर श्रद्धा ठेवणारे जुन्या काळांतले लेखक ग्रंथ लिहिण्यापूर्वीं परमेश्वराला म्हणत, " सुंदर, अन्वर्थक शब्द तुझ्या प्रेरणेनं सुचले तरच सुचतील. तेव्हां तुझा वरदहस्त माझ्या मस्तकावर असूं दे ". पण अशी खुशामत करूनहि व्हायचं तें झालेलंच आढळतं आपल्याला. या लेखकांनाहि हवे तेच अन्वर्थक उचित, नादमधुर शब्द अनेक वेळां अप्राप्य झाल्याचा पुरावा त्यांच्या लेखनांत सापडण्यासारखा आहे. ईश्वरनिष्ठ लेखकांची ही अवस्था; मग माझी गोष्ट कशाला ? माझा शब्दशोध कितीदां तरी निष्फल ठरतो हें मी तत्परतेनें कबूल करीन. कारण त्यांत ईश्वराची लाज उघडी पडण्यासारखी नाही ! कितीदां तरी लिहितांना मला हवे ते शब्द सापडत नाहींत ! मी धडपडतों, ठेचा खातों, कांट्यांचे ओरखाडे सहन करतों, पण ते माझ्या हातीं येत नाहींत !...

अन् तरी लोक मला सांगतात, तुमची भाषा किती सफाईदार, किती ओघवती, किती...

उभयपक्षीं वंचनाच असेल ही सारी !

पण किती गोड वंचना !

हिच्यांतून निर्माण होणाऱ्या सुखाच्या आभासामुळेंच लिहावसं वाटतं. गोष्टी, कादंबऱ्या पत्रं...

आणि पत्रांत सुकुमार फुलं घालावीत अन् घातलेलीं यावीत असंहि वाटतं, तें यामुळेंच !

## नं. १४ : पहिलं चुंबन

लोक मला पुष्कळदां सांगतात, " तुमची ' अल्ला हो अकबर ' ही कादंबरी आतां बाजारांत मिळत नाहीं; तिची दुसरी आवृत्ति काढा कीं. " मी त्यांना उत्तर देतों, " मिळत नाहीं हें बरं झालं; आतां ती लवकरच वाचकांच्या स्मरणांतून जाईल ". या माझ्या उत्तराचं आश्चर्य वाटून ते पुढें विचारतात,

" असं कां म्हणतां ? ती तुमची पहिली कादंबरी ना ? "

मी त्यांना सांगतों, " 'प्रेम–प्रमाद' व 'कर्तव्य–जागृति' अशा माझ्या दोन कादंबऱ्या आधीं 'केरळ कोकिळ' व ' प्रभात ' या मासिकांत क्रमशः प्रसिद्ध झाल्या होत्या. पण त्या पुस्तकरूपानं निघाल्या नाहींत. तेव्हां त्या दृष्टीनं " अल्ला हो अकबर " हीच माझी पहिली कादंबरी म्हणायला कांहीं हरकत नाहीं. "

" मग आपली पहिली कृति म्हणून ती तुमची आवडती असायला हवी. " तें आपलं मत सांगतात.

" पण मला कांहीं ती प्रिय नाहीं. "

" कां हो ? "

" माझ्या लेखनाचा नमुना म्हणून ती लोकांनीं वाचावी असं नाहीं मला वाटत. ती लिहिली तेव्हां नुक्तं कुठें माझं पाऊल विशीच्या पलीकडे पडलं होतं. किती अपरिपक्व असली पाहिजे त्या वेळीं माझी—"

मला माझं वाक्य पुरं करूं न देतां ते म्हणतात, " छे छे, असं कसं ? आम्हांला तर ती चांगली वाटते बुवा, अन् तुम्हीही ती नावडती ठरवितां कामा नये. ती तुमची पहिली कादंबरी ना ? अहो, कोणत्याही बाबतींत पहिलीवहिली गोष्ट असेल तिची मजा कांहीं औरच मानली पाहिजे ! "

मी हळूच म्हणतों, " हं. जसं पहिलं चुंबन ! "

तें ऐकून हसूं ते लागतात.

मी विचार करूं लागतों...

पहिलं चुंबन म्हणजे खरोखरच अवर्णनीय, अतुलनीय असं असतं काय ? त्याची गोडी अगदीं स्वर्गीय असते ? पुढच्या चुंबनांना त्याची सर येणं शक्य नाहीं ? कविसंकेत असा असेल; पण त्यांत सत्यांश कितपत आहे?...

अर्थात् कविसंकेत आहे तो प्रणयी युग्माच्या पहिल्या चुंबनाचा. तसं म्हटलं तर माणसाला पहिलं चुंबन कधीं आठवणं शक्य नाहीं. कारण तें तो घेत नाहीं, देतहि नाहीं. तें घेतलं जातं. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यांत प्रथम चुंबन घडतं तें तिच्या मातेकडून. बालकानं पुरते डोळेही उघडलेले नसतात, घट्ट दाबून धरलेल्या पुर्वसुकृताच्या मुठीदेखील सैल केलेल्या नसतात, एका असहाय टाहोखेरीज दुसरा शब्दही त्याला ठाऊक नसतो, अशा स्थितींत त्याची जन्मदात्री माता त्याला अलगद हातांनीं जवळ घेते अन् त्याच्या नखाएवढ्या कोमल मुखावर ओठ टेकून त्याचं चुंबन घेते. त्या पहिल्या चुंबनाची धड संवदेनाहि त्या टीचभर, जिवाला होत नसेल ! मग त्या सुखाच्या आठवणीचा प्रश्न तरी कुठला ?

मूल जरा मोठं झालं, रांगूं लागलं कीं, तें मुळीं सगळयांच्याच चुंबनाचा विषय होऊन बसतं. शेजारणी-पाजारणी, बसायला येणाऱ्या बायका, घरांतलीं माणसं, नोकर-चाकर, ज्यानं यावं त्यानं मुलाला उचलावं, अन् त्याचे मटामट मुके घ्यावे असा प्रकार सुरू होतो. त्या मुलाला वाचाही नसते अन् प्रतिकारशक्तिही नसते म्हणूनच ही चुंबनाची प्रचंड मोहीम तें सहन करतं. कांहीं मुलं जरा समजूं लागलं कीं, कुणी मुका घेतल्याबरोबर तो पुसून टाकतात; म्हातारीं माणसं जवळ आलीं कीं आतां आपल्यावर चुंबनप्रयोग करणार अशा भयानं तीं दूर पळतात. कारण त्या चुंबनांत त्यांना स्वतःला गोडी वाटत नाहीं. त्यांच्या आठवणी त्यांना राहत असल्याच–फ्राइडच्या सिद्धान्ताप्रमाणें राहतातच–तर मोठ्या माणसांनीं आपल्यावर केलेला एक जुलूम या स्वरूपानंच राहत असतील.

तेव्हां कविसंकेतांतलं सत्य पाह्यचं असेल तर हे सारे चुंबन-प्रकार दृष्टीआड केले पाहिजेत व लोकांच्या दृष्टीआड, एकान्तांत प्रियजनांमधें जें ' पहिलें चुंबन ' घडतं त्याचाच विचार केला पाहिजे. हें पहिलं चुंबन खरोखरच अगदीं सर्वोत्तम, संपूर्ण, नमुनेदार असतं काय ?

मला नाहीं वाटत.

उलट तें अपूर्ण, कौशल्यरहित, चोरटं, धांदरटपणाचं असण्याचाच संभव फार !

तुम्ही आपल्याला मनाशीं पहिल्या चुंबनाचा समय आठवून पहा, अन् मीं म्हणतों तें खरं का खोटं तें सांगा.

पहिलं चुंबन सर्वोत्कृष्ट चुंबन असूं शकेल कसं ?

कोणत्या बाबतींतली पहिली कृति निर्दोष व नमुनेदार असूं शकते ?

सायकलवर बसण्याचीच गोष्ट घेऊं उदाहरणादाखल. तुमची सायकल-वरची पहिली चक्कर आठवते तुम्हांला. मला माझी स्पष्ट आठवते. माझ्या विद्यार्थिदशेंतल्या उत्कट आनंदाच्या घटका कोणत्या तें मी आठवून पाहूं लागलों, कीं ज्या वेळीं प्रथम मला सायकलवर बसतां यायला लागलं त्या वेळची मला आठवण होते. मला शिकविणाऱ्या मित्राचा प्रत्यक्ष किंवा नैतिकसुद्धां आधार न घेतां मी स्वतंत्रपणें सायकल चालवूं लागलों होतों ! मला वाटलं मी स्वप्नांत तर नाहीं ! पण स्वप्नांत कसा असेन ? कारण माझ्या सायकलच्या चाकांखालून रस्ता भराभर मागें सरकत असलेला मला स्पष्ट दिसत होता. मला एक नवीनच सामर्थ्य प्राप्त झालं होतं. माझ्या गतींत नवीनच वेग उत्पन्न झाला होता. मला पंख फुटले होते ! त्या क्षणींचा माझा आनंद काय विचारावा !

पण सायकलवर सफाईनं, ऐटींत, निर्बंध, बेफिकिरीनं बसण्यांत जो आनंद असतो त्यापासून तो भिन्न होता. सायकलवर बसण्याची खरी मौज मी आज अनुभवूं शकतों. त्या वेळीं ती कोठून मला मिळणार ? आजू-बाजूला नजर वळविण्याची किंवा दांड्यावरचे हात क्षणभर दूर करण्याची-सुद्धां सोय नव्हती तेव्हां ! अर्थात् त्या घटकेला मला जें सुख झालं तें

सायकलवर बसण्याचं नव्हे. त्या सुखाचं कारण निराळंच होतं. घरच्या माणसांना न कळवितां, किंबहुना त्यांच्या इच्छेविरुद्ध मी सायकलवर बसायला शिकलों होतों. मीं एक नवा आनंद मिळविला होता, व वडिलांचा रोष पत्करण्याचं साहस त्यांत केलं होतं. या दुहेरी जाणिवेमुळें मला सायकलवरची ती पहिली फेरी विशेष आल्हादाची वाटली असली पाहिजे!

मी पहिल्यांदा सिगारेट ओढली ती वेळही मला आठवते. मी कांहीं कोणा मित्रांच्या चिथावणीवरून सिगरेट ओढूं लागलों नाहीं. माझं मींच ठरविलं, अन् एके दिवशीं दुकानांत पाकीट घेऊन रस्त्यावरच सिगरेट ओढली. मला ठसकाबिसका कांहीं लागला नाहीं. साऱ्या वृत्ती उद्दीपित झाल्या त्या पहिल्या झुरक्याच्या वेळीं. पण म्हणजे त्या वेळीं धूम्रपानाची मीं खरी लज्जत घेतली असं मुळींच नाहीं! उलट, किती आडमुठं धूम्रपान होतं तें! दहा वीस काड्या नासल्या तेव्हां कुठें मला सिगरेट पेटवतां आली. सिगरेटचं दांतांखालचें टोक नीट न धरतां आल्यामुळें तें ओलं चिंब अन् बिलबिलीत झालं. तंबाखूचे दोरे तोंडांत शिरले ते थुंकता थुंकतां पुरेवाट झाली. धूम्रपान कसलं, सिगरेटशीं कुस्तीच ती! त्या पहिल्या झुरक्याच्या वेळीं माझ्या चित्ताचं विलक्षण उद्दीपन झालं खरंच; पण तें धूम्रपानाची क्रिया माझ्याकडून उत्कृष्ट घडली म्हणून नव्हे, तर आजपर्यंत केलं नाहीं असं एक कृत्य मी करीत आहे, व तें करण्यांत मी एक अतिक्रम करीत आहे या जाणिवेमुळें. कोणत्याहि अनुभवाचं नाविन्य अन् त्यांतली साहसाची व अतिक्रमाची जाणीव यांच्यायोगें त्या अनुभवांत विलक्षण सुख उत्पन्न होतं. पहिलं धूम्रपान करतांना साऱ्या अंगावर रोमांचसुद्धां उभे रहातात ते याच कारणानं.

आणि जो न्याय पहिल्या धूम्रपानाला तोच पहिल्या अधरपानालाही लागू समजला पाहिजे. चुंबनाची अस्सल माधुरी पहिल्या चुंबनांत क्वचितच असते. ती माधुरी प्रेमिकांतलं सारं अंतर संपलं म्हणजे नंतरच्या शान्त, निश्चिंत, दीर्घ, मनसोक्त चुंबनांतच अनुभवितां येते. पहिल्या चुंबनाची महती मानायची ती त्यांतल्या काव्यासाठीं, नाट्यासाठीं! पहिल्या चुंबनाचा

क्षण प्रियाराधनांतला निकाली क्षण असतो म्हणून! त्या चुंबनाचा स्वीकार होईल कीं तो एक चुकीचा डाव ठरेल याबद्दल अनिश्चिति असते म्हणून! त्या क्षणापर्यंत जीं बंधनं पाळलीं तीं आतां सारीं तटातट तुटतील अशी गोड अपेक्षा असते म्हणून! अविचार व अतिक्रम यांची प्रक्षोभक जाणीव मनाला धुंद करते म्हणून! आपण दुरून दुरून एकमेकांवर पुष्कळ प्रेम केलं, आतां आपण चुंबन घेऊं या असं पूर्ण विचाराअंतीं ठरवून का प्रेमविव्हल स्त्री-पुरुष पहिलं चुंबन घेतात? छे: संकेतानं जवळ आल्यावर देखील प्रेमिकांपैकीं कोणी तरी साहस करावं, अविचार करावा, अतिक्रम करावा, तेव्हांच पहिलं चुंबन घडतं! नाविन्य, अनिश्चिति अन् अतिक्रम यांच्या योगानंच पहिल्या चुंबनाला गोडी आलीशी वाटते. त्या गोडीची स्मृति कधीं बुजणार नाहीं हें खरं. पण पहिल्या चुंबनाचं अवास्तव वर्णन करावं कुणी? ज्यांना तेवढंच एक मिळालं असेल त्यांनीं! ज्यांची तीच सलगी अखेरची ठरली असेल त्यांनीं!

मीं तर वाग्वधूशीं किती दीर्घकाल सलगीनं वागलों. किती पुस्तकं, किती कादंबऱ्या लिहिल्या. मग माझ्या त्या पहिल्या कादंबरीविषयीं वृथाभिमान मीं ठेवला नाहीं तर त्यांत चुकलं कुठं? लोकांना कसंही वाटो, त्या कादंबरीविषयीं जें उत्तर मी देतों तेंच बरोबर आहे अशी माझी खात्री आहे. अगदीं पहिल्या चुंबनाचा तुम्ही दाखला दिला तरी!

## नं. १५ : एक स्वप्न

माझ्या बसण्याच्या खोलींतलं तें चित्र किती जुनं झालेलं आहे! त्यांतले रंग विटले आहेत. त्यांतल्या आकृतींच्या रेखा पुसट झाल्या आहेत. ज्या जाड कागदावर तें चढविलं आहे तो काळवंडून गेला आहे. त्याची चौकट देखील खवले पडून विशोभित दिसूं लागली आहे! तथापि तें मी जागेवरून हालवीत नाहीं. बाकीचीं बहुतेक चित्रं जर जुनीं झालीं कीं, मी काढून टाकतों. त्यांच्या जागीं नवीं लावतों. खोलींत तींच तीं चित्रं सतत दिसलीं कीं दृष्टीला संतोष वाटेनासा होतो. नव्यानं ऐकलेल्या गाण्याचा मोह वाटला कीं, त्याचे चरण आपण मोठ्या गोडीनं मनाशीं गुणगुणतों खरे; पण ती स्वरमाला कांहीं वेळानं श्रुतिमनोहर वाटेनाशी होते. खोलींतल्या चित्रांची अशीच तऱ्हा आहे. कांहीं कालच त्यांत आल्हाद मिळतो. मग बोलायचं तेवढं बोलणं संपूनहि जीं आपल्या पुढून उठत नाहींत अशा भेटायला आलेल्या माणसांसारखीं तीं वाटूं लागतात. या माणसांना " ठीक आहे, उठा जा आतां " असं म्हणणं कठीण असतं. पण ज्यांच्या सहवासांतलं स्वारस्य संपलं अशा चित्रांना निरोप देणं हातांतलं असतं. मी त्यांना खालीं काढतों, अन् दुसऱ्या नव्या चित्रांची त्यांच्या जागीं स्थापना करतों. एखाद्या माणसाच्या घरची पिढ्यान्‌पिढ्या त्याच त्या तसबिरींनीं सजविलेली खोली दृष्टीस पडली, कीं मला मोठा अचंबा वाटतो. त्या माणसाच्या मानसिक प्रवाहशालित्वाबद्दल संशयसुद्धां येतो मला. अन् तरी माझ्या खोलींत तें दिवसेंदिवस रंगविहीन होत चाललेलं चित्र जगाच्या जागीं तसंच आहे!

माझ्याकडे येणाऱ्या माणसांना त्या चित्राचं कोडं पडत असेल. खोलींतल्या बाकीच्या चित्रांशीं त्यांना तें विसंगत वाटत असेल. त्याबद्दल मला प्रश्न

विचारावा असंसुद्धां त्यांपैकीं पुष्कळांच्या मनांत येत असेल. कांहींनीं तो मला विचारलाहि आहे. पण ‘ तसंच कांहीं कारण आहे ’ असं दर्शविणारी चर्या करून हसण्यापलीकडे त्यांना माझ्याकडून उत्तर मिळालेलं नाहीं. कारण ज्या कारणासाठी तें चित्र मला प्रिय वाटतं, जतन करावसं वाटतं, सतत नजरेसमोर असावसं वाटतं तें मला स्पष्ट करून सांगतां येण्यासारखं नाहीं. मी सांगितलं तरी तें कुणाला नीट समजायचं नाहीं. त्या कारणाचा चित्रकलेशीं कांहीं संबंध नाहीं. तें ज्या व्यक्तीनं काढलं व मला नजर केलं तिचा माझा सहवास फार अल्प काल झाला; पण जो झाला तो मला कधीं विसरतां यायचा नाहीं. ती व्यक्ति आज जर्मनींत स्थानबद्ध होऊन पडलेली आहे. तिचं कुशलहि मला माहीत नाहीं. तिनं एकदां एक चित्र काढतां काढतां मला विचारलं होतं–पण मी कशाला सांगूं लागलों ? त्यांत तुम्हांला गोडी वाटायची नाहीं ? तें ऐकूनहि तुम्ही म्हणाल, ‘ हे सारं झालं, पण हें चित्र आतां फार जुनं झालं, काढून टाका हें ’. आणि मला तर तें काढायचं नाहीं ! मला विशेष प्रिय असलेल्या वस्तूंपैकीं तें एक आहे. माझा जीव त्यावर जडलेला आहे.

मनुष्य आपला जीव किती गोष्टींवर लावून घेतो पहा ! जणूं जीवनाला आवश्यक असा तो एक छंद आहे. किती वस्तु, किती व्यक्ती, किती मतं, किती उद्योग मनुष्य प्रिय समजत असतो ! या सर्वांवर त्याचा जीव जडलेला असतो. माझ्या या खोलींतच पाहा. ज्या ज्या वस्तूवर मी नजर टाकतों ती मला या ना त्या कारणासाठीं प्यार आहे. सजावट सामान, पुस्तकं, डायऱ्या, टिपणांच्या व उताऱ्यांच्या फाइली ! या जुन्या कागदपत्रांचा वाढता व्याप पाहिला कीं, एखादे वेळीं मनांत येतं त्या सगळ्यांची आतां आपल्याला गरज नाहीं; जे नको असतील ते निकालांत काढून टाकावे. मग मी बैठक घालून बसतों अन् त्यांतले कोणते ठेवावे व कोणते टाकावे तें पाहूं लागतों. परंतु हा उद्योग तासन् तास करूनहि त्याचा उपयोग होत नाहीं. कारण, अखेर मी तीं सगळींच ठिपणं अन् सगळेच कागद पूर्ववत् बांधून पुन्हां ठेवून देतों ! त्यांचा मला केव्हां कसा उपयोग होणार आहे तें मला सांगतां येत नाहीं. इतकंच काय, उपयोग नाहीं अशी कबुली देखील मन

देत असतं. तथापि वाटतं, राहूं देत जवळ. त्यांचा त्याग करवत नाहीं. अन् त्यागाची सक्ती माझ्यावर होत नसल्यामुळें ते मला खरोखरच किती च कां प्रिय आहेत त्याचा निर्णय लागत नाहीं !

"प्राणाहून प्रिय" असा शब्दप्रयोग आपण किती वारंवार वापरतों. अमुक वस्तु मला प्राणाहून प्रिय आहे, अमुक व्यक्तीवर माझं प्राणापलीकडे प्रेम आहे, या बोलण्याच्या ठरीव तऱ्हा होऊन गेल्या आहेत. या बोलण्यांत प्रामाणिकपणा किती आहे, तें कसोटीला लागण्याची वेळ सहसा येत नाहीं. म्हणूनच आपल्याला हव्या त्या वस्तू, घरदार, आप्तस्वकीय, मित्र इत्यादि परिवार आपण आपल्याभोंवतीं उभा ठेवूं शकतों. अशा कसोटीची कल्पना तुम्हीं कधीं करून पाहिली आहे ? चालू महायुद्धांत ज्यांच्यावर तात्काल गृहत्याग ( Evacuation ) करण्याचा प्रसंग येत असेल त्यांच्या धावपळीचीं चित्रं मी पुष्कळदां मनाशीं रंगवून पाहतों. "उठा, घर सोडून चालते व्हा !" असा हुकूम सुटला कीं हीं माणसं कशी वागत असतील ? पिढ्यान्‌पिढ्या ज्या घरांत वस्ती केली, हें हवं तें हवं म्हणून ज्या वस्तू सांठविल्या, जीं सुखं निर्माण केलीं, त्या सर्वांचा अकस्मात् त्याग करतांना त्यांना काय वाटत असेल ? धावतां धावतां एका छोट्याशा "सूटकेस"-मध्यें काय मावेल तेवढंच आपल्याला बरोबर नेतां येईल हें लक्षांत ठेवून हीं माणसं काय उचलून घालीत असतील त्या बॅगमधें ? जडजवाहीर ? नोटा ? कर्जरोखे ? पुस्तकं ? चित्रं ? लेख ? कपडे ?

परवां एका इंग्रजी मासिकांत वाचलं, कीं गृहत्यागाच्या वावटळींत सांपडलेल्या एका स्त्रीची सूटकेस पॅरिस शहरीं उघडून पाहिली तों मोठा चमत्कार दिसला. अलंकार, पैसे, असल्या कांहींच मूल्यवान वस्तू तिनं बरोबर घेतल्या नव्हत्या. त्या सूटकेसमध्यें तिनं फक्त आपले दोन जुने झगे, अन् पायमोज्यांचे फाटके जोड भरले होते ! ही गोष्ट सांगणाऱ्या लेखकानं त्या स्त्रीच्या या चमत्कारिक वर्तनाचा असा खुलासा केला आहे, कीं गृहत्यागाच्या संकटांत सांपडलेलीं माणसं भयाच्या अतिरेकानं अर्धवट भ्रमिष्ट होतात. आपण काय करतों त्याचं मुळीं त्यांना भानच उरत नाहीं, अन् बेभान

झाल्यामुळें स्वतःच्या प्राणाइतकीच कोणती वस्तु त्यांना प्रिय असावी त्याची खरी कसोटी होत नाहीं !

या गोष्टीचा माझ्या मनावर विशेष परिणाम झाला असला पाहिजे. कारण ज्या दिवशीं मीं ती वाचली त्या दिवशीं मला एक विलक्षण स्वप्न पडलं. मीं आपला सर्व उद्योग आटपून आरामखुर्चीत स्वस्थ पडलों होतों. फिरायला जाण्याचा अर्धवट विचार मनांत होता, परंतु पडून राहण्याची मजा सोडवत नव्हती. सूर्यास्त होऊन बराच वेळ झाला होता, खोलींत अंधार होऊं लागला होता, घरापुढून जाणाऱ्या माणसांची चाहूल माझ्या कानीं थोडी थोडी येत होती. मी डोळे मिटून स्तब्ध पडलों होतों. पुष्कळ वेळां मी असा पडून राहतों.

मी असा किती वेळ राहिलों असेन कोण जाणे, पण माझ्या अगदीं जवळ उभे राहून कुणीं तरी मला कांहीं तरी विचारलं असं मला वाटलं, तेव्हां मीं दचकून वर पाहिलं. खोलींत पसरलेल्या अंधाराहूनहि अधिक काळी अशी एक आकृति माझ्यापुढें उभी होती. तिचं मस्तक मला नीटसं दिसलं नाहीं इतकी ती उंच असावी. तिनं पुन्हा विचारलं, " मी तुला न्यायला आलें आहें, तुझी तयारी आहे ? "

माझ्या लक्षांत आलं. मी म्हटलं, " होय तयारी आहे. "

त्या आकृतीच्या हाताचा स्पर्श माझ्या खांद्याला झालासं मला वाटलं. मला तिचे शब्द ऐकूं आले, " तुला मी एक सवलत देणार आहे. "

मला विस्मय वाटला. मीं विचारलं, " सवलत ? "

" हो. तुला आपल्याबरोबर एखादी वस्तू घ्यायची असेल तर मी घेऊं देईन. मात्र एकच वस्तु ! "

मी जागच्या जागींच कांहीं वेळ उभा राहिलों. कोणती वस्तु बरोबर घ्यावी त्याविषयीं माझ्या मनाचा निर्णय होत नाहीं असं त्या आकृतीला वाटलं कीं काय कुणास ठाऊक ? ती म्हणाली,

" काय घेतोस बरोबर ? हें ? हें ?... "

अन् माझ्या खोलींतल्या एकेका वस्तूकडे ती बोट दाखवूं लागली.

क्र. ६९२२

मी प्रत्येक वेळीं ' नाहीं ' म्हणत होतों.

तिनं विचारलं, " तुझा हा नवा लेख तयार होऊन पडलेला दिसतो टेबलावर. हा ? "

" नाहीं, "

" मग तूं लिहिलेलीं पुस्तकं या कपाटांत ठेवलीं आहेत, त्यांतलं एकादं ? मी गझनीच्या महंमदाला न्यायला आलों तेव्हां तो आपल्या लुटलेल्या संपत्तीचा ढीग समोर ठेवून रडत होता. तुझी ही संपत्ति अशीच सोडवत नसेल तुला. घ्यायची आहे एखादी कादंबरी बरोबर तुला ? घे. "

मी म्हटलं, " नको. "

त्या आकृतीची मुद्रा मला दिसत नव्हती, पण तिला माझ्या उत्तराचा अचंबा वाटला असावा असा तिचा स्वर झाला. ती म्हणाली, " तूं मोठा विचित्र दिसतोस. सर्वांत प्रिय अशी एखादी वस्तूच नाहीं तुझ्याजवळ ?...

मीं म्हटलं, " आहे तर ! "

" मग घे तर ती, अन् चल. "

" घेतों " असं म्हणून मी आंतल्या खोलींत गेलों, बटन दाबून दिवा लावला, पेटी उघडली, पत्रांचे गठ्ठे घाईघाईनें पाहिले, त्यांतल्या एकावरची रेशमी फीत सोडली, एक पत्र काढून घेतलं, अन् बाहेरच्या आकृतीला मोठ्यानं सांगितलं,

" सांपडलं ! आलोंच !

परंतु मी बाहेरच्या खोलींत येऊन पाहिलं तो ती आकृति कुठें होती !

आंतल्या खोलींत मीं लाविलेल्या दिव्याच्या प्रकाशाचा पट्टा बाहेरही आला होता. अंधार नाहींसा झाला होता. कालपुरुष गेला होता.

मीं माझ्या हातांतल्या पत्राकडे पाहिलं.

होय. तें मला खरोखरीच प्राणाहून प्रिय होतं !

मृत्यूनं खरोखरीच एकच एक प्यार वस्तु बरोबर घ्यायची परवानगि मला दिली तर मी हेंच पत्र हातीं घेऊन त्यांच्याबरोबर चालू लागेन !

---

संमेलनप्रसंगीं करावयास सर्वथैव योग्य अशा प्रो. ना. सी. फडके यांच्या
दोन कलात्मक, उद्‌बोधक, रमणीय एकांकी नाटिका
(सर्वत्र मिळतात)

**जडावाची देवी**
(२ री आवृत्ति)
किं. ६ आणे : फोटोसहित

**आगलावी**
किंमत ४ आणे

**"क्षमेसाठीं अपराध"** किं. ४ आणे

प्रो. ना. सी. फडके कृत **तोतया नाटककार** शंभरटक्के विनोदी
वाक्यागणिक टाळ्या घेणारें उच्च दर्जाचें नाटक
किंमत १२ आणे ] [ सर्वत्र मिळते.

प्रो. ना. सी. फडके यांची **प्रवासी** सर्वोत्कृष्ट कादंबरी
किंमत २॥ रुपये मिळते.

REFBK-0006122

**"मनोहरचीं आकाशवाणि"**
आठ सर्वोत्कृष्ट पाश्चात्य ललितकृतींवरील रसग्राही विवेचनाच्या
साहाय्यानें ललितलेखनाचें तंत्र समजावून देणारें
मराठींतील अपूर्व पुस्तक

**मनोहरची आकाशवाणी**
किंमत १ रुपया ] [ सर्वत्र मिळते.